








जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद जि. यवतमाळ, व्दारा संचालित

## श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद

# वात्सल्य

२०२२-२३



## आमचे दैवत



मा.आ. श्री. मनोहररावजी नाईक

माजी अन्न व औषधी प्रशासन मंत्री, महाराष्ट्र राज्य

## आमचे दैवत



मा.डॉ. एन. पी. हिराणी

माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ
पूर्वाध्यक्ष, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद

## कुशल नेतृत्व



मा.श्री. जय सुधाकरराव नाईक

अध्यक्ष, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद

# प्राचार्यांचे मनोगत.....

विद्यार्थिनींनो आपल्या महाविद्यालयाची उज्वल अशी एक परंपरा आहे. महाविद्यालय स्थापन झाले तेव्हापासून तर आजपर्यंत महाविद्यालयाचे 'वात्सल्य' वार्षिक अंक नियमित पणे आपण काढत असतो. ती परंपरा आजही कायम आहे. 'वात्सल्य' वार्षिक अंक निर्माण करण्यामागे वात्सल्य समितीचे प्रभारी प्राध्यापक तसेच वात्सल्य अंक संपादन करणाऱ्या संपादक विद्यार्थिनींचे धन्यवाद... अत्यंत सुंदर.. सुरेख.. देखणा असा सत्र २२-२३ चा वात्सल्य अंक आपल्या अथक परिश्रमातून तयार झाला आहे आणि हा वात्सल्य वार्षिक अंक विद्यार्थिनींना सुपूर्द करतांना मला आनंद होत आहे. कारण प्राचार्य म्हणून माझी नुकतीच नियुक्ती झाली आहे. या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक पदावर काम करताना. प्रचंड असा अनुभव आणि सहकारी प्राध्यापकांशी असलेले संबंध. त्यामुळेच संस्थेने माझ्यावर प्राचार्य पदाची जबाबदारी सोपविली आहे. विद्यार्थिनींनो महाविद्यालयाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतचा माझा प्रवास निरंतर सुरू आहे. आपल्या महाविद्यालयाची समृद्ध अशी गुणवत्तेची परंपरा आहे. महाविद्यालयातील विद्यार्थिनी क्रीडा क्षेत्रामध्ये, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, करिअर कट्टा, विद्यार्थिनी मंडळाच्या माध्यमातून स्वतःला सिद्ध करीत असतात. या वर्षी देखील आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी क्रीडा क्षेत्रामध्ये, राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये, राष्ट्रीय छात्र सेना आणि महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी सुरू केलेला करिअर कट्टा आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनी मंडळाच्या, सांस्कृतिक स्नेहसंमेलन, युवा महोत्सवाच्यावतीने विद्यार्थिनींना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यार्थिनींचा वाढता आलेख पाहून मला अतिशय आनंद होत आहे. हिंदी भाषिक साहित्यिक उदय प्रकाश म्हणतात, **''जो आदमी कुछ बोलता नाही. कुछ सुनता नही. वो आदमी मरा हुआ होता है, जो आदमी बोलता है, सुनता है, वही जिंदा होता है''** विद्यार्थिनींनो हे सांगण्यामागचे तात्पर्य एवढेच की, जी माणसं काहीच बोलत नाही. ऐकत नाही. ती माणसं मेलेली असतात. आणि जी माणसं बोलतात.. ऐकतात.. तीच माणसं जिवंत असतात. समाजामध्ये ज्या काही विविध पातळीवर घटना घडत आहेत. ज्या काही वाईट घटनांमुळे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, राष्ट्रीय स्वास्थ्य बिघडत आहे. अशा घटनांविषयी आपण बोलले पाहिजे. त्यावर लिहिले पाहिजे. आपण अभिव्यक्त झालो पाहिजे. ही आपली जबाबदारी आहे. असे मला प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते.

विद्यार्थिनींनो साहित्याच्या माध्यमातून मानसिक, आत्मिक, नैतिक मनोबल अधिक दृढ होत असते. आणि माणसाला समाजामध्ये एक चांगला नागरिक म्हणून जीवन जगता यावे हे त्या मागची भूमिका असते. साहित्यामुळेच समाजात परिवर्तन घडवून येत असते. आपण आपले वाचणे अधिक समृद्ध केले पाहिजे. व त्याच्या माध्यमातून अभिव्यक्त झाले पाहिजे. 'वात्सल्य' वार्षिक अंक म्हणजे महाविद्यालयात विद्यार्थिनींना मनमोकळेपणे अभिव्यक्त होण्याचे, मुक्त संचार करण्याचे, प्रकटीकरण करण्याचे सशक्त असे माध्यम आहे. सत्र २२- २३ या वर्षा मध्ये वात्सल्य वार्षिक अंक समितीचे प्रभारी प्राध्यापक, संपादक विद्यार्थिनींनी अतिशय सुरेख अशी मांडणी केली आहे. महाराष्ट्र प्रेस पुसदचे पवन इंदोरीया, मुद्रित करणारे अजु प्रिंटस्चे अजय चिद्दरवार, मुद्रित शोधन करणाऱ्या प्राध्यापकांच्या अथक परिश्रमातूनच हे वात्सल्य अंक निर्माण झाले आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी वात्सल्य वार्षिक अंक निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतलेत त्या सर्वांचे मी मनापासून धन्यवाद मानते व आपल्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा आपणास देते धन्यवाद!



**कार्य. प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे**

# आमचे गुरुकुल



कार्य. प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांच्यासवे वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद



प्राचार्यासवे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद



प्राचार्यासवे कार्यालयीन कर्मचारी वृंद

# सर्वोत्कृष्ठ विद्यार्थिनी पुरस्कार

आमच्या महाविलयामध्ये अनेक चांगल्या प्रथा आहेत. त्यातील एक चांगली प्रथा म्हणजे दरवर्षी आमच्या महाविद्यालयाच्या प्रत्येक शाखेतुन सर्वोत्कृष्ठ विद्यार्थिनी हा पुरस्कार देण्यात येतो. काही निकषाच्या आधारे नियुक्त समितीव्दारे सर्वोत्कृष्ठ विद्यार्थिनींची निवड करण्यात येते. निवड करण्यात आलेली विद्यार्थिनी ही अभ्यासात तर अग्रेसर असते शिवाय तिचा राष्ट्रीय सेवा योजना, विविध क्रिडा, सांस्कृतिक तसेच इतर स्पर्धामध्ये सक्रिय सहभाग असतो. हा पुरस्कार वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात प्रदान करण्यात येतो.

पुरस्कार देतांना प्रमुख अतिथी मा. आ. ॲड. निलयभाऊ नाईक, अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. अनिल मुडे.

सत्र २०२२–२३ मध्ये हा पुरस्कार खाली विद्यार्थिनींना प्राप्त झाला.



कु. आदिती ढोरे
बी.कॉम. भाग–३



कु. प्रतिक्षा मस्के
बी.ए. भाग–३



कु. भाग्यश्री धोंगडेकर
बी.कॉम. भाग–३



कु. राजश्री गाडवे
बी.एस्सी. भाग–३

# कुसुमाग्रजांचा मराठी साहित्य प्रवास



**कु. लक्ष्मी बंडू कांबळे**
बी.ए.-२

मराठी साहित्यामध्ये काही साहित्यकारांची नावे कितीही जुनी झाली तरी आत्ताची वाटतात. त्यापैकीच एक आधुनिक युगाचे कवी अशी ओळख असलेले कवी म्हणजे कवी 'कुसुमाग्रज.' मराठी साहित्य आणि कुसुमाग्रज यांचा अभ्यास करणाऱ्यांना आजही या मराठी साहित्यकाविषयीची अधिक खोलवर माहिती घेणे भाग आहे. मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, समीक्षक, नाटककार आणि कथाकार अशी त्यांची ओळख आहे. समाजनिष्ठ लेखक अशी ओळख असलेले कुसुमाग्रज हे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त असे साहित्यिक आहे. त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी आवर्जून मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जातात. इतकी त्यांची मराठी भाषेत ख्याती आहे.

कुसुमाग्रज... एक अथांग, उत्तुंग, उत्कट व्यक्तिमत्व. त्यांच्याच शब्दांचा आधार घ्यायचा तर, ''मातीमध्ये उगवुन सुद्धा मेघांपर्यंत पोहोचलेलं.'' कुसुमाग्रजांच्या साहित्याविषयी बोलायचे झाले तर ते शद्बात अपुरे पडतील.....

**''माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा**
**हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा**
**हिच्या कुशीत जन्मले, काळे कणखर हात**
**ज्यांच्या दुर्दम धीराने, केली मृत्यूवर मात**
**नाही पसरला कर, कधी मागायास दान**
**स्वर्ण सिंहासनापुढे, कधी लवली न मान''**

अशा अत्यंत भावुक शद्बात कुसुमाग्रजांनी आपल्या मराठी भाषेवरचे प्रेम व्यक्त केले आहे. त्यांचा जीवनपरिचय थोडक्यात पाहुया.

कुसुमाग्रजांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे बदलले गेले. कुसुमाग्रजांचे वडील वकील होते. वकिलाच्या व्यवसायासाठी ते पिंपळगाव बसवंत या तालुक्याच्या गावी आले. कुसुमाग्रजांचे बालपण तेथेच गेले. कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती. एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणून कुसुमचे अग्रज म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासून शिरवाडकर कवी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथील हं.प्रा.ण. कला महाविद्यालयातून त्यांनी आपल बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळवल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. त्यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३० मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रज यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासून झाली आहे. १९३३ साली त्यांनी 'ध्रुव मंडळाची' स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमध्ये त्यांनी सहभाग घेतला.

पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली. पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ.अ.ना.भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपून ती मृतप्राय

होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि.वा.शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले.

१० मार्च १९९९ रोजी शिरवाडकरांचे निधन झाले. वि.वा. शिरवाडकर यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' नावाची संस्था उभारण्यात आली आहे. त्यांच्या नाशिकमधील टिळकवाडी येथील निवासस्थानी आता मराठी पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. २७ फेब्रुवारी हा या थोर साहित्यिकाचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.

**साहित्य प्रवास :**

शालेय शिक्षण घेत असतांना कुसुमाग्रजांची पहिली कविता प्रकाशीत झाली. 'रत्नाकर' नावाच्या मासिकातून ती प्रसिद्ध करण्यात आली.

२० वर्षाच्या वयात त्यांनी नाशिकमध्ये दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून अहिंसात्मक आंदोलनात प्रवेश केला. या शिवाय आपल्या जीवन काळात त्यांनी अनेक सामाजिक आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. २० वर्षाच्या वयात त्यांनी आपला पहिला मराठी कविता संग्रह 'जीवनलहरी' प्रकाशित केला. नंतर नाशिक मध्येच त्यांनी मराठी चित्रपटांसाठी पटकथा लिहिणे सुरू केले. धार्मिक चित्रपट सती सुलोचना मध्ये त्यांनी अभिनेता म्हणूनही काम केले.

नंतर काही काळ त्यांनी विविध नियतकालिके आणि वृत्तपत्रांमध्ये संपादक म्हणून काम केले. १९४२ हे वर्ष त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे होते. कारण याच वर्षी मराठी भाषेचे ध्येयवादी लेखक विष्णू सखाराम खांडेकर यांनी कुसुमाग्रजांचा 'विशाखा' हा कविता संग्रह स्वखर्चावर प्रकाशित केला. वि.स. खांडेकर यांनी ''कुसुमाग्रजांच्या शद्बांमुळे सामाजिक असंतोष प्रकट होतो. परंतु त्यांच्यामुळेच जुने जग नव्या मार्गाकडे जात आहे ही आशावादी श्रद्धा आहे.'' असे कुसुमाग्रजांचे वर्णन करतांना लिहिले.

१९४२ साली प्रसिद्ध झालेला 'विशाखा' हा काव्यसंग्रह म्हणजे मराठी वाङ्मयातील उच्च कोटीचे वैभव 'मराठी माती', 'स्वगत', 'हिमरेषा' यांचबरोबर 'ययाती आणि देवयानी' व 'वीज म्हणाली धरतीला' ही नाटके १९६० ते १९६६ साली प्रसिद्ध झाली. साऱ्या साहित्य कृतींना राज्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. १९४६ साली 'वैष्णव' ही कादंबरी व 'दुरचे दिवे' हे नाटक प्रसिद्ध झाले.

कुसुमाग्रजांनी लिहिलेल्या 'नट सम्राट' या नाटकाला १९७४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला. 'नटसम्राट' ही त्यांच्या लेखणीतून उतरलेली सर्वोत्कृष्ट कलाकृती तर होतीच पण त्याचे नाट्यप्रयोगही खूप गाजले. नाट्यवेड्या मराठी रसिकांनी त्यांचे अभूतपूर्व स्वागत केले. अत्यंत नाजुक व भावुक विषयाला हाताळणारे हे नाटक वयोवृद्धांचा दृष्टीकोण बदलणारे ठरले कारण अनेक वृद्धांनी हे नाटक पाहिल्यावर आपले मृत्यूपत्र बदलले. तरूणांचाही वृद्धांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला.

**कविता :**

कुसुमाग्रजांच्या अनेक कविता तर फारच प्रसिद्ध आहेत. आजही त्यांचे कविता संग्रह अभ्यासले जातात. अक्षरबाग (१९९९), किनारा (१९५२), चाफा (१९९८), छंदोमयी (१९८२), जाईचा कुंज (१९३६), जीवन लहरी (१९३३), थांब सहेली (२००२), पांथेय (१९८९), प्रवासी पक्षी (१९८९), मराठी माती (१९६०), महावृक्ष (१९९७), माधवी (१९९४), मारवा (१९९९), मुक्तायन (१९८४), माधवी (१९९४), मेघदुत (१९५६), रसयात्रा (१९६९), वादळ वेल (१९६९), विशाखा (१९४२), श्रावण (१९८५), समिधा (१९४७), स्वगत (१९६२), हिमरेषा (१९६४)

**नाटक :**

शिरवाडकरांची अनेक नाटकं सुद्धा फारच प्रसिद्ध आहेत.

शिरवाडकरांच्या स्वतंत्र नाटकांत दुसरा पेशवा (१९४७), कौंतेय (१९५३), आमचं नाव बाबुराव (१९६६), ययाति अणि देवयानी (१९६६), वीज म्हणाली धरतीला (१९७०), नटसम्राट (१९७१), यांचा समावेश होतो. दूरचे दिवे (१९४६), वैजयंती

(१९५०), राजमुकुट (१९५४), औथेल्लो (१९६१), व बेकेट (१९७१) ही त्यांची काही रूपांतरीत नाटकं आहेत.

**कथासंग्रह :**

इतकेच नाही तर त्यांनी लिहिलेले कथासंग्रह देखील फारच गाजले आहेत.

अंतराळ, अपाईंमेंट, एकाकी तारा, काही वृद्ध काही तरूण, जादूची होडी, प्रेम आणि मांजर, फुलवाली, एकबारा निवडक कथा, सतारीचे बोल.

**कुसुमाग्रज यांना मिळालेले पुरस्कार :**

(१) १९८७ मध्ये कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

(२) कुसुमाग्रजांनी लिहिलेल्या नटसम्राट या नाटकाला १९७४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला.

(३) १९८५ मध्ये भारतीय नाट्य परिषदद्वारे त्यांना राम गणेश गडकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

(४) १९८६ मध्ये त्यांना पुणे युनिव्हर्सिटी द्वारे डि.लिट. डिग्री देण्यात आली.

(५) १९८८ मध्ये त्यांना संगीत नाट्य लेखन पुरस्कार देण्यात आला.

(६) 'मराठी माती' (१९६०), 'स्वगत' (१९६२), 'हिमरेषा' (१९६४), व 'ययाति आणि देवयानी' (१९६६), 'वीज म्हणाली धरतीला' (१९६७), नटसम्राट (१९७१) नाटकास व काव्यसंग्रहास राज्य पुरस्कार प्राप्त.

(७) १९८८ साली ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला.

(८) १९९१ साली पद्मभूषण ने सन्मानित करण्यात आले.

**आधुनिक युगाचे कवी :**

कुसुमाग्रज यांनी डॉ.अ.ना. भालेराव यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी दर्जेदार साहित्य निर्मितीला प्रेरणा दिली. त्यातून प्रेरणा घेताच ते एक उत्तम नाटककार म्हणून नावारूपाला आले. त्यांच्या कविता, कथा या फारच प्रसिद्ध आहेत. त्यांची ओळख एक नाटककारापेक्षा कवी म्हणून अधिक नावारूपाला आलेली आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या साहित्यातून कायमच आधुनिकतेचे एक वलय दिसून आले. बुरसटलेल्या विचारांना बगल देत त्यांनी साहित्यात नवक्रांती घडवून आणली. म्हणूनच त्यांना 'आधुनिक युगाचे कवी' म्हणतात.

**कुसुमाग्रजांच्या प्रसिद्ध कविता :**

कुसुमाग्रजांच्या अनेक कविता प्रसिद्ध आहेत. त्यापैकी एक कविता म्हणजे 'कणा' ही होय.

**कणा**

''ओळखलत का सर मला? पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला, बोलला वरती पाहून
गंगामाई पाहूणी आली, गेली घरट्यात राहून
माहेरवाशिणीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांवरतील पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे, सर आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला

मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेऊन, तुम्ही फक्त लढ म्हणा!''

सोबतच त्यांची सहानभूती, अखेर कमाई, पृथ्वीचे प्रेमगीत, सागर, स्वगत, निर्माल्य, प्रेम, जोगीण, नदी इत्यादी त्यांच्या प्रसिद्ध कविता आहेत.

**कुसुमाग्रज एक वेगळं व्यक्तिमत्त्व :**

कुसुमाग्रजांच्या साहित्य प्रवासाबरोबर माणूस म्हणून त्याचं वेगळं व्यक्तिमत्त्व अभ्यासायचं तर अनेक पैलूंनी ते पहावे लागेल. नाशिकमधील अनेक चळवळींचे ते प्रणेते होते. उदाहरणार्थ, त्यांनी लोकहितवादी मंडळ १९५० मध्ये सुरू केले. नाशिकच्या प्रसिद्ध सार्वजनिक वाचनालयाचे ते १९६२ ते १९७२ पर्यंत अध्यक्ष होते. ते दशक वाचनालयाचे सुवर्णयुग म्हटले पाहीजे. सामाजिक वा वैयक्तिक अशा कुठल्याही प्रकल्पांना ते मार्गदर्शन करीत. कोणीही कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन मागण्यास आला तर क्षणात त्या व्यक्तीची क्षमता ओळखून ते मदत करीत. असं असूनही यश साजरं करतांना ते मागे राहणचं पसंत करत.

**मराठी वाङ्मयातील साहित्यसूर्य :**

मानवतेचा कळवळा व मराठी भाषेवरचं प्रभुत्व यामुळेच 'नटसम्राट' व 'विशाखा' सारखे साहित्य जन्माला आले. एवढ उत्तुंग कर्तुत्व व अनेक पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे तर होतेच पण शेवटपर्यंत अत्यंत नम्र व सत्कार्याला वाहून घेतलेले जीवन ते शेवटपर्यंत जगले. शिक्षण क्षेत्रात त्यांनी खूप मार्गदर्शन केले. आजची परीक्षा पद्धती मुलांसाठी निष्ठुर पद्धती आहे असे त्यांचे मत होते. इतरही अनेक क्षेत्रात त्यांनी लोकांना योग्य मार्ग दाखवले. त्यांचे घर म्हणजे तीर्थक्षेत्र झाले होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ स्थापण्यात आलेल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानाचे समाजातील गरीब, गरजू व मागासलेल्या जनतेसाठी योगदान वाखाणण्या सारखे आहे.

अशा प्रकारे १० मार्च १९९९ रोजी मराठी भाषेचे अलौकिक भाषासौंदर्य मांडणारे कवी कुसुमाग्रज यांचे निधन झाले. एकप्रकारे मराठी वाङ्मयातील साहित्यसूर्य मावळला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात कुसुमाग्रजांच्या निधनाने जी पोकळी निर्माण झाली ती कधीच भरून निघणार नाही. नाशिककरांना तर आपल्या घरातील वडीलधारं माणूस गमावल्याचं दुःख आहे. अशा प्रकारे कुसुमाग्रज हे चतुरस्त्र साहित्यिक मराठी वाङ्मयात तसेच जनासामान्यांच्या मनात अजरामर आहेत.

* * * * *

# नटसम्राट वि.वा.शिरवाडकर



**कु. स्नेहल अरुण जाधव**
बी.ए.–२

मराठी भाषेतील प्रसिद्ध कवी विष्णु वामन शिरवाडकर यांनाच कुसुमाग्रज या नावाने ओळखले जाते. त्यांना आपल्या प्रभावी साहित्यलेखनामुळे ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले होते. २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी राजभाषा दिन' साजरा केला जातो. हा त्यांचा जन्मदिन आहे.

१९४२ साली 'विशाखा' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर 'दूरचे दिवे' हे नाटक, 'आमचे नाव बाबुराव', 'ययाति आणि देवयानी' आणि 'नटसम्राट' या महान नाट्यकृतीसाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आणि १९८८ साली ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांच्या साहित्य सेवेचा गौरव करण्यात आला. अशा या कविश्रेष्ठांचे १० मार्च १९९५ रोजी निधन झाले.

'नटसम्राट' हे नाटक मुळात विल्यम शेक्सपियरच्या एकाहुन अधिक अजरामर कलाकृतींवरून घेतले होते. मुळ नाट्याचे ते भाषांतर आहे. वि.वा. शिरवाडकरांनी आपल्या प्रतिभेने विस्तारले आणि मराठी एक एकमेव द्वितीय नाटक अवतरले.

''नटसम्राट'' या नाटकात लेखक कुसुमाग्रज यांनी अतिशय सामाजिक वर्तनाचे प्रत्यक्ष चित्र वाचकांसमोर उभे केले आहे. हे नाटक वाचतांना सुरुवातीला खुप उत्सुकतेने वाचक हे नाटक वाचतात. पण जेव्हा या नाटकाचा शेवट होतो. तेव्हा वाचकांचे डोळ्याचे पारणे फिटतात व अश्रु वाहते.

नुकताच अप्पासाहेब बेलवलकरांचा पुष्पहार घालुन सत्कार केले असता तसेच त्यांना 'नटसम्राट' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केलेला असतो. त्यांना चाळीस हजारांची ही भरभक्कम थैली अप्पा साहेबांना दिलेली असते. त्यांच्या आयुष्यात ते सफल व समाधानी जीवन जगत असतात. अत्यंत उत्कृष्ट असा व्यक्तीमत्त्व असणारे तसेच सर्वांशी आपुलकीने वागवणारे अप्पासाहेब बेलवलकर आहेत. त्यांची ओळख खुप दुर पर्यंत आहे व त्यांची भाषा ही अगदी गावातल्या व्यक्ती प्रमाणेच आहे. 'जसा देश तसा वेश' या म्हणीप्रमाणे अप्पा चे व्यक्तीमत्त्व आहे व त्यांना 'महान नट' असे संबोधले जाते.

नटसम्राटाची पत्नी हे या नाटकातील नटसम्राटा बरोबरच महत्त्वाचं पात्र. अतिशय कमी संवाद असलेली पण प्रसंगाचे गांभीर्य दाखवणारी अशी ही भूमिका समर्थपणे पेलली आहे. मोजकीच पण सूचक वाक्य आणि काही वेळा एक दोन शद्बांच्या पलिकडे न जाणारी प्रतिक्रिया आणि केवळ देहबोलीतुन व्यक्त होणारी ही भूमिका खुप काही सांगुन जाते.

या नाटकातील मुख्य भूमीका म्हणजे अप्पा आहे. व त्यांची पत्नी त्यांच्या सहधर्मिनी पाठराखीन म्हणुन काम करते. अप्पा हे पात्र त्यांच्या कुटुंबात प्रमुख आहे. त्यांना नंदा व नलु हे दोन अपत्य असतात. त्यांच्यासाठी सुप्रसिद्ध नाटककार अप्पासाहेब बेलवलकरांनी अतिशय मेहनत करून कमवलेले पैसे आपल्या दोन्ही लेकराचे स्वाधीन करतात.

'नटसम्राट' गणपतराव बेलवलकर नाटक व्यवसायातुन निवृत्ती पत्करतात. पत्नी कावेरी, मुलगा, सुन, मुलगी यांच्याबरोबर समारंभ साजराज करत असतांनाच बेलवलकर आपलं घर मुलाच्या नावावर करतात. नटसम्राट अशीच त्यांची ख्याती असतात. ते शरीराने निवृत्त झाले असले तरी मनाने निवृत्त कधीच झाले नव्हते. नाटकातच त्यांचा मन रमलेला असतो. या गोष्टींचा त्यांच्यावर आणि सभोवतालच्या लोकांवर विपरीत परिणाम होऊ लागतो. जे होते ते सर्व मुलामुलीच्या नावावर करून ते कसे फसतात. हे या नाटकात स्पष्ट होते.

चाळीस वर्षे रंगभूमीवर असंख्य मानसन्मान प्राप्त केलेला हा 'नटसम्राट' निष्क्रीय होतो. त्याच्या आयुष्याची एक असंख्य फटफट निर्माण होते.

गणपतराव बेलवकर हे सर्वांना आपलसं करत असत. पण जेव्हा अप्पाची वेळ येते तेव्हा. त्याला म्हातारपणी त्यांना कोणी

आपलं म्हणत नसतं. तो सर्वांसाठी आहे पण त्याच्यासाठी कोणही नसत. असे हे नाटकाचा भाव लक्षात येतो. महान व्यक्तीचा अंत शोककारक असतोच; पण त्याचे मोठेपण सामान्य व्यक्तीच्या भावनांना एका विशिष्ट अंतरावरच ठेवते. त्या महानतेची स्मृती जाणवण्या पलीकडे दिवस माळण्यापलीकडे सामान्यांचा आयुष्यांत त्यांच्या अखेरीला स्थान नसते.

'नटसम्राट' हे नाटक अत्यंत लोकप्रिय आहे. त्यामागील कारण म्हणजे संयुक्त कुटूंब पद्धतीचे वर्णन केले आहे. नंतर त्या कुटूंबाची दुर्दशा होतांना दिसते. (वाचण्या त्यांच्या मनात खळबळ निर्माण होते.)

आप्पासाहेबांनी आपलं घर व संपत्ती आपल्या मुला-मुलीच्या नावावर करतात. तेव्हा (सरकार) म्हणजे आप्पासाहेबांची पत्नी कावेरी ऐकतात. ती म्हणते की, ''एवढी घाई कशाला केली. ही माणसे वाईट नसली तरी म्हातारपण वाईट असतं.'' पुढचं वाढलेलं ताट द्यावं पण बसायचा पाट देऊ नये. असे कावेरी आप्पांना सांगतात. पण अप्पा हे खुप प्रेमाळु मायाळू वृत्तीचा असतो. त्यांना आपल्या मुला मुलीवर पुर्ण विश्वास असतो. ज्याप्रमाणे अप्पा त्यांच्या मुलाच्या लहानपणी वागवले त्याचप्रमाणे त्यांचे मुलं सुद्धा त्याप्रमाणे त्यांचे मुल सुद्धा त्यांना वागवेन याची खात्री अप्पांना होती. व त्याच रात्री अप्पानी कावेरीसाठी चंद्रहार आणला होता. दोघेही वयस्कर झालेले आहेत पण त्यांच्यातील प्रेम मात्र तरुण आहे. तो चंद्रहार कावेरीला खुप आवडतो.

त्यांचा मुलगा नंदा हा नोकरी करतो तेव्हा त्यांना दोघांना सांभाळण्याची जबाबदारी तो घेतो. अप्पा हळू हळू म्हातारे होतात तेव्हा त्याच्या स्वभावात व वागण्यात बदल होतो. नंदा मुलगी सुहास ही अप्पासोबत खेळते. हसते अप्पा तिला ठमी म्हणत असत. परंतू शारदा म्हणजे नंदाची पत्नी हिला आवडत नसे. तेव्हा सुहास हिला अप्पासोबत खेळण्याची सक्त मनाई असते. अप्पाच्या खोलीत जायची त्याल परवानगी नसते. तेव्हा त्यांच्या घरात एक मोठ वाद तयार होतो. म्हणुन तिथुन घर सोडून जाण्याचा निर्णय घेते. व दोघेही ते घर सोडुन जातात.

अप्पा व कावेरी हे दोघे मुलीच्या घरी जातात. तेथे ते राहतात पण मात्र म्हातारपणीचा काळ सर्वांसाठी खुप अवघड असतो. कुठेही हीच परिस्थिती असते. येथे नलु काळजी घेते पण तिथेही दोघांची तिच परिस्थिती असते. कावेरी ही खुप अशक्त झालेली असते तर अप्पा हा सुद्धा खुप थकलेले असतात. ऐवढ्यातच नलुच्या घराचे पैसे चोरिला जातात. नलुला वाटते की आपल्या अप्पांनी हे पैसे चोरी केले असेल म्हणुन ती त्यांना विचारते. तेव्हा अप्पांना हे सहन होत नाही. त्यांना खुप मोठा धक्का बसतो. अप्पासाहेब बेलवलकर-नटसम्राट-लक्षावधींची मालमत्ता गुलाल-बुक्क्यांप्रमाणे ज्यात उधळून दिली. तो गणपतराव बेलवलकर चोर ठरला असे विचार अप्पाचे मनात येतात.

नलुचा गैरसमज होते हे कावेरीला समजते. पण अप्पा मात्र रागात असतात. तिच्याबद्दल तो काही ऐकुण घेत नाही. कावेरीचे हे शेवटचे म्हणावे असेवाटते. अप्पांना सोडुन त्याची सरकार निघुन जाते. त्यांची साथीदार त्यांच्या आयुष्यात सोबत राहणारी सरकार आता मात्र अप्पाला एकट्याला सोडुन जाते.

अप्पा तिथुन घराच्या बाहेर निघून जाते.

''कुणी घर देता का घर
एका तुफानाला
कुणी घर देता घर?''

असे म्हणत ते फिरवतात आणि ऐवढ्यात त्यांची एका शेतकऱ्यासोबत भेट होते. दोघातही संवाद सुरु होतो. व तो शेतकरी व त्याची पत्नी हे दोघे अप्पाला आग्रह धरतात की बाबा चला आता खुप पाऊस पडतो थांबा रख वाटत आहे. पाऊस पाण्यात कुठं थांबता येथे तु चल आमच्यासोबत पण मात्र अप्पा त्यांच एकेत नाही. ते दोघेही निघुन जातात व अप्पा हे गाणी म्हणत जंगलात निघुन जातात.

अप्पा हे फिरत फिरत मुंबईला येतात. तेथे एक मुलगा बसलेला असतो. तो बुट पॉलीश करणारा असतो. तो अप्पाचे हात धरुन आणतो व त्याच्याजवळ बसवतो. राजाला अप्पा म्हणतात. मागे ही इमारत कशाची आहे राजा म्हणतो. थेटर आहे बाबा नाटकाच 'बहुत लोग आते है इधर' असे तो म्हणतो पण हिंमत करून आपल्याला हे नाटक काय चीझ असते हे आपल्याला पाहायचे. तू नाटक

पाहिला का बाबा. तेव्हा अप्पा म्हणतो नाटक पाहिला म्हणुन सगळा घोटाळा झाला. तेथे चाललेल्या खेळाच नाव ऑथेल्लो ज्युलीयस सीझर हे नाटक सुरु असतं अप्पा राजाला या नाटकाबद्दल सांगतात. येथे हे स्पष्ट होते की, जवळचे कामे न येता परकेच कामे येतात. राजा हा अनोळखी असुन अप्पाची मदत करतो.

थिएटर मधले प्रेक्षक नाटक पाहुन बाहेर येतात. ते पाहत असलेल्या नाटकाबद्दल आप–आपले मत व्यक्त करतात. तेवढ्यात पहिला प्रेक्षक हा गणपतराव बेलवलकर यांच नाव घेतो. तो म्हणतो त्यानं स्टेजवर पाऊलं टाकलं की आफ्रिकेचं घनघोर जंगल मनामध्ये शिरत असे. व बेलवलकराबद्दल तो आपले मत व्यक्त करतो. दुसरा जो प्रेक्षक असतो त्याने अप्पा साहेबांना कधी पाहिलेले नसते. तेव्हा जो पहिला प्रेक्षक म्हणतो तो जो म्हातारा बसला आहे ना? असाच चेहरामोहरा असतो त्यांच तो फक्त त्याला समजाव म्हणुन अप्पाच उदाहरण देतो. पहिला प्रेक्षक काहितरी खात असतात तो पदार्थ अप्पाला देतो. तेव्हा अप्पा म्हणतात तुम्ही माझ्याबद्दल म्हणत होता. तेव्हा तो प्रेक्षक म्हणतो तुमच्या बद्दल नाही हो बेलवलकरांबद्दल बोलत आहो आम्ही. अप्पा म्हणतो गणपतराव बेलवलकर का? गेला बिचारा. अप्पा हा जिवंत असतांनाच स्वतःला मेल्याची घोषणा करतो. तो प्रेक्षक हा चकीत होतो. गणपतराव बेलवलकर मेला याची शहानिशा करावी लागेल असे म्हणतात व निघुन जातात.

अप्पा जवळ पुन्हा राजा येतो दोघेही संवादात व्यस्त होतात. व अप्पाला जो पदार्थ खायला देतो तो फेकून देतो व अप्पासाठी फर्मास मऊ पापडी आणतो. अप्पा राजाला त्याच्या घराबद्दल विचारतो तो म्हणतो तुला माझ्या पोरांनी टाकलं, मला माझ्या आई बापांनी टाकलं. जेथे राजा राहतो तेथे तो अप्पाला घेऊन जाणार होता. पण तेथे विठोबा येतो. विठोबा हा नलुच्या घरी काम करत असतो. तो अप्पाच मार्ग काढत मुंबई पर्यंत येतो. व तो घरच्या सर्व मंडळींना सूचना देतो. घरचे सर्व येतात. नंदा, नलु हे अप्पाची क्षमा मागतात व तुम्ही कुठेही रहा तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही. राजा हा अप्पांसाठी भांडण करतो. तो म्हणतो, तुम्ही सोडला, मला सापडला. सुधाकर त्याला धमकी देतो पण राजा मात्र जरा भीत नाही. जाधवराव (इन्स्पेक्टर) हा राजाला मारतो. त्याच्या तोंडातून व नाकातुन रक्त वाहत असते. अप्पा वेगाने उठतात व म्हणतात हे तलवारी म्यानबंद करा. जिथे तुमची गरज आहे तिथे जा. ईश्वराने तुर्कापासुन आमचं रक्षण केल आणि आता आपणच परस्परांचा संहार करायला लागलो आहोत.

नलु अप्पाला म्हणते, अप्पा तुमचा राग अजून गेलानाही का? तेव्हा अप्पा म्हणतात. ''माझ्या लाडक्या कोकरा रागालोभाची भावना आता माझ्या मनात शिल्लक राहिली नाही. चैत्रातील सोनेरी सकाळ माझ्या अंगातुन झिरपते आहे. नव्या नाटकाचा पडदा वर जायची वेळ आली आहे. हो राजानं मला सांगितले आहे हे थिएटर आहे म्हणुन. बस आणखी काय हवं? राजा, माझ्याजवळ ये बाळ ठमे तुही ये भवाने दोघांना जवळ घेतोग नटाजवळ शिल्लक राहतं ते फक्त नाटक, कर्णान मरतांना आपल्या सोन्याचा दात काढून दिला मी नाटकाशिवाय काय देणार तुम्हाला?''

या नाटकाच्या शेवटी अप्पा म्हणतो की अगणित माणसांच्या या दुनियेतील असा एकच माणूस मला माहित आहे की, जो आपल्या जागेवर ठाम उभा राहतो. आणि तो मी आहे. तो मी आहे ज्युलियस सीझर मी आहे, ऑथेल्लो मी आणि हॅमलेट मी आहे. गणपतराव बेलवलकर, 'नटसम्राट' सगळे महापुरुष आले आहेत. मला या ज्युलियस सीझरला मारण्यासाठी मला चहुबाजुंनी घेरलयं. अप्पा हा स्वतःला मार लागला आहे याचा अभिनय करतो व खाली कोसळुन पडतात.

अप्पा शेवटचे वाक्य उद्‌गारतात असं नाटकं असतं राजा असं व या नाटकाची समाप्ती होते.

मला या नाटकातुन असे समजले की, जेव्हा माणूस आपल्या आयुष्याची सर्व जमा पुंजी आपल्या मुलांच्या नावावर करतात आणि जेव्हा त्याच म्हातारपण येते तेव्हा त्याला सांभाळण्यासाठी मुलं हे त्याच्या कर्तव्यापासून चुकतात आणि या आधुनिक युगात आई–वडील म्हणजे एक ओझं समजत आहे. त्यांना आपलच घरदार असुन सुद्धा वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येते. हे या नाटकातुन स्पष्ट होते.

* * * * *

# आत्मनिष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर



**कु. आदिती अनुप ढोरे**
बी.कॉम.– ३

वि.वा. शिरवाडकर यांचे संपूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर. हे एक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी लेखक होय. त्यांचा कार्यकाळ हा २७ फेब्रुवारी १९१२ ते १० मार्च १९९९ एवढा राहिलेला आहे. हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील एक मौल्यवान दैदिप्यमान असे रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरी साहित्यिक होते. त्यांचा जन्म २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' अथवा 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून साजरा होतो.

मराठी अभिरूचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक, समीक्षक, प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शद्बकलेवरचे प्रभुत्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तीमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या शोधक आणि चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष ईश्वरांसंबंधी प्रश्न उपस्थित करायला आणि माणसाच्या समग्रतेचे आकलन करायला प्रवृत्त केले. त्यांचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्व वैविध्यपूर्ण आणि प्रसन्न रूपात त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे. मराठी कुसुमाग्रजांच्या कविता तरूणांना प्रेरणा देणाऱ्या आहेत.

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मुळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे बदलले गेले. कुसुमाग्रजांचे वडील वकील होते, वकिलांच्या व्यवसायासाठी ते पिंपळगाव बसवंत या तालुक्याच्या गावी आले, कुसुमाग्रजांचे बालपण येथेच गेले.

कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती, एकुलती एक बहिण सर्वांची लाडकी, म्हणून कुसुमाचे अग्रज म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासुन शिरवाडकर कवी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथील हं.प्रा.ठा. कला महाविद्यालयातून त्यांनी आपले बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहीणे, चित्रपटात छोट्या भुमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले.

१९३० मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रह यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतीकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासुन झाली आहे. १९३३ साली त्यांनी 'ध्रुव मंडळा'ची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.

पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ.अ.ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपुन ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि.वा. शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले.

१० मार्च १९९९ रोजी शिरवाडकरांचे निधन झाले. वि.वा. शिरवाडकर यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' नावाची संस्था उभारण्यात आली आहे. त्यांच्या नाशिकमधील टिकळवाडी येथील निवासस्थानी आता मराठी पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे.

सामाजिक अन्याय व विषमता या विषयांवर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लिखानातुन कठोर टिका केली. 'साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे' या मताचा त्यांनी पुरस्कार केला.

नाटक, कादंबरी, कथा, लघुनिबंध इत्यादी साहित्यप्रकार त्यांनी हाताळले.

प्रा. देवानंद सोनटक्के यांच्या मतानुसार कुसुमाग्रजांचा साहित्यविचार पूर्णतः लौकिकवादी आहे. एका समाजमनस्क कलावंताच्या सामाजिक चिंतनाचा आलेख त्यात उमटला आहे. कलावादाचा अतिरेक आणि सामाजिकतेचा तिरस्कार अशा द्वंदात अडकलेल्या मराठी साहित्यव्यवहारात त्यांनी समन्वय साधला आहे. कलाक्षेत्रात त्या त्या वेळी निर्माण झालेल्या संभ्रमावस्थेचे पितामहाच्या भूमिकेतून केलेले ते मार्गदर्शन आहे.

कुसुमाग्रज हे अंहकार, अनुभव आणि आविर्भाव ही कलेची आधारभूत तत्वे मानतात, त्यांचा हा विचार लेखकसापेक्ष आहे. अहंकार लेखकाच्या लेखनप्रक्रियेला प्रेरणा आणि गती देतो, हे तत्त्व लेखकसापेक्ष आहे. आविर्भाव आशयाचा आकार म्हणजे घाट ठरवितो, म्हणजे हे तत्त्व कलाकृतिसापेक्ष आहे. वर्चस्व हे तत्त्व रसिकसापेक्ष आहे, तर लेखकाच्या अनुभवाची समृद्धी लेखकाच्या सामीलकीवर अवलंबून असते, हे तत्त्वस समाजसापेक्ष आहे. समाजसापेक्ष असुन ते सामाजिकतेलाच परतत्त्व मानतात.

यानंतर कुसुमाग्रज कलेच्या आविर्भाव या तत्त्वाचे विवेचन करतात ते म्हणतात, साहित्याचे साहित्यत्व सिद्ध होते ते आविर्भाव व अनुभव या तत्वांमुळे आविर्भाव म्हणजे जे अरुप आहे किंवा विरुप आहे त्याला परिणामकारक, सौंदर्यबुद्धीला आवाहन करील असा आकार देण्याची प्रवृत्ती होय. अनुभव मुळात निराकार व निरामय असते. आविर्भाववृत्ती त्याला शद्बांच्या साह्याने आकार देते, रूप देते. शद्ब हे या वाङ्मयीन आविर्भावाचे साधन आहे. कुसुमाग्रजांच्या मते, साहित्यप्रकारांचा जन्मही या वृत्तीतुनच होतो. ही वृत्ती मनोगताची रहदारी सुलभ करण्यासाठी साहित्यप्रकार जन्माला घालते. वाङ्मयप्रकारात जे काळानुसार बदल होतात त्याचेही कारण कुसुमाग्रज ही वृत्तीच मानतात. त्यांच्या मते आग्रहामुळेच हे बदल होतात. काळाची गरज भागविण्यासाठी आविर्भाववृत्ती वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे साहित्येप्रकार जन्मास घालते असे म्हटले जाते.

कुसुमाग्रजांच्या मते, आविर्भावाने साहित्याचे रूप ठरते तर अनुभवाने त्याचा आशय निश्चित होतो. अनुभव या संज्ञेचा अर्थ प्रत्यक्षाशी येणारा संबंध असा नसून, लेखकाच्या मनात उद्‌भवणारी एक भावावस्थेतील जाणीव असा आहे. म्हणजे लौकिक अनुभवानंतरची लेखकाची भावावस्थाच कलाकृतीचा आशय निश्चित करते. आविर्भाव आणि अनुभव यांच्या संयोगाने साहित्याचे पोत तयार होत असले तरी त्यातील धागेपणाचे स्थान अनुभवाकडे आहे. लेखकामध्ये अहंकाराची प्रेरणा प्रबळ आहे, आविर्भावाचे सामर्थ्यही प्रभावी आहे; परंतु त्यची अनुभव घेण्याची शक्ती जर संकुचित, बोथट आणि केवळ वरच्या थरालाच स्पर्श करणारी असेल तर त्याचे साहित्य उथळ आणि घायपाताच्या रेशमी कापडासारखे दिखाऊ परंतू तकलादू होण्याची शक्यता असते.

म्हणजे जे स्थान मर्ढेकर आत्मनिष्ठेला देतात तेच कुसुमाग्रज अनुभवाला देतात. या अनुभवाचे अधिक विश्लेषण करतांना ते म्हणतात, अनुभव प्रत्येक माणसागणिक वेगळा असल्यामुळे एकाच विषयाबाबत सारखेपणा येत नाही.

कुसुमाग्रजांच्या मते, काव्य हा माणसाच्या भोवतालच्या परिसराशी असलेला संवाद होय. आपल्याला उत्कटपणे जाणवलेले दुसऱ्यांपर्यंत पोहोचवणे ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. काव्यातून हा अनुभव दुसऱ्यांपर्यंत पोहचतो तेव्हा कवीला मीपण व्यापक झाल्याचे समाधान मिळते म्हणजे त्याचा अहंकार सुखावते. एकाचा अनुभव अनेकांचा होतो.

कुसुमाग्रजांच्या मते, हीच काव्यलेखनाची प्रक्रिया व प्रेरणा होय. येथे शद्बांच्या द्वारा कवीचे व्यक्तीत्व बाहेर पल्लवीत होते. कवी काव्याचे साहाय्याने एक सामाजिक संबंध जोडीत असतो. अशाप्रकारे काव्य म्हणजे अखेरतः कवी आणि वाचक यांच्यामधला एक शद्बांकित प्रतिमामय संबंध होय.

काव्य हा कवीचा आत्माविष्कार असला तरी आत्माविष्काराची परिणिती जेव्हा शद्बांच्या द्वारा संवादात होते, तेव्हाच काव्याचा उदय होतो. हा आविष्कार जेव्हा शद्बाचा म्हणजे सामाजिक व्यवहाराच्या माध्यमाचा आश्रय घेतो तेव्हा तो काव्यरूप पावतो. म्हणजे काव्यातील अविष्कारात कल्पना आणि रचना यांचेही पदर विणले जातात.

कुसुमाग्रज साहित्य आणि समाजाचे नाते मानतात. त्यांचा साहित्यविचार लौकिकवादी आहे, जीवनवादी आहे. मानवी

संसाराच्या समग्र नकाशात साहित्याच स्थान असते; तर मानवी जीवनाच्या आराखड्यातच साहित्यशास्त्राचे स्थान असते, असे सांगुन कुसुमाग्रजांनी साहित्य आणि जीवनाचा संबंध जोडला आहे. ते म्हणतात, साहित्यिकाची प्रतिभा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पाय–नव्हे सारे जीवन पृथ्वीवरती टेकलेले असते. लेखकाचे व्यक्तित्व स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही.

परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया–प्रतिक्रियांतुन त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो. लेखकाच्या अलिप्ततेतुन निर्माण होणारे साहित्य आणि साहित्यशास्त्र केव्हाही निरामय आणि विकसनशील असू शकणार नाही. साहित्य विचाराबाबत निर्विकल्पतेचा आव खरा नसतो, असे ते म्हणतात. कुसुमाग्रज साहित्याच्या सामाजिकतेचा पुरस्कार आणि जातीयतेचा निषेध करतात. त्यांच्या मते साहित्य आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध असतो.

**✻ पुरस्कार :–**

- **महाराष्ट्र सरकारचे उत्कृष्ट पुस्तकासाठीचे पुरस्कार :–**
  - 'मराठी माती' ला १९६० साली.
  - 'स्वगत' ला १९६२ साली
  - 'हिमरेषा' ला १९६२ साली
  - 'नटसम्राट' ला १९७१ साली

- **'नटसम्राट' ला साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९७४).**

- **'ययाति आणि देवयानी' या नाटकास १९६६ या वर्षी तर संगीत 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकास १९६७ मध्ये राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले.**

- **'विशाखा' कवितासंग्रहाला ज्ञानपीठ पुरस्कार.**

- **भारत सरकारचा साहित्यक्षेत्रातील योगदानाबद्दल 'पद्मभूषण पुरस्कार' (१९९१ साली).**

- **भारत सरकारचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार.**

✻ ✻ ✻ ✻ ✻

# ''कुसुमाग्रज आणि मराठी साहित्य...''



**भाग्यश्री शैलेश धोंगडेकर**
बी.कॉम.–३

''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी.''

२७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस प्रख्यात कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्य साजरा केला जातो. ते एक महान नाटककार, कथाकार, उपसंसाधक होते. कुसुमाग्रज यांचे संपूर्ण नाव विष्णु वामन शिरवाडकर असे होते. यांचा जन्म महाराष्ट्राच्या पुणे येथे झाला. त्यांचे मुळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांच्या काकांनी त्यांना दत्तक घेतल्यामुळे त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे झाले.

कुसुमाग्रज यांचे वडील वकील होते. त्यांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती. एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणुन कुसुमचे अग्रज नाव म्हणुन कुसुमाग्रज टोपणनांव त्यांनी धारण केले.

नाशिक येथे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बी.ए. ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे आणि चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणुन त्यांनी कामे केले. १९३० मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रज यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरूवात याच लढ्यापासुन झाली. १९३३ साली त्यांनी 'ध्रुव मंडळाची' स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.

स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी वृत्तपत्रांचे संपादक म्हणुन काम केले. सत्याग्रहातही त्यांनी भाग घेतले. त्यांनी ध्रुव मंडळाची स्थापनाक`ली. तत्पश्चात ते मुंबईला आले. त्यांना तिथे मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ.अ.ना. भालेराव यांची भेट झाली. त्यांनी कुसुमाग्रज यांना नाटक लिहिण्यास प्रवृत्त केले. कवी असलेले कुसुमाग्रज यशस्वी नाटककार झाले. त्यांनी आपल्या लेखणांमधून सामाजिक अन्याय आणि विषमता या विषयांवर कठोर टीका केली.

पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ.अ.ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सूवर्णकाळ संपून ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि.वा. शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले. कविता, नाटक, कादंबरी, कथा, लघुनिबंध इत्यादी साहित्य प्रकार त्यांनी हाताळले.

त्यांचे साहित्यिक विचार लौकिकवादी आहे. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. कविता, नाटक, कादंबऱ्या, कथा, लघ निबंध इत्यादी प्रकारची साहित्य त्यांनी हाताळले. त्यांचे काही नावाजलेले साहित्य काव्य संग्रह– जीवन लहरी, किनारा, मराठी माती, वादळवेल, विशाखा ही आहेत. आणि काही नावाजलेले नाटक म्हणजे – दुसरा पेशवा, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, राजमुकुट इत्यादी. आणि काही नावाजलेल्या कादंबऱ्या म्हणजे जान्हवी, वैष्णव, कल्पनेच्या तीरावर, इत्यादी असे आहेत.

कुसुमाग्रज यांना आपल्या लेखनांसाठी अनेक पुरस्कार मिळालेले आहेत हे आपल्याला दिसुन येते. त्यातच काही म्हणजे– महाराष्ट्र सरकारने दिलेले काही उत्कृष्ट पुस्तकांसाठीचे पुरस्कार – 'मराठी माती'ला १९६० साली मिळाला, 'स्वागत'–१९६२

साली, 'हिमरेषा'–१९६२, 'नटसम्राट'–१९७१. नटसम्राट या साहित्याला अकादमीचा पुरस्कार १९७४ ला मिळाला. ''ययाति आणि देवयानी'' या नाटकास १९६७ मध्ये राज्य शासनाने पुरस्कृत केले. तसेच विशाखा कवितासंग्रहाला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. भारत सरकारचा साहित्यक्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभुषन पुरस्कार १९९१ साली मिळाला. त्याचबरोबर अखिल भारतीय नाट्यपरिषदेचा ''राम गणेश गडकरी'' पुरस्कार त्यांना १९६५ मध्ये प्राप्त झाला.

अंतराळातील एक ताऱ्यास ''कुसुमाग्रज'' हे नाव दिले गेले आहे. १९७४ साली ''नटसम्राट'' नाटकाला साहित्यसंघ हा पुरस्कार मिळालेला आहे. याचबरोबर त्यांना असले अनेक पुरस्कार महाराष्ट्र सरकार कडुन सन्मानीत केलेले आपल्याला आढळून पडते.

मराठी साहित्याला एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणजे कुसुमाग्रज. १९१२ मध्ये महाराष्ट्राच्या एका गावात त्यांनी जन्म घेवून लहान वयातच लेखनाला सुरूवात केली. त्यांचे म्हणने होते की महाराष्ट्राला एक समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे आणि मराठी हे देशातील सर्वांत जुनी आणि सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. मराठी भाषा दिन हा वारसा साजरे करण्याची आणि भाषेचा वापर आणि विकासाला चालना देण्यासाठी एक उत्कृष्ट संधी प्रदान करतो.

मराठी भाषेतली पद्य साहित्य आणि गद्य साहित्य हे भाषेच्या शास्त्रशुद्ध व्याकरणामुळे साकार झाले. वि.वा. शिरवाडकर, प्र.के. अत्रे, पु.ल. देशपांडे, चिं.वि. जोशी, कुसुमाग्रज, ग.दि. माडगूळकर, वि.स. खांडेकर, ना.सि. फडके यांसारख्या साहित्यीकांनी मराठीत आपल्या साहित्याची भर घालून मराठी भाषा, मराठी मनामनातून जागृत ठेवली आहे.

कुसुमाग्रज हे एक महान व्यक्तिमत्व होऊन गेले. ते आजही आपल्याला त्यांच्या साहित्यांच्या स्वरुपात आढळून येतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यकार होते. त्यांचे निधन १० मार्च १९९९ रोजी झाले. त्यांचा जन्म दिवस हा मराठी भाषा गौरव दिन अथवा मराठी राजभाषा दिवस म्हणुन साजरा केला जातो.

कुसुमाग्रज यांची एक ''स्वप्नांची समाप्ती....'' नावाची कवीता माझी अत्यंत प्रीय आहे. त्यांनी सुंदर वर्णन केलेले आहे.

''.... स्नेहहिन ज्योतीपरी मंद होई शुक्रतारा
काळ्या मेघखंडास त्या किनारती निळ्या धारा,
स्वप्नासम एक एक तारा विरे आकाशांत
खिरे रात्र कणकण प्रकाशाच्या सागरांत
काढ सखे, गळ्यांतील तुझे चांदणयाचे हात
क्षितिजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत....''

ही त्या कवितेतील काही माझ्या आवडत्या ओवी. असे कुसुमाग्रजांविषयी जेवढे बोलावे तेवढे कमीच. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत भव्य आहे. मराठी साहित्यात त्यांचा वाटा फार मोलाचा आहे....

माझ्या निबंधाला पूर्णविराम घालण्याआधी मी एक माझी अत्यंत आवडत्या कवितांचे चार ओळी सादर करते....

माय मराठी तुझीया पायी
तनमनधन मी वाढीयले...
तुझीया रानी–तुझीया रानी
अखंड रंगुनी राहीले...
माय मराठी तुझीया साठी
वात होऊनी जळते मी,
क्षणा–क्षणाला, कुणा–कुणाला
अखंड रंगूनी राहीले....

माझ्या भाषेबद्दल लिहावं तेवढे कमीच आहे, परंतु मी माझ्या निबंधाला विराम देते आणि आपले आभार मानते...

# कादंबरीतुन अभिव्यक्त झालेले कुसुमाग्रज



**कु. अंजली संतोष मस्के**
बी.कॉम.-२

'क्रांतीचा जयजयकार' करीत कुसुमाग्रज 'विशाखा' काव्यसंग्रहामुळे प्रसिद्धीस आले. तत्कालिन वातावरणामुळे ते झपाटले गेले. समाजाची प्रतिक्रिया त्यांनी अभिव्यक्त केली. त्याच्या तेजोपासक शद्बांतून संघर्षाला कालातीत स्वरूप प्राप्त झाले.

कुसुमाग्रजांचा पिंड सौंदर्यलक्षी आत्मनिष्ठ कवीचा; मूर्तापेक्षा अमूर्ताकडे, व्यक्तापेक्षा अव्यक्ताकडे जाणाऱ्या ओढीचा होता. त्यांची दृष्टी सारखी कशाचातरी वेध घेतांना दिसते. आत्मचिंतन, देव, प्रीती; तर कधी सामाजिक अंतर्जीवनाचा शोध यांचा वेध ती घेते. गतीची विलक्षण ओढ, हीही त्यांच्या काव्याची प्रेरणा होती. उदा., 'पृथ्वीचे प्रेमगीत' तसेच विश्वातील प्रेरणा होती. जीवनासंबंधीचे कुतूहल, औत्सुक्य यामुळे त्यांची कवीता रसरसीत, टवटवीत राहिली आहे.

विष्णु वामन शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, काव्य लेखक व शेक्सपिअर, गडकरी यांच्या जातकुळीतले शिरवाडकर नाटककार होते. 'नटसम्राट', 'ययाती आणि देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदुषक', 'आनंद' अशी नाटके नाट्यसृष्टीची लेणीच होत. त्यातलं काव्य नि स्वगत लक्षणीयच.... उदा. 'सृष्टीतील सृजनशक्तीचा मी आहे एक खास उन्मेष....'

सारख्या ओळींनी मनातल्या त्वेषाला वाट फोडली. भोवतालच्या घडामोडींचे संस्कार ज्यांच्या ज्यांच्या मनावर ह्या काळात जाणतेपणाने उमटत राहिले होते त्या यौवनकाळातले उद्गाते कुसुमाग्रज होते.

मानवाचे दुःख मानवानेच निर्माण केले आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. परमेश्वरावर आग पाखडण्याऐवजी माणसातील मानवता जागृत करण्यातच त्यांचे मन रंगते, एकीकडे विश्वाचे गुढ, जीवनातील प्रश्न त्यांना हतबुद्ध करतात. वयाच्या अठराव्या वर्षी कुसुमाग्रजांचा 'माधवी' हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'ज्योत्स्ना' मासिकात १९३६ मध्ये कुसुमाग्रजांची स्वप्नाची समाप्ती ही कविता प्रसिद्ध झाली.

त्यामुळे त्यांच्यावर 'उद्याचा कवी ही मुद्रा उमटली.' वि.स. खांडेकरांनी त्यांना पाहिलेली नव्हते तरी त्यांचे 'विशाखा' हे काव्य स्वखर्चाने छापले. त्यांचे पहिले १९४२ चे विशाखा चे प्रकाशक खांडेकर होते. म्हणजे आपल्या काव्यशक्तीद्वारा कवितेवर प्रेम करण्याच्या जेष्ठ व मान्यवर व्यक्तीवरही कुसुमाग्रजांचा किती प्रभाव होता हे लक्षात येते.

अन् लावा हृदयात सख्यांनी आशेची वात! कुसुमाग्रज या स्थितप्रज्ञ तपस्वी कलावंताचे अंतःकरण सागरासारखे विशाल आणि खोल आहे. त्यांचे धैर्य आणि शांती एखाद्या व्यवहारातल्या सुख-दुःखांचे प्रचंड आघातही विचलित न होता अबोलपणे सोसण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्याजवळ होते. माणसांच्या गराड्यात राहूनही ते आजन्म एकाकी होते, अस वर्णन वसंत कानेटकर करतात.

घरातील पोषक वातावरण, घरातील पुस्तकांमुळे निर्माण झालेली वाचनवेड लहाणपणीचे संस्कार अन् इतिहासाप्रमाणे यातुन कुसुमाग्रज काव्यलेखनाकडे वळले. कविता म्हणजे केवळ अर्थात्मक विधान वा एखाद्या विधानंच सालंकृत पद्यमय स्वरुपही नसुन, एखाद्या अनुभवाचा व गाभ्यापर्यंत नेणारी ती एक अलौकिक शक्ती असते.

याचा प्रत्यय त्यांच्या दत्तोपंत पुरोहित या शिक्षकामुळे आला. जीवन ही एक लढाई आहे. व तिच्यात अनेकदा मानव होरपळून निघत असला, तरी तो आणि शरणागती स्वीकारत नाही, यातच कुसुमाग्रजांना समाधान आहे.

कुसुमाग्रजांना मानवतेचा कवी असे वि.स. खांडेकर संबोधनात अंतराग्नी क्षणभर फुलवणारी, चिरयौवना प्रतिभेचे नव्या उन्मेषांची साक्ष देणारी त्यांची कविता 'झरा मुळाचाचि खरा' आहे.

गोविंदाग्रजांच्या काव्यगायनाने त्यांना जाणीव आली की, 'शद्बसंपत्ती वाढवण्यापेक्षा काव्याचं काहीतरी वेगळं कार्य आहे.' आपल्या व्यक्तिमत्त्वाची मुलद्रव्ये कवितेमध्येच प्रवाहित होताहेत, असं त्यांना वाटे. ते म्हणत, ''पहिला दिवा कुठल्यातरी मोठ्या दिव्यावर पेटवावा लागतो.''

हे कार्य माझ्या बाबतीत गडकऱ्यांच्या साहित्यांन केल. बालकवी, गडकरी, माधव, ज्युलियन, भा.रा. तांबे व केशवसुत यांना मी निष्ठेनं वाचलं. त्यांनी मला खुप दिलं.

वयाच्या अठराव्या वर्षी कुसुमाग्रजांचा 'माधवी' हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'ज्योत्स्ना' मासिकात १९३६ मध्ये कुसुमाग्रजांची स्वप्नाची समाप्ती ही कवीता प्रसिद्ध झाली. त्यामुळे त्यांच्या त्यांच्यावर 'उद्याचा कवी' ही मुद्रा उमटली. दुसरीकडे मानवानेच मानवतेची केलेली विटंबना व पायमल्ली दिसते आहे. त्याचबरोबर मानवाची आपल्या अंगभूत दौर्बल्यावर मात करण्यासाठी चाललेली आहे.

ते म्हणत, 'पहिला दिवा कुठल्यातरी मोठ्या दिव्यावर पेटवावा लागतो.' हे कार्य माझ्या बाबतीत गडकऱ्यांच्या साहित्यानं केलं बालकवी, गडकरी, माधव, ज्युलियन, भा.रा. तांबे व केशवसुत यांना मी निष्ठेनं वाचलं. त्यांनी मला खुप दिलं. पु.ल. देशपांडे म्हणतात, ''माझे जन्मनक्षत्र मला ठाऊक नाही; परंतु माझे तारुण्य जन्मले, ते कुसुमाग्रजांनी आकाशात सोडलेल्या विशाखा नक्षत्रावर...'' माझ्या माझ्या तारुण्यातला कवी मला भेटला. पुढील सारे दिवस 'विशाखा'चे. ह्या काळात प्रेम केल. ते विशाखातल्या ओळींनी प्रेमपत्रे सजवीत.

'कशास आई भिजविसी डोळे उजळ तुझे भाल<br>
रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल'

या सारख्या ओळींनी मनातल्या त्वेषाला वाट फोडली. भोवतलाच्या घडामोडींचे संस्कार त्यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी कुसुमाग्रजांच्या 'माधवी' हा संग्रह प्रसिद्ध झाला. 'ज्योत्स्ना' मासिकात १९३६ मध्ये कुसुमाग्रजांची स्वप्नांची समाप्ती ही कविता प्रसिद्ध झाली. त्यामुळे त्यांच्यावर 'उद्याचा कवी' ही मुद्रा उमटली.

वि.स. खांडेकरांनी त्यांना पाहिलेलेही नव्हते. तरी त्यांचे 'विशाखा' हे काव्य स्वखर्चाने छापले. त्यांचे पहिले १९४२ चे विशाखा चे प्रकाशक खांडेकर होते व समीक्षक होते. यांचा जन्म २१ फेब्रुवारी १९१२ रोजी महाराष्ट्राच्या पुणे येथे झाला. त्यांचे मुळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर होते. त्यांच्या काकांनी त्यांना दत्तक घेतल्यामुळे त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे झाले.

त्यांचे वडील वकील होते. कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती. एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणुन कुसुमचे अग्रज म्हणुन 'कुसुमाग्रज' असे टोपणनाव त्यांनी धारण केले. तेव्हापासुन शिरवाडकर कवी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले.

जोरकस सामाजिक आशय, सृष्टीचे वास्तव दर्शन, विचारांनी जाण व कर्तव्याचे भान असलेली उत्कट प्रीती रुपकात्मकतेने साधलेल्या कल्पनारोपित व्यक्तिमत्त्व, अत्यंत आवाहक कविता कुसुमाग्रजांनी दिली.

जोरकस सामाजिक आशय, सृष्टीचे वास्तव दर्शन, विचारांची जाण व कर्तव्याचे भान असलेली उत्कट प्रीती, रुपकात्मकतेने साधलेल्या दृश्य प्रतिमा, प्रभावी नाट्यमयता, निसर्गाचे कल्पनाशेपित व्यक्तिमत्व, अत्यंत आवाहक बौद्धिक प्रतिमा, अशी समृद्ध व्यक्तिमत्त्वाची कविता कुसुमाग्रजांनी दिली.

* * * * *

# स्वप्न साकारले!
# –डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवनचरित



**नेहा राघोजी आसोले**
बी.ए.–१

भारताचे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर अलीकडच्या काळात सुमारे दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पण ही सर्व पुस्तके मोठ्यांसाठी आहेत. परंतु स्वप्न साकारले हे पुस्तक कुमारवयीन मुलांसाठी आहे. लहान मुलांसोबत गप्पागोष्टी करायला कलाम यांना खुप आवडत असे.

आपण आजपर्यंत बघतो की, आजपर्यंतच्या राष्ट्रपतींमध्ये आपल्याला डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हेच 'मुलांचे राष्ट्रपती' म्हणता येईल. त्यांना मुले फार आवडत असतं. ते मुलांसोबत मिळुन–मिसळुन राहायचे. हे पुस्तक मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत लिहिले आहे. हे पुस्तक वाचत असतांना खरचं मी यामध्ये वाचतांना मग्न होऊन गेली. डॉ. कलाम यांचा हा जीवनप्रवास खुप खडतर होता. त्यांना अनेक मेहनती घ्याव्या लागल्या. शेवटी त्यांना त्यांच्या कार्याचे फळ मिळाले.

प्रस्तुत पाठाचे लेखक श्रीनिवास लक्ष्मण आहेत. या पुस्तकाची पहिली आवृत्ती मकरसंक्रांत १४ जानेवारी २००५ रोजी प्रकाशित झाली आहे. डॉ. कलाम यांनी कठोर परिश्रम घेतल्यामुळे ते सध्याच्या पदाला पोचले. त्यानी यश आणि अपयशातून बाहेर जाण्यासाठी मार्ग कसा काढला, हे या पुस्तकात सांगितले आहे. या गोष्टींचा मुलांच्या कोवळ्या मनावर चांगल्याप्रकारे प्रभाव पडेल. आपण जर खरोखरच कठोर परिश्रम घेतले, तर आपण सुद्धा यश प्राप्त करू शकतो, हे त्यांना पटेल. तेसच हा देशातील सर्व नागरिकांना सुद्धा संदेश आहे. या पुस्तकाच्या सुरुवातीलाच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हटले होते की, 'आपल्या देशाला देण्यासाठी आपल्याजवळ दहा मिनिटे आहेत का?' हे त्यांचा प्रश्न मला अगदी बरोबर वाटला. कारण आपण नेहमी म्हणत असतो महानगरपालिका कचऱ्याचे ढिगारे उचलण्यात दिरंगाई करते. फोन काम करत नाहीत, विमानसेवा ही जगातील अत्यंत भिकारसेवा आहे, पत्रे पत्त्यावर पोहचत नाही, असे आपण सतत म्हणत असतो. पण आपण याबाबत सुधारणा व्हावी यासाठी स्वतः काय करतो? असा प्रश्न डॉ. कलाम यांनी आपल्याला केला आहे? सरकारने सर्वत्र स्वच्छता राखावी, असे आपल्याला नेहमी वाटते.

याऊलट आपण वाटेत पडलेला एखादा कागदाचा तुकडा कचरापेटीत टाकत नाही. आपल्याला सर्व सोयी या सरकारकडुन पाहिजेत. ही सर्व कामे सरकारची आहेत असे आपल्याला वाटते. मला पण वाटते की, आपल्या देशाला बदलण्याची आता गरज आहे. डॉ. कलाम यांनी आपल्याला हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. आपल्याजवळ आपल्या देशाला देण्यासाठी वेळ असायलाच हवा.

जॉन एफ केनेडी यांनी देशवासीयांना उद्देशून म्हणाले होते की, ''आपला देश आपल्यासाठी काय करू शकतो, हे विचारु नका. तर आपण आपल्या देशासाठी काय करू शकतो, हे स्वतःला विचारा.'' चला तर आपण समोर बघूया डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या खडतर जीवनाचा प्रसंग.

तामीळनाडुच्या दक्षिण किनारी वसलेल्या रामेश्वरम् या गावातील समुद्रकिनाऱ्यावरची ती एक संध्याकाळ. त्या समुद्रकिनाऱ्यावर अनेक मुले खेळत होती. त्या मुलांमध्ये एक कुरळ्या केसांचा आणि स्वप्नाळु डोळ्यांचा मुलगाही होता. तो म्हणजे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम.

डॉ. कलाम यांना नेहमीच ज्या प्रमाणे पाखरे आकाशात उडत असतात त्याच प्रमाणे आपण सुद्धा आकाशात भरारी घ्यावी असे त्यांना नेहमी वाटायचे. त्यांची अशी खुप ईच्छा होती. त्या सुंदर पक्षांच्या उड्डाणामुळेच अब्दुल कलाम यांना भावी आयुष्यात रॉकेट

निर्माण करण्याच्या योजनेची प्रेरणा मिळाली. या रॉकेटच्य सहाय्याने १८ जुलै १९८० रोजी 'रोहिणी' या उपग्रहाला यशस्वीरित्या भ्रमणकक्षेत सोडण्यात आले.

१५ ऑक्टोंबर १९३१ रोजी रामेश्वरम या गावी अब्दुल कलाम यांचा जन्म झाला. ते गाव शिवमंदिरासाठी प्रसिद्ध होते. डॉ. कलाम यांचे वडील जेनुलब्दीन हे एक धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी त्यांच्या कुटुंबाच्या सर्व गरजा पूर्ण केल्या. ते मात्र स्वतः खडतर जीवन लगले. भिन्न–भिन्न धर्मांचे लोक पुष्कळदा त्यांच्याकडे येत. त्यांचा आशिर्वाद घेत. ते वाडग्यात बोट बुडवत आणि एक मंत्र म्हणत. नंतर भेटायला येणारे लोक ते पाणी घरी घेऊन जात असत आणि कुटुंबातील आजारी माणसाला ते पाणी बरे होण्यासाठी औषध म्हणून देत असत.

डॉ. कलाम हे अक्षरशः बिया–चिंचोके गोळा करून दुकानात नेऊन विकत असत, परंतु त्यांनी आपले शिक्षण पूर्ण करावे अशी त्यांच्या कुटुंबाची ईच्छा होती. पण ते म्हणत मी अभ्यास सांभाळून उरलेल्या वेळेत काम करत जाईन. मग त्यांच्या कुटुंबियांनी ना खुशीनेच त्याला मान्यता दिली.

चिंचोके विकण्याबरोबरच ते त्यांच्या चुलत भावाला 'दिनमणी' हे लोकप्रिय तामिळ वृत्तपत्र विक्रिसाठी मदत करत असत. या मोबदल्यात त्यांचा भाऊ त्यांना पैसे देत असे. अशाप्रकारे डॉ. कलाम यांनी त्यांची पहिली कमाई केली.

डॉ. कलाम त्यांच्या शाळेतील आठवणी बद्दल नेहमी म्हणायचे.

''मला स्वतःला तरुण लोकांच्या संगतीत विशेषतः माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या संगतीत राहायला आवडतं.''

डॉ. कलाम हे सुरूवातीले रामेश्वरममधील प्राथमिक शाळेत गेले. बालपणापासून कलाम हे चौकस बुद्धीचे होते. त्यांना प्रत्येक गोष्टींबद्दल माहिती करून घेण्याची उत्सुकता असे. इंग्रजी, गणित, विज्ञान आणि तमिळ हे त्यांचे आवडते विषय होते.

शाहेत असतांना कलाम यांची इतर मुलांशी सहजतेने मैत्री व्हायची. रामनाथ शास्त्री हा त्यांच्या सर्वात जवळाचा जिवलग मित्र होता. रामनाथ यांचे वडील हे पुजारी होते. वर्गात रामनाथ व कलाम एकाच बाकावर बसायचे आणि ते नेहमी जोडीने राहत असत. फक्त त्यांचा पोशाखच त्या दोघांमधील फरक दाखवत होता. कारण अब्दुल कलाम हे मुस्लीम टोपी घालत असत आणि रामनाथचा पोशाख स्थानिक ब्राम्हणी पद्धतीचा होता.

एके दिवशी एक नवीन शिक्षण वर्गात आले. ते शिकवत असतांना त्यांची नजर समोरच्या बाकावर पडली. त्यांना वाटले की, एक मुसलमान मुलगा दुसऱ्या ब्राम्हण मुलासोबत बसुन आहे हि बाब त्यांना मुळीच आवडली नाही. त्यांनी कलाम यांना उठवुन मागच्या बाकावर बसवले.

कलाम यांनी आपली पुस्तके उचलली आणि ते मागच्या बाकावर बसण्यासाठी जात असतांना त्यांनी त्यांच्या मित्रांकडे बघितले तर त्याचे डोळे पाणावले होते. त्या दोघांसाठी हा अपमान आणि दुःख सहन करण्यापलीकडचे होते. संध्याकाळी त्या दोघांनीही हा प्रसंग आपआपल्या घरी सांगितला. त्याच रात्री रामनाथच्या वडिलांनी त्या शिक्षकांना बोलावले आणि त्यांना कठोर सुनावले की, सामाजिक विषमतेचे विष पाजून तुम्ही या निरागस मुलांची मने कलुषित करू नका आणि त्यांच्यात धार्मिक तेढ निर्माझ करू नका. त्यानंतर त्या शिक्षकाने त्यांची माफी मागितली. या घटनेतून ते आयुष्यभरासाठी एकोप्याचा आणि सामंजस्याचा धडा शिकले.

खरचं हे उदाहरण आपल्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. कारण मला वाटते की, माणसामाणसांमध्ये कधीच भेट असु नये. सर्वांनी एकोप्याने रहावे. कुणीही धार्मिक तेढ निर्माण करू नये. सर्वांनी एकमेकांसोबत गुण्यागोविंदराने रहावे. समाजामध्ये सर्वांनी एकोप्याची भावना निर्माण करावी.

डॉ. कलाम यांना नंतर श्वार्टस हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. श्वार्टस हायस्कुल हे उच्च प्रतिचे शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध होते. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनाला सतत स्मरण करून देण्यासाठी शाळेच्या समोर पाटीवर शद्ब कोरले होते; 'आपल्या प्रगतीचे हे दिवस व्यर्थ घालवु नका, गेलेला काळ सोने देऊनही पुन्हा खरेदी करता येत नाही.'

त्या शाळेमध्ये ईरूयादुराई सोलोमन हे त्या शिक्षकांपैकी एक होते, ज्यांनी अब्दुलला सर्वाधिक प्रभावित केले होते, त्यांचा

मनमोकळा स्वभाव, हसतमुख चेहरा यांमुळे विद्यार्थी त्यांच्या शिकवण्यात रमुन जात असत. यशस्वी जीवन जगण्यासाठी ज्यांनी कलामांना बहुमोल सल्ला दिला– 'आपण तीन प्रकारचे सामर्थ्य जोपासले पाहिजे, ते म्हणजे : दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रगाढ श्रद्धा आणि त्या प्रयत्नांच्या अपेक्षित निष्पत्तीचा ध्यास.' ते विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि आशावाद विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांनो मनोधैर्य उंचावत असत.

इ.स. १९५० मध्ये कलाम यांनी महाविद्यालयात प्रवेश केला. तेथे त्यांनी विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घ्यायचे ठरवले. भौतिकशास्त्राचा अभ्यास करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. तेथे चिन्ना दुराई आणि कृष्णमुर्ती हे त्यांचे प्राध्यापक होते. त्यांना येथे पण चांगले शिक्षक मिळाले. त्यांची चार वर्षे यशस्वीरित्या पूर्ण झाली आणि ते विज्ञान विषयाचे पदवीधर झाले. नंतर त्यांनी विचार केला की, भौतिकशास्त्राचा अभ्यास त्यांच्याकरिता प्रेरणादायी नाही हे त्यांना जाणवले. नंतर त्यांनी इंजिनिअर शाखेकडे जाण्याचा विचार करू लागले. त्यांना त्यांच्या लहानपणच्या स्वप्नाची आठवण आली आणि त्यांनी एरॉनॉटिक इंजिनिअरींग करण्याचे ठरविले. कलाम जेव्हा तमिळपत्र वाटायचे तेव्हा त्यांनी पेपरमध्ये युद्धविमानाबद्दल माहिती देणारा लेख वाचला. तेव्हापासुन त्यांच्या मनात विमान बनवण्याची आणि उडवण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली होती. शेवटी त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉली मध्ये अर्ज केला.

ते नेहमी म्हणत...

''भारताला एका विकसित राष्ट्राच्या रूपात पहायचे हे माझे जीवनध्येय आहे आणि मला माहित आहे की, यामध्ये मला बहुसंख्य लोकांचा, विशेषतः तरूण पिढिंचा पाठिंबा आहे.''

मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये त्यांना प्रवेश मिळाला. डॉ. कलाम यांनी संस्थेत लवकरात लवकर दाखल व्हावे, अशी त्यांच्या कुटुंबाची इच्छा होती. मात्र त्यांच्या वडिलांना हा खर्च परवडणारा नव्हता, जर अब्दुल एमआयटी मध्ये गेला नाही की, तो निराश होईल असे त्यांच्या बहिणींना सतत वाटत असे. म्हणून तिने स्वतःच्या सोन्याच्या बांगड्या आणि गळ्यातील साखळी गहाण ठेवूनपैसे उभे केले. डॉ. कलाम यांना त्यांच्या बहिणीविषयी एवढी कृतज्ञता वाटली की, त्यांनी स्वतः पैसा कमवायला सुरुवात केली. ते पहिले ते दागिने सोडून आणतील हा निर्धार त्यांनी केला आणि आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

डॉ. कलाम यांना नंतर थुंबामधील रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना करण्यासाठी त्यांची निवड झाली होती. डॉ. विक्रम साराभाई आणि डॉ. होमी भाभा यांना रॉकेट प्रक्षेपणासाठी थुंबा हे आदर्श गाव वाटले.

डॉ. कलाम यांना युवक विद्यार्थ्यांना नेहमी थुंबा बद्दलच्या घटना सांगु वाटत होत्या. ते म्हणत असत,

''मी असंख्य युवक विद्यार्थ्यांना भेटेन आणि उड्डान क्षेत्रात घडलेल्या राईट बंधूपासून ते थुंबापर्यंतच्या अद्‌भुतरम्य घटना मी त्यांना सांगेन.''

थुंबा येथील लोक जास्त प्रमाणात मच्छीमारी करणारे होते. मात्र त्या लोकांनी या प्रक्षेपणासाठी तेथील जमीन दिली. या केंद्राच्या जवळपास एकही वस्ती असणे योग्य नव्हते. त्यानंतर कलाम आणि त्यांचे सहकारी यांनी त्यांच्या कार्याला सुरूवात केली. एके दिवशी कलाम टेबलापाशी बसून काम करत असतांना त्यांना एक फोन आला. तो फोन डॉ. विक्रम साराभाई यांचा होता. डॉ. कलाम यांची अमेरिकेच्या 'नासा' कार्यक्रमासाठी निवड झाली होती. याचा त्यांच्या कुटुंबीयांना मोठा अभिमान वाटत होता. कलमा यांना अमेरिकेतील नासामध्ये अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

१९६३ मध्ये भारतीय वैज्ञानिकांचा गट तिरूवनंतपुरमला परतला. त्या दरम्यान थुंबामधील रॉकेट केंद्रामध्ये काही बदल झाले. फ्रान्स, अमेरिका आणि रशियाने या वैज्ञानिक कार्यात रस घ्यायला सुरुवात केली. कलाम यांना सुद्धा हे वेगळे वाटले कारण ते अमेरिकेतील सुसज्ज अंतराळ केंद्रे पाहून ते थुंबाच्या नव्या केंद्रावर आले होते.

डॉ. कलाम यांचा हा प्रवास खरच खडतर आहे कारण त्यांना येथे जेवणाची, राहण्याची सुद्धा सोय नव्हती. थुंबामधील आठवड्याचे पाच दिवस त्यांचे खुप धावपळीचे असायचे. ते इतके काम करत होते की, त्यांना वेळ पण पाहण्यासाठी घड्याळात पहायचे ध्यान राहत नसे.

त्यांनतर कलमा यांना एस.एल.व्ही.च्या चौथ्या टप्प्याचे अर्थात वरच्या टप्प्याचे आरेखन करण्यास सांगण्यात आले. हाच

टप्पा 'रोहिणी'ला भ्रमण कक्षेत सोडण्यासाठी अंतिम गती देणार होता. डॉ. कलाम यांनी येथेही खुप खडतर मेहनत घेतली. त्यांना असे सांगण्यात आले होते की, एस.एल.व्ही.-३ च्या चौथ्या टप्प्याची पुनर्रचना अशी करा की, ज्यायोगे तो दोन्ही वाहनांसाठी उपयोगी ठरेल.

१९७१ मध्ये जेव्हा त्यांचा हा भाग बनून झाला आणि तो पाठवण्याची तयारी असतांना फ्रान्स सरकारने तो रद्द केला. त्यावर्षी त्यांना हा आणखी मोठा धक्का बसला. त्यांचे सल्लागार डॉ. विक्रम साराभाई यांचे १९७१ मध्ये हृदयविकाराया झटक्याने निधन झाले.

एस.एल.व्ही.-३ चा प्रकल्प सुरू असतांनाच त्यांच्या प्रक्षेपणासाठी स्थान विकसित करण्याचे कामही सुरू होते. त्यासाठी श्रीहरीकोटा या गावाची निवड करण्यात आली होती. १९६८ मध्ये आंध्र प्रदेश शासनाने अंतराळ विभागाला श्रीहरीकोटा येथे मोफत भूमी देण्याचा प्रस्ताव मांडला. तेथे घनदाट जंगल होते. भयानक साप, विंचू, सरपटणारे प्राणी यांनी हे जंगल व्यापले होते. येथे यानाडी जमातीचे लोक राहत होते. थुंबा येथील लोकांनी ज्याप्रमाणे क्षेत्र स्वतःच्या इच्छेने दिले होते त्याचप्रमाणे यानाडी जमातीच्या लोकांनी सुद्धा हे क्षेत्र त्यांना स्वेच्छेने दिले.

श्रीहरीकोटा येथे येथे एस.एल.व्ही.-३ च्या प्रक्षेपणासाठी १० ऑगस्ट १९७९ हा दिवस निश्चित करण्यात आला. परंतु या प्रक्षेपणाचे पहिले उड्डाण यशस्वीरित्या होऊ शकले नाही. रॉकेट प्रक्षेपणाचे अपयशाची बातमी दुरदर्शनवर प्रसारित झाल्या. कलाम यांनी अपयशाची सर्व जबाबदारी स्वीकारली होती. कलाम पूर्णपणे नाउमेद झाले होते. त्यांना खुप थकवा जाणवत होता. ते खोलीत गेले आणि अंथरुणावर झोपले नंतर त्यांचे स्नेही सल्लागार डॉ. ब्रह्मप्रकाश यांनी त्यांना धीर दिला. तसेच त्यांनी कलमा यांना दुसऱ्या प्रक्षेपणासाठी उत्साहित केले. मग लवकरच दुसऱ्या उड्डाणाची तयारी जोरात सुरू झाली.

दुसरे प्रक्षेपण १८ जुलै १८८० रोजी झाले. रॉकेटच्या वरच्या टोक्यावर 'रोहिणी' उपग्रह जोडला होता. शेवटी हे उड्डाण यशस्वीरित्या पूर्ण झाले. या उड्डाणाच्या यशामुळे कलाम यांची खुप प्रसिद्धी झाली.

या यशस्वीतेबद्दल कलाम यांचे अभिनंदन करण्यास त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी या त्यांना वैयक्तिकरित्या भेटुन अभिनंदन करू इच्छित होत्या. भेटल्यानंतर कलाम आणि सतिश धवन यांनी त्यांना एस.एल.व्ही.-३ बाबत माहिती दिली.

यानंतर अग्नीचे उड्डाण सुद्धा यशस्वीरित्या पूर्ण झाले. 'अग्नी'कडे सर्वांचे लक्ष वेधले होते. कारण या मिसाईलचा पल्ला १५०० ते ३००० किलोमीटरचा होता. त्यामुळे भारताला जबरदस्त मारकशक्ती प्राप्त झाली होती. अग्नी म्हणजे आग. कलमा यांनी आपल्या उराशी बाळगलेले स्वप्न म्हणून या प्रकल्पाचे नाव त्यांनी 'अग्नी' असे ठेवले होते. त्यांनी स्वप्न साकार झाल्यामुळे एक कविता स्फुरली,-

अग्नी मध्ये शोधु नका
शत्रुला भयग्रस्त करणारे दुश्चिन्ह
ना तुमचे शक्तिप्रदर्शन
ही तर आग आहे
प्रत्येक भारतीयांच्या हृदयातील निखाऱ्याची
क्षेपणास्त्राच्या रूपात पाहू नका
ही तर प्रतिमा सभ्यतेची अन् खऱ्याची

राजस्थानमधील पोखरण येथे 'ऑपरेशन शक्ति' ची चाचणी पार पाडण्यासाठी कलाम आणि चिदम्बरम यांची निवड करण्यात आली होती. ही चाचणी देखील यशस्वीरित्या पूर्ण झाली. कलाम यांना सर्व 'भारताचे मिसाईल निर्माता' म्हणून ओळखू लागले. त्यांच्या या योगदानाबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांना १९९७ मध्ये 'भारतरत्न' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

अणुचाचण्यांच्या सफलतेनंतर डॉ. कलाम यांना अनेक पदव्या प्राप्त झाल्या. १४ नोव्हेंबर २००२ रोजी ते राष्ट्रपती भवनात मुलांसोबत गप्पागोष्टी करत होते. तेव्हा त्यांनी मुलांना सांगितले की, या आण्विक अस्त्रांची निर्मिती केवळ शांततामय उद्देशांसाठी होणार आहे. कलाम यांनी मुलांना समजावुन सांगितले की, भारत कधीही स्वतःहुन अण्वस्त्राने हल्ला करणार नाही. जेव्हा कोणी दुसरा

देश हल्ला करेल तेव्हा भारत स्वतःच्या संरक्षणासाठी त्या शस्त्राचा वापर करील.

डॉ. कलाम यांना लहान मुले खुप आवडत असत. त्यांना मुलांचे राष्ट्रपती देखील म्हणत असत.

कालम म्हणत असत,

''मुले नेहमी अनुकरण करण्यासाठी कोणतातरी आदर्श व्यक्तीच्या शोधात असतात, राष्ट्रपतीच्या भूमिकेत मी त्यांच्यासाठी आदर्श ठरावे आणि त्यांना प्रेरणा द्यावी, असे मला वाटते. अशा प्रकारे युवकवर्गाच्या संपर्कात राहुन मी सतत माझे जिवितकार्य पुढे चालु ठेवू शकेन.''

भारत सरकारने डॉ. कलाम यांची नोव्हेंबर १९९९ मध्ये पंतप्रधानांचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार या पदावर नेमणूक केली. प्रमुख वैज्ञानिक सल्लागार या नात्याने त्यांनी देशभर प्रवास केली. त्यांनी जीवनातील विविध क्षेत्रात काम केलेल्या लोकांच्या भेटी घेतल्या, त्यांना प्रेरित केले. त्यांना वाटायचे की, समाजातील एका महत्त्वाच्या घटकाला आवाहन करण्याची गरज आहे आणि तो महत्त्वाचा घटक म्हणजे भारताचा युवकवर्ग.

२५ जुलै २०२२ रोजी कलाम यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली. त्यांना ही शपथ भारताचे मुख्य न्यायाधिश बी.एन. कृपाल यांनी दिली. डॉ. कलाम हे भारताचे ११ वे राष्ट्रपती बनले.

खरचं डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा हा प्रवास खडतर होता. त्यांना अनेकावेळा अपयशय आले पण ते अपयशातून समोर येऊन त्यांनी यशाची उंच शिखर गाठली. मला सर्व तरून मुलामुलींना एकदा आवर्जुन सांगावे वाटते की, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे हे पुस्तक एकदातरी वाचावे, मी हे पुस्तक वाचत असतांना असे वाटले की, खरचं या जीवनामध्ये अशक्य अशी कोणतीच गोष्ट नाही. फक्त मेहनत, संयम हे गुण अंगी असावे लागतात. मेहनती शिवाय कोणतीच गोष्ट मिळु शकत नाही. जीवनामध्ये अनेक अपयश येत असतात. मात्र त्या अपयशावर मात करून यशाची उंच शिखरे गाठण्याची आपल्यात जिद्द असावी लागते. कारण,

''अपयश हे यशाचे मूख्य सूत्र आहे.''

तसेच सर्वांना एकदा पुन्हा सांगु इच्छिते की,

''आपण एक ध्येय ठरविले पाहिजे, ते ध्येय<br>
महान असले पाहिजे आणि ते ध्येय साध्य<br>
करण्यासाठी आपल्याला घाम गाळला<br>
पाहिजे व अथक प्रयत्न केले पाहिजेत.''

* * * * *

# बिराड : एक माणसाचा शोध
# – अशोक पवार



**कु. पुनम खुशालराव धैसकर**
बी.ए.–१

'बिराड' हे वाचण माझ्यासाठी एक वेगळाच अनुभव होता. बिराड म्हणजे समाजघटकाचे वास्तविक चित्रण करणारं पुस्तक आहे. 'बिराड' हे अशोक पवार यांची आत्मकथा आहे. हे पुस्तक वाचत असतांना पुस्तकाच्या पानोपाणी मनाला अस्वस्थता निर्माण व्हायची. दुःख, दरिद्र काय असते याची जाणीव हे पुस्तक करून देते तसेच मनाला सुन्न करून विचार करण्यास भागत पाडत होते. या पुस्तकात 'बेलदार' जमातीचं चित्रविचित्र जीवन रेखाटलेलं आहे. पशुतुल्य जीवन जगतांना त्यांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. आपण विचार सुद्धा करू शकत नाही असे जीवन जगणाऱ्या माणसाची होरपळ, भीषण, भयानक, दुःख पाहून कोणत्याही वाचकाला हादरुन, गोंधळून टाकणारे हे पुस्तक आहे. आपण आपल्या छोट्यामोठ्या दुःखांना, समस्यांना कुरवाळत बसत असतो. हे पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला समजेल की खऱ्या अर्थाने दुःख काय असते. बेलदार समाजातील लोकांचे दुःख समजून घेतल्यावर त्यांच्या दुःखासमोर आपल्याला आपले दुःख काहीच वाटणार नाही. किंबहुना ते नाहीसे सुद्धा होतील. आपणचं त्यांना मोठ समजत असतो.

माणसाला माणूसकीची अत्यंत तीव्रतेने जाणीव करून देणारं हे पुस्तक प्रत्येक समाजातील व्यक्तींनी वाचण्याची गरज आहे. त्यामुळे आपल्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते. आजच्या काळात माणूस आपली माणूसकी विसरत चाललेला आहे. 'बिराड' या पुस्तकामध्ये 'बेलदार' जातीच्या लोकांचे वर्णन केलेले आहे. जीवन जगत असतांना 'बेलदार' समाजातील लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतात. या लोकांच्या वाट्याला दुःख, दारिद्रय, भूक, भीक, गुन्हेगारी, अशिक्षितपणा, अंधश्रद्धा, दारुडेपणा, मारामारी, भांडण, अपमान, अवहेलना, आजारपण, बालमजुरी, बालगुन्हेगारी, स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचार, मोठ्या प्रमाणात होणारी जातीभेद, शोषण, रुढी परंपरा मध्ये अडकलेले लोक, आपल्याच समाजातील आपल्याच माणसाने केलेला अत्याचार माणूस माणूसकी विसरत चालेली होणारी तीव्र जाणीव या पुस्तकाच्या माध्यमातून प्रत्येक वर्गातील वाचकाला होणार आहे. प्रत्येक समस्यांना तोंड देत संपूर्ण महाराष्ट्रभर भटकत जीवन जगणार 'बेलदार' समाज होय. मिळेल ते आणि मिळेल तिथे काम करणे. ज्या दिवशी काम मिळाले त्या दिवशी जेवायला मिळायच, जेव्हा काम मिळत नसायच तेव्हा त्यांच्या भाग्याला उपासमारी यायची किंवा मग भिक मागून खायची त्यांना भिक सुद्धा कोणी द्यायला तयार होत नसे. उपासमारीमुळे होणारी त्यांची दयनीय अवस्था यांची जाणीव या पुस्तकाच्या माध्यमातून होते. मी हे पुस्तक वाचत होती तसे माझ्या मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ लागले. आपल्या समाजाप्रमाणे या समाजाची सुधारणा झाली असेल का? हा समाज विकासाच्या मार्गावर लागला का? या समाजातील लोकांमध्ये शिक्षणाची जाणीव निर्माण झाली का? हा समाज जसा मागास राहीलेला होता त्याच प्रमाणे आता सुद्धा काही समाज हे मागास आहे का? असे अनेक प्रश्न हे पुस्तक वाचत असतांना वाचकांच्या मनामध्ये निर्माण होतातचं, पण आपण आपल्या समाजाचे बारकाईने निरिक्षण केले तर आपल्याला जाणवेल की, आता हा समाज कमी प्रमाणात पहावयास मिळतो.

'बिराड' हे अशोक पवार यांची स्वकथन आहे. त्यामुळे या पुस्तकात वापरलेली भाषा ही ग्रामीण बोलीभाषा आहे. लेखक हे विदर्भात लहानाचे मोठे झालेले आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेमध्ये वऱ्हाडीपणा वाचकाला जाणवतो. वऱ्हाडी भाषेचे जाण असणाऱ्यांना हे पुस्तक वाचन विदर्भातील व्यक्तिंना अवघड जाणार नाही. या पुस्तकातील काही शद्ब काही वाचकांसाठी नविन असतील, त्यामुळे

त्यांना समजण्यास अवघड जावू शकते. पण या पुस्तकातील अर्थ, संदेश समाजातील दारिद्र्याची जाणीव प्रत्येक वाचकाला येईल. अशी आशा लेखकाला वाटत असावी.

'बिराड' पुस्तकाची मी वाचलेली चौथी आवृत्ती होती. यावरुन असे लक्षात येते की, लोकांना हे पुस्तक वाचायला आवडलेलं आहे. एखाद्या पुस्तकाची चौथी आवृत्ती काढणे म्हणजे कोणत्याही लेखकाला अभिमानाची व आनंदाची गोष्ट असते. 'बिराड' हे अशोक पवार यांनी २००१ मध्ये मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केलेल आहे. या पुस्तकाबद्दल काहींणी स्तुती व्यक्त केली आहे. तर काहींणी दुःख व्यक्त केले आहे. तर काहींणी यावर टिकासुद्धा व्यक्त केल्या आहे. त्यांच्या मते ''या मध्ये वापरलेली भाषा ही आणि देवा-धर्माविषयी देण्यात आलेल्या शिव्या'' यांमुळे काही नाराज झाले. पण मात्र एखाद्या माणयसाचं चित्र रेखायच असेल तर ते वास्तविक असायला हवे. त्यामुळे लेखकांनी वास्तविक 'बेलदार' समाजातील लोकांची अवस्था त्यांना होणारे अथांग वेदना रेखाटल्या आहे. आपल्याला बेलदार समाजाची जाणीव हे पुस्तक करून देते.

'बेलदार' ही भटकंती करणारी एक जमात आहे. आपलं बिराड डोक्यावर किंवा गाढवावर घेऊन एका गावावरुन दुसऱ्या गावी जाणारा हा एक समाज आहे. ज्या गावामध्ये त्यांना भिंत बांधण्याचे किंवा चिरे फोडण्याचे काम मिळाले त्या गावी जायचे आणि आपली भाग्याची रेषा जुळवायची. गावाच्या हागणदरी भागामध्ये आपला पाला उतरवायचा आणि तिथे राहायचं. त्या गावच काम संपल्यानंतर दुसऱ्या गावी काम शोधायच. दररोज काम लागेलच अस नसायचं. म्हणून अनेक वेळा त्यांना उपाशी रहावे लागत असे. भूक म्हणजे काय याची त्यांना कल्पना असायची. स्वच्छतेचा भाग त्यांना माहिती नव्हता. बायकांनी चांगले दिसणे हे त्या समाजातील माणसांना मान्य नव्हते. अस्वच्छता त्यांच्या आजाराचे कारण बनत. ही जमात भटकती असल्यामुळे त्यांचा जन्म कोठे झाला, कोणत्या गावी झाला याची त्यांना माहिती नसायची. कधी कधी तर कोणाचा जन्म हा भटकंती करत असतांना आडरानात, डोंगरात, माळात होत असे. तेव्हा तेथे ना दवाखाना ना औषधोपचार असायचा. किंवा ते करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसायचे. अशातच लेखकाचा सुद्धा जन्म कोठे झाला आहे. हे सांगता येत नाही. ज्याप्रमाणे त्यांचा जन्म व्हायचा त्याचप्रमाणे त्यांचा मृत्यू सुद्धा व्हायचा. मग त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी लागणारी जागा सुद्धा गावातील लोक देत नसत का तर त्यांची जात वेगळी असल्यामुळे त्यांना माळामध्ये अंत्यसंस्कार करावा लागत असे. या समाजातील मुलींचे लग्न झाल्यानंतर तिची माहेर व माहेरच्या माणसांशी भेट कधी होतच नसे. आपली मुलगी कशी आहे, जिवंत आहे की, मेली हे सुद्धा माहिती नसायचे. भटकती करत असतांना कधी चूकुन त्यांची भेट व्हायची आणि मुलीला भोगावयास लागणारा सासरवास पाहून त्यांना दुःख व्हायचे. एखाद्या मुलीचे आई-वडील वारले असल्यास त्या मुलीला कळेपर्यंत तर एक-दोन वर्ष होऊन जायचे. अशी अवस्था या समाजातील लोकांची होती.

दारिद्र्यामध्ये खितपत पडलेला हा समाज असल्यामुळे ते आपोआप गुन्ह्याकडे वळले जात असे. गुन्हा केल्यामुळे त्यांना इतर समाजातील व्यक्ती त्यांच्यावर अत्याचार करत असे. ते अत्याचार इतके भयानक असे की, त्याच्या होणाऱ्या वेदना ह्या असह्य असायच्या. अत्याचाराला बळी पडलेला हा समाज अशिक्षित होता. त्यामुळे त्यांना या अत्याचाराला असे समोर जायचे हे माहिती नाही. कधीकधी हा गुन्हा मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे पोलीस सुद्धा त्यांच्यावर बेकायदेशीर अत्याचार करत असे. एका सुशिक्षीत वर्गाने एका अशिक्षीत वर्गावर केलेल्या अन्याय पाहून आपल्या शिक्षणाचा काय उपयोग आहे. यावरुन आपला समाज व्यवस्था कोठे जात आहे. यांची जाणीव होत आहे. अशा समाजव्यवस्थेची जाणीव करून देणारे पुस्तक असल्यामुळे वाचन करणे गरजेचे आहे.

या समाजातील स्त्रीयांची स्थिती तर फारच दुःखद, दयनिय आहे. स्त्रियांवर होणारे मानसिक, शारीरीक अत्याचार तर अतिशय दयनीय व भयानक होते की, वाचत असतांना अंगाला शहारे येत असे. मनाला चिर वेदना होऊन विचार करण्यास भाग पाडणारे काही प्रसंग या पुस्तकामध्ये लेखकांनी रेखाटले आहे. स्त्रियांचा कोणी विचार करत नाही. त्यांना सोसायला लागलेले कष्ट, दुःख, अत्याचार ती सहन करत होती. माणसाची माणसीकता ही आपल्याला जाणवते. स्त्रीयांनी दिवसभर काम करायचे, घरचे काम आवरुन माणसाच्या बरोबर काम सुद्धा करत होती. ऐवढ काम करून सुद्धा रात्रीला दारु पिऊन आलेल्या नवऱ्याचा मार खात असे. भांडण होत असे, पती जेवल्याशिवाय पत्नीने जेवायचे नाही, पतीपुढे पत्नीच काहीच चालत नसे. त्यांच्या भांडणामध्ये मुलाचे मात्र हाल होत असे. त्यांच्या वाट्याला हे भांडण येत असे. स्त्रियांवर घरातील लोक अत्याचार करत होतीच पण समाजातील इतर व्यक्ती सुद्धा

अत्याचार करत असे. बाहेर समाजातील व्यक्तींनी केलेल्या अत्याचारामुळे या स्त्रीयांना वाळीत टाकण्यात येत असे. त्यांना शिक्षा देत असे. लेखकाच्या नातेवाईकांमध्ये असलेल्या एका स्त्रीवर झालेल्या अत्याचारामुळे ती गर्भवती राहते. तेव्हा ही गोष्ट त्याच्या समाजातील व्यक्तींना समजते. तेव्हा तिचा गर्भपात करतात व गरम केलेया लोखंडाने तिला चटका देण्यात येतो. ही वेदना अतिशय त्रासदायक असते. असे या समाजातील स्त्रीयांची स्थिती दयनिय होती.

बेलदार समाज हा अंधश्रद्धेने पछाडलेला होता. त्यांचे देव त्यांच्या बिराडासोबतच एका पेटीमध्ये एक–दोन शेंदूर लावलेले दगड असत. ते त्यांना देव मानत आणि त्यांची पूजा केली जात असे. कोणाला ताप आला, कोणाला काही दुखापत झाली, कोणाच लग्न होत नसेल, घरामध्ये भांडण हो असेल तर देवाला नवस केला म्हणजे सर्व दुःख दूर होते. अशी अंधश्रद्धा पसरलेली असे. लेखकाच्या आजोबा हे या देवाची पूजा करत असे. मग त्यांच्या अंगात देव येत असे आणि त्यांच्या अंगात आल्यानंतर दुःखावर उपाय म्हणून देवाला नवस केला म्हणजे देव प्रसन्न होईल सर्व दुःख दूर होईल नवस म्हणजे मटण दारु सांगत आणि भोळेभाबडे लोकांना हे सार खरं वाटे.

खूप खोट बोलन, भिक मागीन, चोऱ्या करन, दारु पिन, भांडण करण, पोलीसांचा मरेपर्यंत मार खान, माय–बहिणींवर केलेल्या पोलीस व गाववाल्यान बळजबरी हे सर्व सहन करून ते लोक आयुष्य जगत होते. हे सर्व वाचत असतांना माणसावरचा विश्वास नकोसा होत होता.

''माणसा माणसा कोठे हरवलास...
काळीज तुझे कोठे हरवलास....
माणूसकीला जाण थोडी...
आपलकी ठेव थोड...''

लेखकाच्या वाट्याला काही काळानंतर का होईना पण शिक्षण आलं होतं. त्यांच्या नातेवाईकांमधील कोणीतरी त्यांना शिक्षणाच महत्त्व सांगितलं. ते लेखकाच्या आईच्या मनामध्ये रुजलं. त्यांनी पक्क ठरवलं आणि लेखकाला शिकवायच त्यांनी ठरवलं. शिक्षणाच्या बाबतीत पण त्यांना खूप संघर्ष करावा लागला होता. भटकंती जमात असल्यामुळे त्यांच्याकडे जन्माचा दाखला नसायचा. गावातील लोक त्यांना ते देत नव्हते. त्यामुळे लेखकांना शाळेत प्रवेश मिळत नव्हता. खूप परिश्रमामुळे त्यांना शाळेत प्रवेश मिळाला. पण राहण्याचा प्रश्न जोपर्यंत त्याचे घरचे त्या गावात काम लागले होते तोपर्यंत काही प्रश्न नव्हता. नंतर मग काय? सुदैवाने त्या शाळेत बोर्डिंग होतं. त्या बोर्डिंग मध्ये लेखक राहूल लागले. अभ्यासात त्यांच मन रमू लागलं होतं. पण शिक्षणाचा त्यांचा खर्च त्यांना झेपत नव्हात. त्यामुळे शाळेत चांगला मुलगा म्हणून त्यांना शिक्षक सुद्धा मदत करत होते. कधी कधी शिक्षणासाठी त्यांना चोरी करावी लागत असे. अशा सर्व परीस्थितीत लेखकाच शिक्षण दहावी पर्यंत झालं होत. अशातच लेखकाच्या घरच्यांनी लेखकाचे लग्न करायचे ठरवले होते. लेखकांनी मात्र त्यांना नकार दिला. पण नंतर त्यांचं लग्न मात्र झालं. लग्नात मिळालेल्या त्यांना नोकरी लागणार असं ठरले होतं. पण सरकारी कार्यालयात चकरा टाकत त्यांना नकार मिळाला. आता काय करावे. शिक्षणामुळे कामाची सवय नाही. यांत आलेली जबाबदारी आणि कर्ज या सर्वांमध्ये लेखक संघर्ष करत होते.

काही काळानंतर त्यांनी बायकोच्या माहेरी राहायचे ठरवले. इकडे त्यांना अतिशय हिनपणे वागणूक मिळत असे. तश्यातच त्यांना टी.बी. सुद्धा झाला असल्यामुळे त्यांना काम होत नव्हते. तशातच त्यांना मुलगा झाला. आता खाण्यापिण्याचे मार्ग बंद झाले होते. अशातच दिवस जात होते. नंतर काहीशी स्थिती सुधारल्यामुळे ते कामासाठी मुंबईला गेले. तेथे त्यांच्या बायकोची वागणूक बदलली असल्यामुळे त्यांनी आत्महत्या करायचे ठरवले. पण मुलासाठी ते थांबले, त्यांची बायको त्यांना सोडून गेली. मुलाला अनाथ आश्रमात ठेवण्यात आले. त्यावेळी बापाच काळीज खूप व्याकूळ झाले होते. कधी त्यांना त्याच्या मुलाला पाहायला मिळेल. बापाच काळीज रडत होतं. त्यांची टी.बी. पासून मुक्तता झाली.

त्यांनी समाज सुधारनेच कार्य हाती घेतलं होत. त्यांना समाजाचा विरोध होत होता. पण ते गरजेच होतं. अनेक खेड्यापाड्यात ते व्याख्यान देत होते. समाजसुधारणेवरची ही त्यांनी नवी सुरुवात होती...

काही काळानंतर समाजसुधारणेच कार्य हाती घेतलेल्या लेखकांच्या जीवनात वेगळाच प्रसंग घडतो. त्यांची पत्नी जी त्यांना सोडून गेली असते. सिरंग सलाराच्या सांगण्यावरून तो त्यांच्या बायकोला तलाक देतो. द्यायला तयार होतात. सिरंग सलार लेखकाच्या बायकोला शोधतात. सिरंग सलार अस आश्वासन देतो की, माझ्या मुलीचं लग्न तुझ्यासोबत लावून देतो. नंतर लेखक व त्यांच्या बायकोचा तलाक होतो. सिरंग सलाराही निघून जातो. त्यांची मुलगी तिच्या पहिल्या नवऱ्याकडे नांदायला जाते. लेखकाची बायको ही सुद्धा दुसरं लग्न करते. सिरंग सलार लेखकाला धोका देतो. लेखकाचा संसार उध्वस्त होतो.

पुन्हा लेखक मजूरी करू लागतात. पण समाजसुधारणेचा विचार त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ते त्यांच्या पाल्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लावतात. त्यांचे विचार इतरांना समजावून सांगत असतो. परंतु पिढ्यानपिढ्या रुजलेली अंधश्रद्धेमधून बाहेर पडणे त्यांना शक्य नव्हते. काही लोक त्यांना विरोध करत असे. एके दिवशी त्यांच्या घरात लावलेल्या बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो दिसत नाही. तेव्हा त्यांच्या घरचे म्हणतात. ''समाजातील लोक आले होते. सिरंग सलाराने तुझ्या विषयी कायी बी सांगितलं आहे. तू बुद्धाचा फोटो लावला आहे. बुद्धा संग चाय बी पीतो. बुद्धाची पोरगी घरी ठेवली आहे. त्यामुळे आम्ही तो फोटो काढला आहे.'' अशा प्रकारचे लेखकाला आपल्याच समाजातील लोक विरोध करत होते. त्यांच्या बद्दल पसरवलेल्या अफवा त्यांमुळे त्यांना काम मिळत नव्हते. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. पण करणार काय? त्यामळे ते आपला बिराड घेऊन दुसऱ्या गावी जाण्याचा निर्णय घेतात. त्यांच्या परंपरे प्रमाणे ते या गावी, त्या गावी जात होते. त्यांनी बिराड गुंडाळला आणि निघाले दुसऱ्या गावी. त्यांच्या डोक्यावर त्यांनी देवाची पाली घेतली होती.

चालत असतांना त्यांच्या मनामध्ये फुले, आंबेडकर, शाहू यांचे विचार येत होते. त्यांच्या विचारांनी ते बेभान झाले होते. देहभान विसरून त्यांनी त्यांच्या डोक्यावरची देवाची पाली फेकून दिली. त्यात असलेले पिढ्यानपिढ्या दोन-चार दगडाचे देव अस्ताव्यस्त पडले. लेखक त्यावर देहभान विसरून नाचत होते. देव नसतो, देव असता तर माझं घर उध्वस्त झालं नसतं. आम्ही गरीब राहिलो नसतो. माझ्या संकटांच्या वेळी देव का धावून आला नाही, असे विचार करत ते देवावर नाचू लागले होते. त्यांच्या घरच्यांनी त्यांना पकडले. तो वेडा झाला असे म्हणू लागले. त्यांना एका झाडाला बांधून ठेवले. लेखक म्हणत होते, ''मी वेडा होतो, पण आता शहाना झालो.'' त्यांचे वडिल लेखक वेडा झाला म्हणून वैद्याला बोलवून आणायला जातात. काही वेळानंतर लेखकाची सुटका होते. लेखक पळत जिंतूर गाव गाठतात. त्यांच्याजवळ ना पैसे असतात, ना काही सामान, आता त्यांच्या समोर एक मोठा प्रश्न पडलेला असतो, आता काय करावं अशातच कोणी तिघं लोक त्यांच्या जवळ येतात. ते जेवण करण्यास लेखकाला सांगतात, लेखकाला आधीच भुक लागलेली असते. भुके अभावी ते होकार देतात. तेंव्हा त्यांना समजते की, हे लोक जातीभेदाला मानत नाही. फुले, आंबेडकर, शाहू यांच्या विचारांनी ते समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेतले होते. लेखक सुद्धा त्यांच्या कार्यात सहभागी होतात. त्यांना आपले विचार सांगतात. आणि त्यांच्या सोबत त्यांच्या गावी राहू लागतात. गावात करारानी जागा घेतात, दिवसभर मजूरी करायची आणि रात्रीला चर्चा करत असतात.

अशातच एप्रिल महिना येतो. चौदा एप्रिलला डॉ. बाबासहोब आंबेडकर यांची जयंती आणि सतरा एप्रिलला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती असते. ते चौघे ठरवतात की, या वर्षी शिव जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोबतच करायची असे ठरवतात. या जयंतीसाठी गावातील शाळेत करण्याच ठरवतात. त्यांना गावातील लोकांचा विरोधाला सामोरे जावे लागले तरी सुद्धा ते त्यांच्या कार्यातून मागे नयेता हा कार्यक्रम करतात. अशा प्रकारे लेखक आपल्या समाजसुधारनेच्या कार्याला सुरुवात करतात. पुढे कार्य करत राहतात. अनेक गावी जाऊन ते भाषण देत होते. अनेक ठिकाणी त्यांना विरोध करणारे लोक होते. कोणी चांगलं काम करत असेल तर लोकांना ते पटतच नाही. त्यामुळे लोक त्यांना विरोध करतात. समाजकार्य करत असतांना त्यांच्या घरुन निरोप येतो की, त्यांच्या वडिलांची तब्येत बरोबर नाही. ते तेव्हा त्यांच्या घरी म्हणजे त्यांचा पाला गावी होता त्या गावी जातात.

त्यांच्या वडीलांची दशा दयनीय होती. त्याना हाल हाल सोसावे लागले. त्यांच्यावर खूप सारं कर्ज झालं होत. त्यामुळे गावातील लोकं त्यांच्या भावाला पकडून नेतात आणि मारुतीच्या बाजूला असलेल्या झाडाला बांधून मारु लागतात. लेखक पळतच गावात जातात, लोकांना विनवण्या करु लागतात. उद्याला पैसे देतो म्हणून त्याची सुटका करतात. अशातच एका दिवसात पैसा कोठून

आणणार ते घरी येतात. कोणाला काहीच न बोलता झोपी जातात आणि मध्यरात्रीला उठतात आणि पळून जातात. भितभित ते पाला तसेच ठेवून जाऊ लागतात. म्हणजे की त्यांची होणारी ती दशा आहे तशी होती. त्यांची परीस्थिती बदलली नाही. येथे या आत्मकथेचा शेवट होतो.

लोकांमध्ये परिवर्तन झालं नाही. त्यांच्या समाजाला असेच भटकत राहावं लागत होतं. पिढ्यानपिढ्या जे घडत होत तेचं शेवटी सुद्धा घडलं होतं. हे या आत्मकथेच्या माध्यमातून सांगितलं आहे.

तसेर 'बिराड' अशोक पवार यांच्या आत्मकथेला अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे. एक सत्य समाजाच चित्रविचीत्र वास्तव चित्र साहित्यामध्ये प्रथमच रेखाटले आहे. २००१ मध्ये 'बिराड' प्रकाशित झाले आहे. तसेच त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहे. त्यातील काही साहित्य अकादमी प्रवासवृत्ती, अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, प्रसादबन वाङ्मय पुरस्कार, लोकानुकंप पुरस्कार, अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार, प्रतिभावंत पुरस्कार, बहुजन साहित्य पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार, शद्बशिल्प पुरस्कार, राजर्षी शाहू महाराज पुरस्कार, अक्षर साहित्य पुरस्कार, सम्यक साहित्य पुरस्कार असे अनेक पुरस्कारांनी 'बिराड' या पुस्तकाला सन्मानित करण्यात आले आहे.

✻ ✻ ✻ ✻ ✻

# ज्ञानेश्वर ते आंबेडकर : एक आकामन

**कु. मधुबाला बापुराव मनवर**
बी.ए.– १

हा ग्रंथ इहवादी भूमिकेतून लिहिलेला आहे. तेव्हा अध्यात्मवाद्यांचे मतभेद स्वाभाविक आहेत. संत व महापुरुष यांचे इहवादी सामर्थ्य सप्रमाण नोंदवणे मला महत्त्वाचे वाटते.

समाजात सतत चालणाऱ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत मानव मुक्तीच्या दिशेने सिद्ध करण्याचे काम हे अत्यंत कठीण असून त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असते. परिवर्तनाची बांधिलकी मानवाच्या व्यापक गहिवरातून उभी राहते. या प्रक्रियेचा एक भाग म्हणुन परिवर्तनवादी विचारपीठाची मालिका इतिहासात सिद्ध झाली आहे. प्राचीन परंपरेत वैदिकांच्या वर्णव्यवस्थेला विरोध करून व ईश्वराच्या अस्तित्वालाच संशयास्पद ठरवून समतेचा पुकारा करणारा बुद्ध आणि त्याचा संघ हे परिवर्तनवादी परंपरेतील आद्य विचारपीठ होय. १२ व्या शतकातील बसवेश्वराचा 'अनुभव मंडप' व एकोणीसाव्या शतकातील म. फुल्यांचा 'सत्यशोधक समाज' हे समतेच्या अरीतील परिवर्तनवादी विचारपीठाचे अधिक निर्दोष उदाहरण आहे. याच प्रवाहात गोपाळ गणेश आगरकर यांच्या कर्तुत्वाची नोंद एक समताधिष्ठित विचारपीठ म्हणनुच करणे भाग आहे. कारण समाजपरिवर्तन हे मोजक्याच महापुरुषांनी सिद्ध होत नसते. जातिव्यवस्था मोडीत काढणाचा पराक्रम महात्मा फुले क्रांतिकारक पद्धतीने करीत असतांनाच स्त्री–पुरुष विषमतेचा धिक्कार करून म. फुल्यांशी संवादी ठरवणाऱ्या समतेचा विचार आगरकर रूजवत होते. महात्मा गांधी आणि बॅ. जीना यांच्या तुलनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या न्या. रानड्यांच्या परिवर्तनवादी कर्तुत्वाचा मुक्त गौरव त्यांच्या गाजलेल्या भाषणात केला ते रानडे एक समग्र 'व्यासपीठ'च होते. त्यांचा प्रभाव त्या वेळीही समाजमनावर होताच. शिवाय विसाव्या शतकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या क्रांतीकारकांपर्यंतही तो पोहोचला. तेव्हा सूधारक आणि क्रांतिकारक यांच्या मर्यादा नोंदवुन, त्यांच्या सामर्थ्याच्या बेरजेचाच एकूण परिणाम समाजमनावर पडला. या ऐतिहसिक सत्यापर्यंत आपणाला आले पाहिजे.

### सत्याचा मारेकरी : ब्राह्मणी–अब्राह्मणवाद

ब्राह्मण जातीत जन्माला आलेले सुधारक ब्राह्मणेत्तर मात करूनच परिवर्तनाचा इतिहास घडवतात. तसेच ब्राह्मणेतर जातीत अपघाताने जन्म घेणारे क्रांतिकारक महात्मेसुद्धा त्यांच्या जात–जाणिवेवर मात करून संपूर्ण जातिव्यवस्थेच्या विरोधात उभे राहतता. अशा महापुरूषांना जात नसते म्हणून जातीच्या चौकटीत त्यांचे 'जातविरोधी कर्तुत्व' कैद करणे चुकीचे असते. या पार्श्वभूमीभवर 'ब्राह्मणी' सुधारक व 'अब्राह्मणी' सुधारक यांत पक्षपात करून सुधारकांनाही 'जात चिकटविल्यात' पराक्रम खुद विचारवंत करीत आहेत. केवळ 'अब्राह्मणी' क्रांतिकारक समाज परिवर्तन करू शकतात. हा समज रुजविणे म्हणजे सत्यासह सत्यशोधक म. फुले, डॉ. आंबेडकर इ. महापुरूषांचे कर्तुत्व मारुण टाकणे होय.

परिवर्तनवादी महापुरुषांच्या कर्तुत्वाला न्याय देण्यासाठी विशुद्ध प्रबोधन करणाऱ्या व्यासपीठांना महत्त्व आहे. या व्यासपीठांना मध्येच विरोध निर्माण झाला असून क्रांतिकारक चळवळी संघर्षे करण्यासाठी सिद्ध झाल्यास ती चिंतेची बाब ठरेल प्रतिगामी शाक्तिकेंद्रे आपसात साधून आहेत. परंपरावादी समाजमन हे त्यांचे भांडवल आहे. या स्थितीत क्रांतीचा वारसा संगणाऱ्या मार्क्सवादी चळवळ आपसांतील वैरभावनेने समाजवादी चळवळ, आंबेडकरवादी चळवळ या 'डाव्या चळवळी' आपसांतील वैरभावनेने पेटलेल्या असून प्रतिगाम्यांचे काम यामुळे सोपे झाले आहे.

### ईश्वर संशयास्पद, धर्म घातक

धर्म व ईश्वर या कल्पना अशास्त्रीय व विध्वंसक म्हणून वर्तमान जगात बदनाम झाल्या असून त्याची परखड चिकित्सा चालू

आहे. विज्ञानाच्या माध्यमातून सिद्ध झालेले सत्यच अंतिमतः सत्य मानण्याची जाणीव शास्त्रीय दृष्टी वाढत आहे. या अर्थाने व या अंगाने एकूणनच मानवतेची जाणीव प्रगल्भ व अधिक डोळस होत आहे. संस्कृतीचे वय व विकासक्षमता वाढल्याची ही साक्ष आहे. अर्थात इथपर्यंत येण्यास, जगाच्या अजेंड्यावर पार पडलेल्या वैज्ञानिक, औद्योगिक, आर्थिक, राजकीय जगाच्या अजेंड्यावर व सामाजिक क्रांत्याच कारण आहेत. आता ईश्वर व धर्म या संकल्पनांमधील कल्पित विधायक मूल्यात्मकता, आधुनिक समाजवाद, इहवाद, लोकशाही या नव्या मूल्यावस्थेत नव्या संदर्भासह सहभागी असून, तिचा प्रत्यक्षानुभव घेण्यास आधुनिक माणूस पात्र व सज्जही झालाय. परंपरावादाचे काही अवशेष अद्याप या आधुनिक इहवादी मूल्यव्यवस्थेकडेच आहे. त्यामुळे बदनाम 'धर्म' व संशयास्पद ईश्वर नव्या बुद्धिप्रामाण्यवादी मानवी समाजात गौण अनावश्यक ठरत आहेत.

या व्यापक विभात्मक पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वरांचा 'देव' आणि त्याचे अध्यात्म तत्वतः आणि व्यवहारतः संशयास्पद ठरू लागल्यास एकूणच संत-साहित्य व भक्तिसाहित्याच्या श्रेष्ठत्वाचे निकष व मूल्य पुन्हा नव्या निकषावर तपासून नव्या समाजात नव्या धारणेसाठी नव्या दिशेने रूजविण्याची गरज आहे. महाराष्ट्राचा चार भिंतीआड संत महात्म्यांची आरती ओवाळणे हा श्रद्धेचा भाग म्हणुन ठीक; पण विश्वात्मक संदर्भात या 'आरती'ला किंमत किती.

विश्वाची नवी दृष्टी इहवादाच्या अटीतच विकसित होत जाणारी आहे. चैतन्यवादाचे मूल्य व महत्त्व जेवढे म्हणुन समाज आवश्यक तेवढे राहीलच पण आता चैतन्यवादाचा अतिरेक मानवाची इहवादी जागृत जाणीव सोसणार नाही म्हणुन जागतिक संस्कृतीच्या सर्वच अध्यात्मप्रवाह सांप्रदायिक, धार्मिक भक्तिप्रधान साहित्य परंपरेला इहवादाच्या चिकित्सक समीक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

### ''बुद्ध-फुल-गांधी-आंबेडकर : सवाद आणि संघर्ष''

गौतम बुद्ध आणि महात्मा जोतीराव फुले यांच्यामध्ये 'महात्मा' पण हे समान आहे. परंतू या संवादी संदर्भाला विसंगत असा एक पदर या दोन्ही महापुरुषांच्या विचारात्मक भागात आढळतो. म. फुल्यांची निर्भिक संकल्पना ही 'ईश्वरा'च्या संकल्पनेला पर्यायी म्हणुन अवतरली. म. फुल्यांनी निर्भिक ही संज्ञा अनेक वेळा वापरली असली, तरी 'ईश्वर' ही संज्ञासुद्धा वापरली आहे. अर्थात सर्वसामान्य धार्मिक भक्तांचा 'ईश्वर' आणि म. फुल्यांचा 'निर्भिक' निर्भिक ही संकल्पना आहे. याबद्दल वाद नाही.

म. फुल्यांचा निर्भिक दयाळू वगैरे गुणवाण आहे. त्याच्या बुद्धिनिष्ठ भक्तीचे समर्थनही त्यांनी केले आहे. त्यांचा हा 'निर्भिक' माणसामाणसांत भेद करीत नाही. शिवाय माणसाच्या कल्याणाच्या अटीमध्येच या निर्भिकाचे अस्तित्व असून रुढ उपासना, पूजा आणि तत्सम कर्मकांड म. फुल्यांनी नामंजूर केले आहे.

### क्रांतीचे मारेकरी विचारवंत

महापुरूष त्यांच्या 'इझम' व त्यांची चळवळ असे भारतीय परिवर्तनातील चित्र आहे. अर्थात हे चित्र एका बाजूने दिसते. त्याची दुसरी बाजू अत्यंत भयानक आहे. या देशातील प्रत्येक महापुरूष त्या त्या जातीच्या अनुयायांनी आणि नेत्यांनी जातीच्या तुरुंगात कैद करून जातीवाद पोसला असून महापुरुषांची आपसात असलेली आणि नसलेली भांडणे या हुशार मंडळींनी स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठी वाढवली. त्यामुळे सर्वच क्रांतिवादी प्रवाहांचे खच्चीकरण झाले आणि तत्वतः दुर्बल असणाऱ्या प्रतिगामी संघटनांचे व्यवहारीक सामर्थ्य समाजात वाढल्याने क्रांतीची कोंडी झाली. ही कोंडी करण्यात आणि क्रांतीची बीजे नासवण्यात विचारवंत आघाडीवर आहेत. ही शरमेची बाब आहे. तेव्हा प्रतिगाम्यांनी क्रांती रोखली नाहीच; क्रांतीचे खरे मारेरी, क्रांतिवादावर हक्क सांगणारे संधिसाधू नेते. आंधले पाईक आणि अर्धवट विचारवंत हेच आहेत.

### क्रांतिवाद्यांचेही मठ

दुर्दैवाने आज काही आंबेडकरवाद्यांचा, क्रांतीच्या नावे स्वतंत्र मठ स्थापना झाला असून 'सनातन धर्मा'नुसार कर्मठपणातही

मंडळी अग्रेसर होत आहेत. त्यातही अनेक मठ व प्रत्येक मठाचा वेगळा आंबेडकरवादी 'आचार्य' असून, गौतम बुद्धाला आणि डॉ. आंबेडकरांना, त्याच्या कर्मठ नेत्यांनी डोळसपणे पाहिलेच नाही. खरे कम्युनिस्ट डॉ. आंबेडकरच होऊ शकतात. याचे भाव येथील कम्युनिस्टांना आले नाही. कारण राहिली या देशातील कम्युनिस्टांनी, मार्क्सवादावर हा सर्वात मोठा अन्याय केला आहे.

या पार्श्वभूमीवर समग्र क्रांतीचे प्रबोधन एकांगी व अपूर्ण 'इझम'ला वाहिलेली 'व्यासपीठे' करू शकणार नाहीत. समतेचे अनेक पदर असून विविध दिशांनी मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाहांचा समन्वय साधणाऱ्या व्यापक भूमिकेची आज गरज आहे.

कोणतीही एकच एक क्रांतिवादी चळवळ या देशात परिवर्तन घडवू शकणार नाही, याचे भान आंबेडकरवाद्यांना, मार्क्सवाद्यांना व इतरही प्रवाहांना असले पाहिजे, प्रत्येक क्रांतिकारी दार्शनिक वर्तुळातून समाजरूपे शोधणे व त्यांच्या सम्यक समन्वयातून क्रांतिवादी व्यवहार सिद्ध करणे, ही आज प्रबोधनाची व चळवळीची गरज आहे. म्हणुन या तत्वज्ञानात, एक किंवा दोन किंवा तीन महापुरूष कोंडल्याने हा प्रश्न सुटत नसतो. शिवाय महापुरुष व त्यांचे तत्वज्ञान हे साधन असून, मानवमुक्ती हेच साध्य आहे. या साध्याकडे येणाऱ्या विविध दिशा पडताळून त्या मार्गावरील प्रत्येक प्रयत्न समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

### समतेचे आडवे–उभे प्रवाह

बुद्ध आणि त्यांचा संघ हा प्रवाह मानता येईल. सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळ असाही एक प्रवाह सांगता येतो. बुद्ध, आगरकर, आंबेडकर असा एक धागा सापडतोच. साम्राज्यवादाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या मार्क्स–गांधी–आंबेडकरांचाही एक प्रवाह सिद्ध करता येतो. या सर्व प्रवाहांतील मर्यादा, उणिवा, विसंवाद कठोरपणे नोंदविणे आवश्यक ठरते. आणि त्यांचे सामर्थ्य एका समान सुत्रात गुंफून परिवर्तनाची सिद्धता होऊ शकते. पण डोळसा निष्ठा, बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका आणि क्रांतिवादी मूल्यांसाठी आवश्यक असणारी श्रद्धा हवी आहे. त्यागही हवाच आहे.

### बसवेश्वर व ज्ञानेश्वरांचा अनुबंध

संत ज्ञानेश्वरांचा काळ, बसवेश्वरानंतरचा त्यांचा वारकरी संप्रदाय व विठ्ठल पंढरी केंद्रात सन्मानित आहे. मंगळवेढा त्यांचा पंढरपुर यांचे भौगोलिक अंतर आणि बसवेश्वर व संत ज्ञानेश्व त्यांच्या इतिहासाच्या कालखंडाचे अंतर, अत्यंत कमी असल्याने या दोन महान विभूतींच्या भूमिकांचा संवाद, काही सूत्रावर समजून घेता येतो.

बसवेश्वरांच्या सामाजिक समतेची विद्रोही भूमिका व तिचा परिणाम, स्वतःसह त्यांच्या भक्ती नाही भागोवा लागला. तेव्हा सनातनी समाजात आणि त्यामधील कडवी जाननिष्ठता, सहजासहजी जात मोडायला तयार नव्हती. अशा अज्ञानी समाजाचा आध्यात्मिक उद्धार करण्यासाठी, संत ज्ञानेश्वरांनी बसवेश्वरांच्या समतावादाचे तत्त्व जरुर स्वीकारले.  पण ते अध्यात्मापुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे ज्ञानेश्वरींच्या सौम्य समतावादाचा परिणाम, क्रमाक्रमाने हळुवारपणे समाजात रुजला आणि अठरा पगड जातीमधील ज्ञात जाणीव, निदान परमार्थाच्या विश्वात तरी निवळू लागली. गोरा कुंभार, सेना न्हावी, रोहिदास चांभार ते चोखामेळ्यापर्यंतचे सर्व संत, वारकरी संप्रदायाच्या समता सोहळ्यात विठ्ठलाच्या साक्षीने सामील झाले. एका अर्थाने एका मर्यादेपर्यंत, ज्ञानेश्वरांचीही भूमिका तत्कालीन वर्ण–जात व्यवस्थेच्या विरुद्धचा मर्यादित विद्रोहच होता, असे मानता येते. बसवेश्वरांचा जातव्यवस्थेच्या विरुद्धचा मर्यादित विद्रोहच होतो, असे मानता येते. बसवेश्वरांचा टोकाचा विद्रोह कितीही मूल्यात्मक मानला तरी तो समाजपुरुषाच्या मनात रूजला, टोकाला विद्रोह कितीही पसरला नाही क्रांतीची ठिणगी पडली व लगेच ती विझली. बसवेश्वरांनंतर लिंगायत समाज स्वतःला पुन्हा उच्चवर्णीय मानून, जात व्यवस्थेला शरण गेल्याचे वास्तव आहे. लिंगायत पंथात आंतरजातीत विवाह झाल्याची उदाहरणेही फारशी दिसत नाहीत. विरशैव पंथ जातीव्यवस्थेला पुन्हा भाग बनला.

ज्ञानेश्वरांच्या आध्यात्मिक समतेच्या क्रांतीला बसवेश्वरप्रणीत धर्म–समाजक्रांतीने प्रेरणा जरूर दिली, असाच ऐतिहासिक अनुबंध आहे. बसव–क्रांतीचा मागचा इतिहास व फलित लक्षात घेऊनच ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाच्या माध्यमातून सौम्य समतेचा अध्यात्मवादी क्रांतिवादी रूजवला असला पहिजे आणि त्याच मूल्यात्मक संचितावर आजचा सामाजिक–आर्थिक–राजकीय–

परिवर्तनाचा आधुनिक इतिहास उभा असल्याचे दिसते.

अर्थात बसवेश्वर आणि ज्ञानेश्वर यांच्या समतावादी भूमिकांचा अंतस्थ अनुबंध, हाच आधूनिक परिवर्तनवादी प्रवाहांचे मध्ययुगीन अधिष्ठान असल्याचे सत्य अधोरेखित होते.

**पसायदानाचे मूल्य जडवाद्यांनाही मान्य व्हावे**

संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या पसायदानाचे मूल्य जडवादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी आणि तत्सम नास्तिकांच्या भूमिकेनुसार सुद्धा श्रेष्ठच ठरणो आहे, या सत्याची गांभीर्याने नोद घेणे आवश्यक आहे.

वर्तमान जगातील एकूण पाचशे कोटी लोकसंख्येपैकी ख्रिश्चन, मुस्लीम व बौद्ध राष्ट्रे संतवाङ्मयाचे ज्ञानेश्वरीचे अधिष्ठान असणारा अद्वैती सिद्धांत मान्य करीत नाहीत. या सुमारे चारशे कोटी जनतेच्या जीवनात संतसाहित्य उपेक्षितच नव्हे, तर विरोधीही ठरले. कारण इस्लाम, ख्रिश्चन व बौद्ध या धर्मांनी व्यापलेले बहुसंख्य जग व जनता वैदिक धर्माच्या विरोधातून संतसाहित्याकडे परक्या किंवा उपेक्षेल्या नजरेने पाहते. अर्थात याला काही अपवाद जरुर आहेत पण ते अगदी अत्यल्पच.

भारताच्या सुमारे १०० कोटी जनतेपैकीसुद्धा मुस्लीम, ख्रिश्चन व बौद्धांची ३०–४० कोटी जनता ज्ञानेश्वर आणि संत वाङ्मयाकडे आकर्षिक होऊन स्विकारण्याची शक्यता अगदीच कमी! हिंदू धर्मातील सत्यशोधक, साम्यवादी जडवादी, नास्तिक जैन, आदिवासी यांनीही ज्ञानेश्वरी प्रमाण मानून स्वीकारल्यास इतिहास व वर्तमान वास्तवता नाही. या स्थितीत ज्ञानेश्वरांचे मोठेपणा हिंदू धर्माच्या चौकटीत एका मर्यादेत सिद्ध आहे, एवढेच मान्य होते. वरील आकडेवारी वास्तवतेचे भान नोंदविण्याचा भाग आहे. वारकरी संप्रदायात आणि वैदिक परंपरा मान्य करणाऱ्या इतर प्रवाहांत ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठत्व केंद्रित असणे यात नवल असणार नाही. या मोठेपणाला मर्यादा कोणत्या आहेत याचे भाव राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय वास्तव संदर्भातून जेव्हा होऊ लागते तेव्हा ज्ञानेश्वर आणि सर्वच संतांचे एकूण कार्य पुन्हा एकदा चिकित्सेसाठी सत्याच्य प्रयोगशाळेत आणणे आवश्यक ठरते.

ज्ञानेश्वरीची आणि तुकारामांच्या अभंगासह इतर संतांच्याही साहित्याची भाषांतरे जगातील इतर भाषांतून झाली. पाश्चात्य जागतील विद्वान गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम यांच्याकडे आकर्षित झाल्याची उदाहरणेसुद्धा आहेत. पण विज्ञाननिष्ठेचा नव्या जाणिवेने संपूर्ण आधूनिक विश्वच उजळून गेलेल्या या विसाव्या शतकाच्या अखेरीस, इहवादी संकल्पनाच निर्णायक ठरत आहेत. संपूर्ण शास्त्रांच्या शाखा उपशाखांचा विकास इहवाद केंद्रीत होत असतांना ठरत आहे. संपूर्ण शास्त्रांच्या व धर्माच्या संकल्पना शोषणाच्या संस्था असण्याची वास्तवता सिद्ध होतांना ज्ञानेश्वरप्रणीत ईश्वर आणि त्यांचे अध्यात्म आज संशयास्पद ठरत आहेत. अर्थात वैज्ञानिक भूमिकेनुसार बुद्धिप्रामाण्यवादी सत्याचा हा निष्कर्ष व निर्णय आहे.

**महापुरूषातले सामान्यपण**

स्त्रीमुक्ती, दलितमुक्ती, कामगारमुक्ती, बालकांच्या कल्याणाचे कार्य वृद्धांच्या कल्याणाचे कार्य, अपंग, रोगी व गरीब यांच्या कल्याणाचे कार्य अशा विविध मानवतावादी कार्यांसाठी कोणत्या महापुरुषाने व सामान्यजनांनी कोणते योगदान दिले, याची नोंद ही त्यांच्या सामर्थ्यांची नोंद ठरते. मानवतावादी कार्याबाबात ज्यांनी उपेक्षा किंवा विरोध केला. त्यांची सामर्थ्याची नोंद ठरते. मानवतावादी त्यांची ती मर्यादा ठरते. प्रत्येक महापुरूषात जसे असामान्यत्व असते, तसेच 'सामान्यपण' सुद्धा असतेच! पण या सामान्यत्वाचे निरीक्षण, परिक्षण व योग्य मूल्यमापन विचारवंतांनी केलेले नाही म्हणून समाजाच्या कल्याणासाठी झिजलेले महापुरुष त्यांच्या शिष्यांच्या अयोग्य आकलनामुळे व अतिरिक्त श्रद्धेमुळे एकूण मानवाच्या हितरक्षण प्रक्रियेत बाधा बनत आहे.

* * * * *

# फकिरा कादंबरी : समजून घेतांना



**कु. प्रतिक्षा विनोद वानखेडे**
बी.ए.–१

अंधार पडत होता. थोडासा सुर्याचा प्रकाश राहिल्यामुळे थोडा गुलाबी रंग दिसत होता. त्या रंगावरून असे समजून येत होते की, तेथे कुठेतरी सुर्य बूडत आहे म्हणून सर्वीकडे अंधार पडत होता. वारणेपासून कृष्णेपर्यंत सर्व प्रदेशाकडे अंधार पडत होता. तेवढ्या प्रमाणात सुर्याचा प्रकाश दिसतो त्याचप्रमाणे अंधारही दिससत होता. कधी प्रकाश तर कधी अंधार असे चक्र एकामागेमागे चालुच होतं.

जे रस्त्यावर गाव होत त्या गावी बाराशे घर होती ते संपूर्णपणे अंधराने लपली होती. त्या गावाच्या कडेला माळ त्याचबरोबर सात दरे हि होती. सह्याद्रीसारखा मोठा डोंगर तो संपूर्णपणे अंधारात बुडाला होता. त्या गावाला तांबडी वरुन एक वाट आली होती ती सुद्धा गावामध्ये शिरली होती. ती वाट विष्णुपंत कुलकर्णी यांच्या घरापासून गावाच्या चावडीकडे वळुन मग शंकररावच्या घरापासून महारांच्या घरापासून सरळ झाली होती. तिथुनच वळुन मांगवाड्याच्या एका चिंचेखाली जाण लागत होते. पुन्हा तेथुन वळाव लागत होते. पावसाळ्यामध्ये जी थंडीगार हवा येते ती हळुहळु येत होती. आकाशामध्ये सुद्धा ढक जमा झाले होते. असे वाटत होते की, जसी काय तेथे ढगांची गर्दी जमली असावी त्याच ढगात वीज चमकत होती. जेव्हा वीज चमकली तेव्हाच आकाश जसा काल कोसळला असा वाटत फिरत होते.

वारा त्या ढगाला चेंडूसारखा फिरवत होता. सर्व गाव सामसूम झालं सर्व गल्ल्या शांत अशा दिसत होत्या. चमकणे दिवे हळुहळु त्यांचे डोळे लावत होते. सर्व गावातली कुत्रे गप्प बसली, सर्वीकडे शांत वाटत होते.

शंकरराव पाटील एकटाच बाहेर बसला होता. कोणीतरी आपल्याजवळ याव आणि आपल्याला कोणीतरी बोलाव अस त्याला वाटत होते. पण त्याने किती हि वेळ वाट बघीतली तरी येथे कोणीच आल नाही म्हणून शंकरराव खूप चिडला. त्याने स्वतःचे पाय जवळ घेतले व झोके घेत तो स्वतः डुलु लागला आणि समोरच्या रस्त्यावर टक लावून बघत होता. परंतु तरी सुद्धा त्याच्याकडे बोलायला कोणीच येत नव्हत. त्याची शंकररावांना खुप चीड आली होती. जन्मभर कष्ट करायचे आणि शेवटी मरायचं अस त्याला पसंद नव्हत. माणसाने आनंदात रहावे खुश रहावे खेळाव असे त्यांना वाटत असे. उदयास आषाढ लागत होता त्यामुळे त्याचा त्याला हेवा वाटत होता. शेगावमध्ये जोगनीची जत्रा भरली होती. त्याच्या तरूणपणी त्या दिवशी जोगीणी कलायत करून जबरदस्तीने आणली होती. काही दिवसाने काळगावची लोकांना बाजीबा सापडला असता तर त्याचं डोकं कापून बोरीला बांधलं असत परंतू बाजिबा मंजवून माणुस तो शेवातला फिरत असे. आणि आपल गाव अस की इत काहीच नाही. अंधार पडलाकी शद्ब येत नाही. माणूस दिसत नाही, कोणता खेळ नाही कि तमाशा नाही काहीच नाही १२ महिण्यात एकच यात्रा आणि तिही खुप कमी माणसांची एवढं मोठ गाव असुन काय कामाच गावचा पाटील खुप विचार करत होता. तो विचार समघयग्रस्त जाला होता. मग पुन्हा भाणावर आला तेवढ्याचत समोरच्या वाटेवर घोड्याच्या टापा वाजला. पाटील एकीकडे जाला तेबा त्या घोड्याचा मोठा आवाज आला त्या शांत रात्री त्या घोडयाचा आवाज खूप दुर वर गेला. पाटील वाकून बगत होता. कोण चाले तो राणुजी माग होता. राणुजी घोड्यावरुन खाली उतरुन मणाला पाटलान त्याला आग्रह केला आणि म्हणाला ये कि पान खावुन जा रात्र झाली 'लवकरच रात्र झाली' आकाशात पाहत राणोजी गाराच्या भरात म्हणाला. आभाळ पाहुस येतोय 'आता वारा सुटला पाऊस येत नाही' पाटील मणाला थांब राणोजी तेवढ्यात जोत्या जवळ येऊन एका दगडावर बसला. 'अजुन जोपला नाही' ? काय झालं 'काही नाही नाराज वाटत आहे. गावात राग नाही पाटील मनाले विचार सांगु लागला गावात जीवच उरला नाही दिवस बूडाला की गाव जाग्यावर नसतो. 'मग काय कराव त्यानं? दमुनभागुन निजतोय.'

'इतर कोण काय दमत नाही? का त्यांचा संसार नाही? पाटील म्हणाला त्या शेगावची माणसं का दमत नाहीत?' पण एका वर्षात तीन यात्रा करून संसार करतायत ती.

'त्यांच्या गावात जत्रा हायला म्हणुन ते करत्यात अपून काय करावं?'

'यात्रा काय आपोआप भरत नसतात त्या भरवाव्या लगतात. उद्या आपून यात्रा भरवली तर का कोण नको म्हणत आहे?' का कोण हात धरणार आहे?

'मग का धरत नाही?'

कशी धरणार? पाटील गेच म्हणाला 'दिवस बुडाला की कुत्र फिरत नाही. गावात मग यात्रेचा विचार कोण करणार?

आजूबाजूच्या इंग्रजी हिंदी नो रंगलाल आहेत त्या शिगावात उद्याच डोगण्यात भरणार कशा? जोगणी त्यानं भरवली बाजीबान ती कशी?'

'बाजीबात काळवाचा जोगण्यात जाऊन दंगल केली आणि जोगणीच्या हातातली वाटी वळवून आपल्या गावाची यात्रा वाढवली तसा वीर आमच्या गावात कोण आहे'

'का नयची? पंतावानी नि तुमच्यावानी मानस बघाला दाव लागतील की!'

'वाघत्तला ढाव लागण साप आहे पण उभ्या गावाशी लढत जोगणी आणण सोप नाही. त्यासाठी डोंगराएवढे काळीज हव याणे ते माझ्याजवळ नाही ते विष्णूपंत ते कायद्याच्या कोपरखळ्या देण्यात पटाईत आहेत. जीव गेला तरी ते चाकोरी सोडणार नाहीत.'

'मी कधीच कुणाच्या यात्रेला जात नाही' पाटील खिन्न स्वरात म्हणाला लोकांच्या आरतीन ओवाळुन घेण मला बर वाटत नाही. आपल्या घरात अंधार नि आपण उजेडात मिरवायचं हे मला ऊचत नाही असे म्हणून पाटाने राणोजींना पान दिलं दोघांनी पाण खाल्ल आणि राणोजी उद्याचा विचार करू लागला. तो पाटील म्हणाला, या पांढरीला वाजीबा खोतासारखा माणुस पाहिजे तरच या गावाची भरभराट होईल.

लौकिक वाढेल बाजीबान शिगावावर उपकार केले तसे या गावावर उपकार करायला माणूस खरचं जन्माला पाहिजे.

हे ऐकूण राणोजी एकाएकी गंभीर झाला. त्याच मन उगीचच बावर झालं. होतील लगाम पिरगळातील तो अंधारात पाहु लागला वाटेगाव ते शेगाव याच्या मधील असलेला माळ ती नागमोडी वळण ती पांद, मध्ये असलेले निवडुंगाचे ...... सार त्याच्या डोळ्यापुढ तरळु लागल. आणि पाटील म्हणाला,

'जा आता दौलती वाट बघत असलं' राणोजी उठून उभा राहिला तो तसाच विचार करीत निघाला घोडं त्याच्यापासुन चालु लागला तो थळात झाला. कोंडीबा महार अंधारात बसून भजन म्हणत होता. तो दिसत नव्हता फक्त त्याचा घोगरा आवाज आणि त्याचा तो तात्या एवढच ऐकू येत होतं. त्त्रा भजनान रागोजी भानावर आला त्यानं भजनान रागोजी भानावर आला. त्यान समोर रोगाडी मागवाड्यावर पाहील आणि घोड्यावर उडी घेतली गावापासुन एक हाकेच्या अंतरावर असलेला मांगवाडा निबचित पडला होता. पाच पुरुष उंच निवडुंगान त्या पन्नास घरांना वेढा घातला होता. त्या निवडुंगाची दोन टोक त्या गाववाटेजवळ त्या चिंचेच्या झाडाखाली येवुन जुळत होती. तिथंच मांगवाड्यात जाण्याची वाट होती.

त्या निवडुंगात ती घर कशीबशी उभी होती ही असाच्या पात्याची घर भेटल्यासारखी भासत होतं. त्याच्या डोक्यावरच आकाश आता काळवटल होतं, त्यामुळे त्याच धाब दणाणल होतं. मधुनच एखाद घुबड फुत्कारात होतं. मध्येच पिंगळा किजविजत होता. अस्सल नाग व्हाल पक्ष्याची शिकार करण्यासाठी सरपटत होते. तर त्याच्याशी व्हाडवॅर बाळगणारी मुंगस त्या नागांवर रापत होती. काही ठिकाणी त्यांच्या झटापटीही सुरु झाल्या होत्या. सापांच गुरगुरण आणि मुंगसाच चिरकण एकूण मांगाची पोर गर्भगळीत होवुन आयांच्या कुशीत आधिकाधिक शिरत होती. पसरलेले पाय पोटाशी घट्ट धरीत होती. मृत्यु त्यांच्या अशाखश्याल वळवळत होता. तिथं किती माणसं आहेत याची गावाला माहिती नव्हती ती काय खातात याची कोणाला काळजी नव्हती मात्र मांगवाडा त्या निवडुंगा आहे हे सर्वांना माहीत होत ते सर्व सनदशीर शिपाई आहेत. गावात ति रागात जे काही होईल त्याची जबाबदारी त्या मांगावर होती एक री पेंढी इकडची तिकडं गेली तरी सनदशीर शिपाई म्हणून त्यांना जाब विचारला जात होता. ते दर दरस्याला मानाची तलवार पुजत त्या वस्तीत दारिद्र्य आणि तलवार याच ऐकटा जगावेगळ झाल होतं. ज्या वेळी त्यांना इनाम म्हणुन जमीन दिली त्या वेळी अवली मनी घर होती पण आता पन्नास झाली होती. जमीन पुरत नव्हती सनदशीर शिपाई हा शिक्का कायम होता. शेतकीची अवजार नव्हती आणि माग पिचत होते.

आकाशातुन पावसाच्या धारा लागल्या की मागाच्या डोक्यातुन आसु गळु लागत मुजुरीची दार बंद होऊन भुकीची आग लागली होती पोर रडत होती. मातारी टाचा घासु लागली होती. विचार कर करून दमे आणि मग तिच्या पुढे एकत्र मास स्पष्ट होईल.

सर्व झन एकत्र येऊन कोणत्याही वेळी पाऊस असोवा चोरी करायला जायचे आणि भुकेल्यांचे पोट भरायचे दर वर्षी सुगी बनाव लागत होत. दारिद्र्यात वाइटाखेरीज दुसरं काय जन्मणार?

पण त्या निवडुंगात मात्र दणदणीत विपतात पण आगळी एक बळान शरीरानं हिमतीन तरांजुन घालुन जोखुन घ्यावी अशी ती माणस निवजत निर्जीव कोळशाचा निखारा फुलाव चंदनाच झाड उगवाव तशी ती वस्ती वाढत होती. दौलती मांग आप्प्या बाहेर माग यशी वयान झालेली किती तरी माणस त्या वस्तीत कर्ती होती ते मांगवाड्यात आणि गावातही दाण्या वाघासारखे गरजत मी मी म्हणणारे त्यांना वरमत गरमत त्याचप्रमाणे दौलतीचा राणोजी, बळी, पांडू, दगडु, निन्या, सावळ्या, गोदा अशी तरणी निळ्या पोर तलवारीच्या पात्यासारखी वावरत.

दौलतीच्या वयान आता पन्नाशी गाठीत आणली होती. त्याच्या रूबाबदार मिशीत आता पांढरे केस चमकत होते. पण त्याचा दणदणीत पीळदार देह टणक होता. त्यातील जुना वळ भराम होता. शिवाय आता त्याचा राणोजी हा कर्तासवरता झाला होता. घर आणि सरकारी चाकरी तोच पाहत होता.

बायको राहीबाई सुन राधा फकिरा आणि सहदेव दोन नातु आणि मुलगा राणोजी त्यामुळं दौलतीच घर आनंदात भरलं होत तो आयुष्याचे उरलेले दिवस बेफिकीरी पाणे काढीत होता परंतू आज राणोजीला भलताच उशीर लागल्यान तो बेचैन झाला होता.

राहीबाई उदास होवुन बसली होती. फकिरा सहदेव हे बापाची वाट पाहत होते. व तो अजुन का येत नाही म्हणुन बाहेर पाहात याज्याला विचारीत होते त्यांना देवाच्या गोष्टी सांगून राहीबाई वेळ मारून नेत होती. राहीबाई चुलीपुढ बसुन कण्या शिजवीत होती. कण्या रटरटत होत्या आणि दौलतीचे कान घोड्याच्या टापा ऐकण्यासाठी आतुर झाले होत. दहा वर्षाचा फकिरा केविलवाणा चेहरा करून म्हणाला 'बाबा गबऱ्या का चीता?' एका पेंढार लोकाची टोळी गावदरीला उतरली होती. त्यापैकी एका पेढरान आपल्या घोडीच शिंगराचा दौलतीत घोडा केला होता. लहानपणापासून त्याला पोराप्रमाण जपून त्यांचच नाव गठ्या अस ठेवलं होतं तो गबऱ्या साऱ्या गावाचा ओळखीचा झाला होता. फकिरा आणि सहदेव हे बाप कधी येणार असे विचारण्याऐवजी गवऱ्या कधी येणार त्याचा जन्मदाता खरच त्या गवऱ्याच्या हवली असे राज गवऱ्या त्या चिचेखाली येऊन घराकडे वळताच मोठ्यान खिळाले त्याचबरोबर पोर आनंदुन उड्या मारीत बाबऱ्यान खिळाळण म्हणजे त्याचा बाप येण असं समीकरण झालं होत. गबऱ्याच आपल्या बापाला घेऊन जातो आणि सांजेला घेवुन येतो. म्हणुन त्याच लक्ष राणोजीच्या एवजी गबऱ्याच्या वाटेकडले लागुन राहात असे. राहीबाईच्या गोष्टी हु म्हणुन ऐकत बसलेली पोर उगीचच कू म्हणत होती. त्याचं सारं लक्ष बाबऱ्या खिकाळावर होत.

एवढ्यात गबऱ्या चिंचेखाली येऊन वळण घेताना खिकाळला. आलो आलो आम्ही, पोरांनो उठुन उड्या मारल्या आता गबऱ्या आणि दारात येऊन गबऱ्या फूरफूरला दौलतीन लगाम धरून त्याला दाव लावला राणोजीन तलवार पाखाडीत खोचली आणि पोरं करगडीला बिलगली. सदीचा जीव भांड्यात पडला राधा लाजली चोरुन पाहून मान फिरवली दौलतीन गबऱ्याची खदाडी घरात आणली अमाप मक्याची कणसं चुलीवर पळाली आणि दौलती म्हणाला उशीर केलास?

'झाला वाईच पाटलानं थांबवल.'

'इजवाऱ्याच लवकर यायचं' राहीबाई म्हणाली राधान टवकारून पाहिलं. भाजलेली मक्याची कणसं घेऊन फकिरा व सहदेव बापाच्य दोन्ही मांड्यावर बसून ऐकू लागले.

राधान जेवन वाढली, जेवता जेवता 'काय म्हणाले पाटील'.

'काई न्हाय शेंगावच्या जोगण्याची कथा निघाली म्हणी.'

'पंतांची गाठ पडली का?'

'न्हाय पर ही जोगणीची काय भानगड हाय आबा?'

'भानगड कसली, त्यो बारा बलुत्याच्या खेळ हाय' सांगु लागली.

'दोन वैती नवरानवरी व्हायची नि तेची घरात काढायची नवरीपाशी खोबऱ्याची वाटी असती ती पिवळ्या फडक्यात असती तर ती वाटी कनी पळवली वर त्या गावाची ती यात्रा भरायची असा रिवाज होय पर वाटी पळवणारा आपल्या हद्दीत धावला तर त्याच डोरक मारायचा बी रिवाज हाय.' खोबऱ्याच्या वाटीसाठी डोस्क मारल्यानंतर फकिरा दौलतीकडे रागान बघत विचारल आणि दौलती म्हणाला, ती नसती वाटी न्हव ती गावाची अणु असती खोतांना अपराध केला आहे. एक मैल हद्दीत शिरुन आमच शिर नेल आहे. ते परत आल्याववाचून या प्रेताला अग्नी देता येत नाही. आणि ते शिर परत येईपर्यंत या हद्दीत मी पाणी पिणार नाही शिर आणीन वा शिर देईन!' अस म्हणुन पंतानी घोड्याला टाच मारली काळापांढरा तो घोडा उसळुन शिगावकडे निघाला रोणाजीला मुठीवली तलवला काढलं घेवु शंकरराव पाटील ओरडला, 'मी शिगाव बेचिराख करीन नाही तर वाटेगावला आग लावून मीही जळुन मरेन! चलाऽऽऽ!'

पुन्हा तो मानव लोढा निघाला भैरु समोशी कुऱ्हाड घेऊन धावत होता, मारुती चव्हाण पट्टे चढवून झेपा घेत होता, ताथनू महार भाला परजीत सर्वांना माग टाकायचा प्रयत्न करीत होता. कुऱ्हाडी लखवत होत्या, तलवारी झळझळत होत्या. दौलती दुःख विसरुन त्यातुन पळत होता. दुलाजी ढेळण, नाना डोंगरा, पांडु नागरा बळी मांग आप्पा मा आवळा माग एकूण एक म्हातारा तरणा माळान वळत होता. राणोजीच शिर घेऊन येऊ नाही आपलं शिर देऊ हा सर्वांचा निर्धार झाला होता.

फक्त भैरु रामोश्याचा वेगळा होता तो म्हणत होता, 'एका शिराची किंमत मी पन्ना शिर घेणार!' त्यानं गावासाठी शिर दिलं म्हणुन गाव त्याच्यासाठी शिर द्यायला सज्ज झाला.

* * * * *

# लेखक राजन गवस लिखित ''तणकट'' कादंबरीवरील भाष्य



**कु. अंजली नथ्थु दुम्हारे**
बी.ए.– २

गेल्या दोन–तीन दशकात समाजकारणातील आणि राजकारणातील दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता यांचा विदारक दस्तऐवज असे राजन गवस यांच्या तणकट या कादंबरीचे यथार्थ वर्णन करता येईल. विविध जातीतील नवशिक्षीत तरुणांना हतबल करून टाकणारे समकालीन नव वास्तव गवस यांनी प्रभावीपणे मांडले आहे. ज्वलंत समस्या, आदर्शांचे विडंबन, मुल्यांचा ऱ्हास आणि चळवळींच्या विपरीत फोफावण्यातून जाणवणारी उपक्रमशीलतेची निरर्थकता यांचे सावट मानवी संबंधातील मौलिकता कशी ग्रासून टाकते याचे शोकात्म प्रत्यंतर म्हणजे 'तणकट' निखळ अविचारी आक्रमकता आणि मूल्यविवेकाच्या जोपासणीतून जन्मणारी असहाय्यता यातील चिरंतन द्वंद बाळासाहेब शेडबाळे आणि कबीर या व्यक्तिरेखा जिवंतपणे साकारतात. कागदी प्रसिद्धीच्या आधुनिक तंत्रातून निर्माण झालेया बेगडी नेतृत्वाची निरंकुश सत्तालोलुपता गवस यांनी दाहकपणे चित्रित केली आहे. व्यापक उलाढालींचा व्यक्तीव्यक्तींच्या संबंधावर होणारा गुंतागुंतीचा प्रभाव अत्यंत सुक्ष्मतेने या कादंबरीत येतो. हे 'तणकट' या कादंबरीचे यश आहे. वर्तमानाची जटिलता अधिकृत इतिहास हरवून जाते. या तत्त्वाची प्रचिती कादंबरी आणि इतिहास–लेखन यात तफावत करण्यासाठी उपयुक्त ठरते.

एक गडद काळा ढग गावच्या चावडीवर आला. नंतर तो सरकत सरकत म्हारोड्यावर स्थिर झाला. एकदम अंधारले, हवेत उष्मा नव्हता. वाऱ्याला नेहमीसारखीच संथ गती होती. पाऊस पडेल अशी शक्यताही नव्हती. ढग जागच्या जाग्याला स्थिरच कबीरला ढगाकडे बघता बघताच गम्मत वाटाय लागली. कधी कधी असं होतं, ढग अचानक जमा होतात. सगळीकडून काळवंडून येतं पाऊस तर पडत नाहीत. पण काही वेळात फेक्क उजेड, कशाचच नामोनिशान उरत नाही. कबीरनं बसलेली जागा सोडली. म्हारवाड्याच्या मध्यभागी असलेली तक्क्याची इमारत तेवढीच बंगलोरी कवलं सांभाळत उभी. बाकी सगळी खोपटं कुठंकुठं काळ्या डिक्कर पडलेल्या खापऱ्या तर काही खोपटांवर उसाचा काळपट पडलेला पाला. अशात भिमबा म्हार आणि गोपाळ म्हाराची पक्क्या विटांची घरं सगळ्यात उठून दिसणारी त्यांच्या चौकटीला लालभडक रंग लावलेले त्यामुळे त्यांच ठळकपण अधिकच जाणवणारं. एकाच गल्लीचा म्हारोडा. तीस–चाळीस घर, गल्लीत सगळीकडं खडी उडलेली. मध्येमध्ये मोडाले खडे त्यात पाणी साचलेले वर घुंगुरट्यांचा तवंग तक्याजवळ बसलेली तीन–चार कुत्री ढगामुळं अंधारल्यानंतर काचबारुन उडली कान कडकडत इकडे–तिकडे बघता लागली. त्यांनाही त्या ढगाच आश्चर्यच वाटलं असावं. त्यातल एक कुत्र कबीरच्या दिशेने आलं. त्याच्याजवळ आल्यावर दोन्ही पायांवर अंग ताणून आळोसे–पिळोसे देऊन त्याच्या पायाला अंग घासू लागलं. कबीर आश्चर्यान त्याच्याकडे बघत उभा राहिला. बराच वेळ मग अच्यानक ढग सरकत सरकत गावच्या गावंदरीवरुन जवळकीच्या वड्याकडं सरकता म्हारवाड्यात फेक्क उजेड पडला. कबीरला मोकळं मोकळं उडली. तिनं अंग झिंजारालं आणि दोरीला वड बासायच्या आत खोपटाच्या बाहेर आली. कसं कळतं या मुक्या जनावरांना? आपल्या मनातलं पटकन त्यांच्याप्रत पोहचत. लागोलग जाण्यावरंन हालतात. सवयीने येत असेल का हे सारं? कबीरनं खोपटाचं दार लावून घेतलं. दार कसलं? उभा केलेलं पत्र्याचं पान कुलूप लावायला तो विसरला नाही. कशाला लावायचं कुलूप? काय घेऊन जाणार आपल्या खोपटातून कोण? चार गाडगी आणि फाटकी कपडं जमवलेले खिदूकमिदूक आणि चोरानं यायचंच हरवल तर खोपटाच्या दाराकडं याचची गरजच नाही. खोपटाला तुरकाट्याचा कुड, जरा जरी हिसकाहिसकी केली तरी अख्खं खोपाट उघड होऊन पडेल. मग कशाला या कुलपाचा खटाटोप? त्याचं त्यालाच हसू आलं.

शेळी पुढं आणि तो मागं. दोघ गल्लीतून चालले. सगळ्या म्हारवाड्यातल्या घरात चिडीचिप्प कुठं तरी एखादी म्हातारी सगळा म्हारोडा कशाबशाला बाहेर पडलेला. असे लोक तर किती? म्हातारी–कोतारी चिल्ली–पिल्ली घरुन दोन तीनशे झाले असते.

म्हारोड्यातनं बाहेर पडल्यानंतर कबीर रस्त्याला आला. म्हारोड्याच्या खालच्या बाजूलाच मांगोडा. त्याच्या थोड्या वरच्या बाजूला ढोराची तीन–चार घरं. म्हारोड्याच्या खालच्या बाजूलाच मांगोडा. वरच्या बाजूला वडारांची पन्नास–साठ घर लागूनच गावाला सुरुवात होते. चार गल्ल्याचं गाव लागून भली मोठी गावंदर. गावंदरीलांच शेळीला फिरवून इकडं–तिकडचा पाला घालावा. अस त्याच्या मनात आलं नंतर वाटलं जळकीच्या वड्याला जाऊन शेळीला फिरवून आणावं, मग तो गावाच्या गल्लीतनं जळकीच्या वाटाला लागला आता मात्र चालण्याचा वेग वाढला. तो पुढं आणि शेळी माग.

पांदीत आल्यावर त्यानं कसलाबसला पाला वरबडून शेळीला चारायला सुरुवात केली. शेळीच इवलंसं तोंड बारीक लूटूलूट हालाय लागलं. त्याचा त्याला तिच्या तोंडाकडं बघता गम्मत वाटाय लागली. तिचे बारीक दात. इवलीशी जिवणी येणारा कुरुमड कुरुमड आवाज, भिरभिरणारे डोळे, त्याला सगळेच बेहद आवडून मग किती तरी वेळ तो तसाच बघत राहिला. काय रंडड कबऱ्या. आज शेळी हिकड कुठं कुणाच्या तरी आवाजान तो दचकला पांदीतनं कसाळ्याचा जानबामां समोरुन येत होता. कबऱ्या फक्त हसला. शेळी गायब हाय काय इद देती रंऽऽ? मानबामान समोर येतच पुन्हा त्याला विचारल आता बोलणं भाग होतं. तो म्हणाला, दुदबी देती आन गाबबी हाय. आपण एका वाक्यात सगळच बोलणं थांबवण्याचा प्रयत्न केलाय. यश आलं तर बर होईल. असं त्याला वाटाय लागलं एवढ्यात जाननामा म्हणाला– सदोबा राण्याच्या गेलाय वाटते कामाला? कबऱ्यान पुन्हा हसायला प्रयत्न केला. माहिती असूनही हा पुन्हा विचारतो गम्मतच आहे. जानबा कसाळ्या वाटला लागला आणि त्याला बरं वाटलं. थोड्या वेळान त्यांच्या पुन्हा मनात आलं. आपल्याला असं का होते? खरं म्हणजे जानबा कसाळ्याबरोबर मोकळेपणानं बोलायला काहीही हरकत नव्हती. तो तर किती आपुलकीनं बोलत होता. मग आपण त्याला फक्त हसून कटवण्याचाच प्रयत्न का केला? त्यानं विचारलेलं कोणीही भेटणारा विचारतो. मग त्याला आपण सरळ बोललो असतो तर काय बिघडलं असतं? आपल्याला बोलण्याचा कंटाळा कसा? कंटाळा म्हणाव तर हे सगळीकडंच असे होत नाही बऱ्याच ठिकाणी आपण अगदी नको इतकं बोलत बसतो. असं का व्हावं?

तो आणि शेळी शिंद्यांच्या मळवीला पोहचले शिंद्याच्या असाच्या जवळपास कुणाचाच सासूल नव्हता त्यात पून्हा पून्हा कान टवकारून अंदाज घेतला. लांबवर कोणीच दिसत नव्हतं. ऊसाकडेच्या बांधावर वाढलेल्या हिवरागार गुलबा बघून शेळी तिकड वड खायला लागली. कोणचं दिसत नाई तर चार घास चरायला काय गेलं? त्यानं हातातली दोरी थोडीशी सैल सोडली. शेळी तुटून पडली. तिला किती खाऊ अस होऊन गेलेलं शिंद्याच्या ऊस गोडीशी सैल सोडली. भलताच वाढीला लागलेला आताच एवढा तर हंगामापर्यंत हा ऊस किती मोठा होईल? त्याच्या मनात सहज प्रश्न आला. शिंद्याच कुळ गावांतून मनगंड कुळ. निव्वळ ऊसच शंभर–दीडशे टण जात असेल त्यात घरात पाच–सहाच माणस. खर्चाचही जेवढ्यास तेवढं. त्यामुळं दाबजोर पैसा. म्हारोड्यातली पंधरा–वीस माणसं तरी रोज त्याच्या मळ्यात कामाला असतातचं. एवढा मुबलक पैसा असुनही पैशांचा लोभ का बरं सुटत नसेल? की पैशांमुळंच पैशाचा लोभा निर्माण होत असेल माणसाला? कबीरला आठवलं. किसरना शिंद्यान पोराला पैसे खर्च कराय लागतात. म्हणून घरात ठेवून मारलं. त्याच्या पायाला कसली नागिन उडली होती. बघता बघता वाढत गेली. डॉक्टर म्हणाले, पुण्याला न्यावं लागेल. तरच पोरगं वाचेल. तीस–चाळीस हजार खर्च होतीलं. शिद्यानं त्याला घरात आणून टाकलं आणि म्हणाला त्यांच्या नशिबात आसलं तसं व्हईल. गाव अक्षरशः भुकलं पण गड्यात कसला तो बदल नाही. पैषांची मायाच चिकट. तो स्वतःशीच हसला.

कोण चारालां यरंऽऽ शेळी त्योऽऽ लांबूनच कोण्यातरी बाईचा आवाज झाला आणि कबीर काचबारला त्यानं गडबडीत शेळीला वडलं, तर ती काय हालायला तयार नाही. त्यानं ताकदिन शेळीला फरफटतच बाजुला घेतलं. तोवर किसना शिंद्याची बायको त्याच्यसमोर दत्त. 'तुला काय लाजगीज वाटंती व्हय रंऽऽ लाजगिड्या भाड्याऽऽ? बापसाची मिळकत असल्यागत शेळी बांधावर चारायलास, त्येच्यापरास कापूस खा जाऽऽ की गुलामाऽऽ' शिंद्याच्या बायकोच्या तोंडाचा पट्टा सुटला. शेळी लईच वडीला लागली म्हणून जराशी आज्जी कबीर कसवत बोलता. तशी म्हातारी पुन्हा खवळली. 'वर आनी भाड्या जराशी चारली म्हणतोय', तिचा आवाज चढला. 'गावच्या रानात चारत्यासा तसं हाये शिंद्याचं रान समजू नकोसा. भाड्या, तुझा बालासद्याला काल कामाला बलवाय गेलो तर म्हणाला सवड न्हाई. आक्काबा राण्याच्यात जातोय म्हनला. मग शेळी चारायबी त्येच्याच शेतात जाईत जा की रंऽऽ' 'उद्यापासनं तसं करतो आजी' कबीर हळूच पुटपुटला. तशी म्हातारी एकदम अंगावर आली. 'भाड्याऽऽ म्हार त्या म्हार आणि बोलतोय

बघ तालेवार!' कबीरनं काढता पाय घेतला. तो लांब जाईपर्यंत म्हातारीच्या तोंडाचा पट्टा चालूच होता. च्या आयला, चुकलंच आपलं गप्प ह्या पांदीतला आणि जरा पाला शेळीला घाता असता तरी तिचं पोट भरलं असतं. मग कशाला गेलो आपण तिच्या बांधाला? फुक्कटची इदरनी करून घेतली. हे त्याला काही नवीन नव्हतं. अगदी सवयीच पण अलीकड हे असलं बोलण सहन करण्याची ताकद संपत चालली आहे. असं त्याचं त्यालाच जाणवलं होत. त्यामुळं काहीही घडलं नाही. चुकच त्याची होती आणि त्यानं ती त्याला मान्य असल्यामुळं काहीच घडलं नाही असं समजन तो शेळीला घेऊन पांदीतून चालत राहिला. सदबा म्हार खोपटातल्या आठ्याच्या मेढीला पाट टेकून गळ्यात गुडघं घेऊन चिलमीला छापी गुंडाळत बसला होता. त्याच्या जवळच कबीर पोत्यावर पुस्तकं पगळून उगाचाच पानं पालटत होता. जवळच धाकला सुबऱ्या मन लावून अभ्यास करत होता. चुलीजवळ आई–गंगब्बा फुकून फुकून इंगळाला जोर आणत होती. कबीरनं पुस्तक मिटवलं. खोपटात एकच चिमणी तीही त्याच्या आणि सुबऱ्याच्या समोर तिची फिक्कट उजेड सगळ्या ओपटात शेळीच रवंथ निवान्त चाललेला, सदबानं आणलेली ऊसाच्या पाल्याची पेंडी तिच्यासमोर पडलेली, कबीरनं मेंढीला टेकून बसलेल्या बापाकडं नजर वळवली. रापलेलुं अर्धंअधिक उघडं अंग, फाटलेल्या मुंडाश्यात झाकलेलं गालाची खनडं एकमेकाला भिडलेली, त्यावर पांढरक्ट खुरटे केस. पिठामिठाच्या उजेडात बापाचा चेहरा भलताच भेसूर दिसत होता. गंगव्वा उघडून पुन्हा पुन्हा हवत होती. कबीरला आईकडं बघणं जमलं नाही. त्यानं पुन्हा पुस्तक उघडलं. अशातच गंगव्वा म्हणाली. उद्याच्या दीस साळा चुकली तर कसं व्हईल रंऽऽ कबरू?

कबीर एकदम दचकला. काहीच न बोलता पुस्तक मिटवून बसला. तशी गंगव्वा पुन्हा म्हणाली. उद्याचा दीस गणबां पाटलाच्याच कामाला आलास तर आठ पायली भात उसन दीतू म्हणतोय. त्येलबी माणसाचा लई खुळांबा झालाय. व्हवू दे तिकडं सदोबा त्येच्यात कबरून जायचं न्हाई तुझी तूच जा एकटी न्हाई दिल भात व्होतर. त्येचा त्यो साळला जाऊ दीत. वाटलं तर सुबऱ्याला घिऊन जा. त्योबी बुडली साळा तर चालतिया.

त्याला बापाच्या बोलण्याचं एकदम हसू आलं हा अलीकडं बापाकडे बापामध्ये होत असलेला बदल त्याला सारखा बोचत होता. तो जेव्हा कॉलेजच्या पहिल्या वर्षात होता. तो जेव्हा कॉलेजच्या पहिल्या वर्षात होता तोवर बाप हक्कानं त्याला शाळा चुकवून कुणाच्यातही मजुरीला न्यायचा. प्रसंगी दोघात भलतीच झणपण व्हायची. पण बाप माघार घ्यायचा नाही. मग कबीर पडती बाजू घेऊन त्याच्या बापाला वाटतयं. त्यामुळं तो स्वतःहून सुट्टीच्या दिवशी कुणाच्या बांधाला चालला तर तो कडाडून विरोध करायचा. एकदा त्यानं बापाशी हुज्जत घालूनही बघितली होती. पण तो मनातलं काहीच सांगायला धजला नव्हता. त्यामुळं त्याला बापाच्या या पण कबीरला  नको. बापाच्या मनात काय चाललयं याचा अंदाज घ्यावा म्हणून तो शांतपणे म्हणाला. आई–सुबऱ्या नको. मीच येतो आणि एकाद्या दिवशी बुडालं कॅलिज तर काय व्हईत न्हाइ, तसा सदबा एकदम म्हणाला.

मी सांगतुया म्हणून तू जायचं न्हाय मी गेलो तर काय व्हतयं? तु गेल्यावर माती व्हतीया आणि मसाण व्हतंय तला काय करायचं? सांगतुया तेवढ आयकायचं. सगळा करायची सदबाचा आवाज चढला आणि तो एकाएकी गप्प बसला. त्यानंतर किती प्रयत्न कुनही बाप काही बोलला नाही. त्यानं नाद सोडला. गंगव्वानं ताटं वाढली, तसा कबीर ताटावर जाऊन बसला.

तक्याच्या कट्टीवर नेहमीसारखी सगळीच पोर गल लावून बसलेली. गौत्या उभ्या उभ्याच गप्पा छाटत होता. अंगावर तालवार टॅविल. खाकी रंगाची पँट. हातात चमकणाऱ्या पट्ट्याच घड्याळ, आपण बसलो तर पँट चुरगाळलेल या भीतीने तो उभ्या उभ्याच बोलत होता. त्याच्या समोर पंढऱ्या लुंगी लावून नुस्त्याा बनियनवर तोंडात तंबाखू धरुन बसलेला. त्याच्या गळ्यात साईबाबांचा ताईत लोंबत होता. शेजारीत पाड्या, तान्या, इटल्या, रात्र्या अशी सगळी पोरं त्याच्या सोबतीनं हायस्कूलमध्ये शिकणारी हान्या, तुळजा, तुक्या ही बारकी पोरं, त्यांच्यात मिसळून बसलेली. कबीर नेहमीसारखाच त्यांच्यात आला. कट्टीवर टेकत तुळज्याला म्हणाला जाऽऽ की रंऽऽ आब्यास कर जाऽऽ काय सरांनी आंब्यासाच सांगाय न्हाई? हुंऽऽ आता हायस्कुलात शिकवायला सवड कुणाला हायं गौत्या आपल्या हातात विषय घेत म्हणालं. कबरुदाऽऽ तुझ्या येळच हायस्कुल येगळं आनी आताचं येगळ काय एक एक मास्तर भरून ठेवल्यात म्हणतोय. इ्याट सुद्धा शिकवाय ईत न्हाई! बगल तवा हो सगळे मिळून फिरतच असत्यात.

आर आसं कधी झालंय काय? जो तो आपापलं तास घेतल्यावर हिंडत आसल, त्यात काय बिघडलं? त्यान गौत्याची

समजूत काढायचा प्रयत्न केला.

घ्या आता, ह्या आमाला श्यानपणा शिकवालायं गौत्या म्हणालं. अं गाऽऽ दिवसभर आमी गावातच आसताच. तुज्यासारक कॉलेजबिलेजला जाईत न्हाई. म्ळणून आमाला जे दिसतय त्ये तुला कसं दिदसलं? आम्ही बघताव की रोजच्याला सगळी पोरं हिंडत असतात शाळभोत्यान तुझं खरं असलं रंऽऽ म्हणजे काय तुळज्यानं अब्यास करुन तुज्यासारखं मोकळं हिंडावं म्हणतोस? कबीरचा आवाज एकदम चिडका झाला. म्हणाला अरंऽऽ या म्हारोड्यातलं एक पोरगं दहावी पास व्हवून बारावी गाटंना झालंय. सगळी आपली नापासच. बघा जरा मांगोड्यात या वरषी पाच पोरं बारावीला हाईत तुमच्यात कोण गेला बारावील? बसल्यात हिंत कट्टीवर नापास व्हवून : उठा रंऽऽ बाबाऽऽ उठा. गौत्या म्ळणाला, ये तुळज्या, हाऱ्या, तुक्या, उठा लेकानु आब्यास करा जावा. मग धावी पास व्हशीला. मग कालेजला जाशीला मग बाबासायबानंतर नंबर तुमचाच! उठाऽऽ उडा आमच्यात बसू नकोसाऽऽ उठा!

गौत्याच्या बोलण्यानं संगळ्याचंच खीड खीड खुड खुड सुरु झालं मग त्याला काहीच बोलावंस वाटलं नाही. तो तक्काजवळनं हालला. चालता चालता त्याच्या डोक्यात आलं, बाबा यामुळंच आपल्याला कुणाच्या बांधाला कामाला जाऊ देत नसल का? पांढऱ्या, गौत्या, पांड्या ही दहावी नापास झालेली पोरं कुणाच्या बांधाला कधी जात नाहीत. मग आपला पोरगा जातोय हे खटकत असल का? असंल कदाचित असंही असंल नाही तरी बापानं एवढा कडकडून विरोध केला नसता. त्याच्या समोर पोर कदाचित बडबडत असतील. एवढा कॉलेज शिकतोय आणि दुसऱ्याच्यात कामाला जातोय याचाच हा परिणाम झाला असणार बापावर. या पोरांना एकदा समजून सांगायला हवं. नाही तरी उडगं फिरण्यात यांची ही चार-पाच वर्ष गेली तर ही पोरं पुढं कारणार काय? त्यापेक्षा गौत्या, पंढऱ्या आणि पांड्याच्या घरातल्यांनाच समजून सांगावं. पण त्या बिचाऱ्या अडाण्यांना तरी काय कळणार?ती दीवसभर राब-राबतील कधी आणि त्यांच्यावर लक्ष ठेवतील कधी? त्याच्या त्यांना आक्काला यायला पाहिजेत. त्याशिवाय काय खरं नाही. त्याच्या मनात बरंच कायबाय यायला लागलं. तो माघारी वळला आणि तक्याजवळ न थांबताच खोपटाकडं वळला. गणपतराव पाटील, डेअरीचे चेअरमन बाबू भेरू पाटील, अक्काबा राणे, किसना शिंदे, जानबा मास्तर अशी गावातली बरीच जाणती मंडळी चावडीत एकत्र येऊन घडलेल्या भानगडीबाबत गंभीरपणे चर्चा करत होती. जबाबाला दुध डेअरीचा सेक्रेटरी तुळशीदास मिसाळला सगळ्यांच्या समोर उभं केलेलं सगळं जणच गंभीरपणे घडल्या गोष्टीची तड कशी लावायची या विचारात गुंतले होते. डेअरीच्या जनरल मीटिंगला दगडू भरमू देसायानं जेव्हा पहिल्यांदा डेअरीत साठ हजारचा भ्रष्टाचार आहे असा आरोप केला. तेव्हा पहिल्यांदा चेरमन बंडू पाटलानं त्याला खुळ्यात जमा करून टाकलं, विरोधक म्हणून काहीही बकत सुटतो म्हणून त्याची खिल्ली उवली. त्यावेळी दगडू देसायाबरोबर असणाऱ्या लव्हाराच्या जान्यानं ऑडीट रिपोर्टचा झेरॉक्स कागद चेरमनसमोर टाकला, तेव्हा बंडू पाटील टाणकन खुर्चीवरून उठला आणि कावराबावरा होऊन तुळशीदास मिसाळकडं बघु लागला. तेव्हा सगळ्या विरोधकांनी मिळून चेरमनचा राजीनामा मागायला सुरवात केली. आणि एकच गोंधळ उडाला. आक्काबा राणेनं दोन्ही गटाची समजूत घालून यात खरं-खोट बघूया आणि मग ठरवूया, असं भरल्या मीटिंगमध्ये सांगितलं तेव्हा मीटिंग संपली. चेरमन बंडू पाटलानं जानबा मास्तरला घेऊन सगळा ऑडिट रिपोर्ट वाचून काढला. तेव्हा त्यालाही खात्री पटली की, आपण चेरमन असतांनाच साठ हजाराची अफरातफर झालीय, तेव्हा त्याचं आवसान गळाटलं, बॉडीतले बाळासाहेब शेडबाळे, दादू सत्याप्पा कांबळे, पांग हाऱ्या आणि मिचक भीम्या आधीच गावभर बोंबलत सुटली – हे पैसे चेरमननंच खाल्लं, तेव्हा बंडू पाटलाचा आटा सरकला. तेव्हापासून त्यानं गणपत पाटलाचा आणि आक्काबा राणेचा उंबरा सोडला नाही. म्हणून आक्काबा राणेनं सगळ्यांना गोळा घातल होतं. आक्काबा राणे तसा गावातला इनामदार माणूस. पन्ना बिग्याची उत्पन्न त्यात तालुक्याचा आमदार महिपतराव सरनोबत त्याचा जवळचा नातलग. तालुक्यातले सगळे इनामदार-वतनदार त्याच्या सलगीतले आणि पावण्या-पैच्या संबंधातले. आक्काबा राणे गावात कुठल्या सत्तेवर नव्हता, तरीही त्याच्या या संबंधामुळे दोन्ही पार्टीचे लोक त्याला वचकून होते. सहसा त्याचं म्हणणं कोण मोडत नसे आणि आक्काबा राणेही खरं असेल त्याचीच बाजू घेऊन उभा असायचा. त्याला मुळात वावगं खपायचंच नाही. त्यामुळं लाडी-लबाडी करणारं टोळकं त्याच्यापासून चार हात लांब असायचं. त्यात गडी दांडक्यानही घट्ट. भावकीच नुस्ती पन्नास घराची. हाक मारली की शंभरभर काट्या-कुऱ्हाडी तयार. पण त्याचा उपयोग काही आक्काबा राणेनं गावात दहशत निर्माण करण्यासाठी केला नाही. त्यामुळं अजूनही गावातल्या बायकासुद्धा आक्काबा समोरुन आला की, पाठमोऱ्या होऊन उभ्या

राहतता. या सगळ्याचा आक्काबाला अजिबात गर्व नाही. उलट रस्त्यानं जातांना कुणाच्याही पोराला कडेवर घेऊन चार–आठ आण्याचे चिरमुरं–फुटाणं घेऊन देणार. त्यामुळे लहान पोरापासून मोठ्यापर्यंत त्याचा शद्ब कोण टाळत नव्हतं.

गणपतराव पाटलांत तुळसीदास मिसाळाला बसल्याच विचारलं, बाबाऽऽ तुझं म्हणणं काय एकदा सांगून टाक तर तुळसीदासनं खाल मान घातली ती वर काढलीच नाही. तसा चेअरमन बंडू पाटील खवळला. बोल की भोसडीच्या, आता का त्वांड शिवलं तसा आक्काबा राणे म्हणाला, बंडू चेरमन, जरा धीरानं घ्या. एवढं ऊनऊनीत खायला नको मग तुळसीदासकड बघत म्हणाला. बाळ तुळसीदास, तु काय लोकाचा नव्हंस आमचाच हाईस. काय झाली आसली चुकी तर सगळी मिळून निस्तरूया खरं तू एकदा काय आसंल नसंल त्ये सांगून टाक म्हणजे मग बर तुच खाल मान घालून गप्प बसलास तर व्हयाचं कंस? राणे मालक, ह्यात मलाबी फशीवलंय, तुळसीदासन तोंड उघडलं कुणी? त्या शेडबाळ्यानं आणि दादू म्हारानं त्येनी काय केलंय? हेच की– तुळसीदास म्हणाला सगळ्या किर्दी तो शेडबाळ्याच लिहायचा मला म्हणायचा, तुला काय जमायचं न्हाई माझ मीच बघतो. तू नुस्ता गप्प बसत जा. पैसेबी बँकेतनं त्योच काढून आणायचा. आता रोज तालुक्याला जातोय. बँकेत नोकरीला हाय म्हटल्यावर मीबी इस्वास टाकला. आणि तू काय हाजमत करताय काम? बंडू चेरमनंन मध्येच तोंड घातलं तसा आक्काबा एकदम चवताळला, आरंऽऽ त्यो हाजामती करता आणि तू चेरमन आसून काय करायतास? जरा गप्प की, त्यो काय सांगतोय ऐक तरी, तसा बंडू चेरमन गप्पगार बसला, तुळसीदास पुढं सांगाय लागला. मला संवशय आला तवा मी इच्यारलं तर शेडबाळ्या म्हणाला, तुझ्यावर काय आलं नाही म्हणजे झाले न्हवं? माझं मी निस्तरंतो आणि मलाबी कडीनकडीला चार–पाच हजार दिल्यानं हाय त्ये माझं मी परत करतो आणि बाकीच्या पैशाला धनी कोण? आक्काबानं प्रश्न केला. त्ये शेडबाळेनं भराय पायजेत त्येला तू इच्यारलास? इच्यारलं खरं, त्यो म्हणतोय–यात माझा काय संबंध न्हाई. तू हाईस आनी चेरमन हाय, बघून घ्या.

कव्वा म्हणाला आसं?

मीटिंगच्या दुसऱ्या दिवशी

मग तू काय म्हणलास?

मी सगळ्यासमोर तुझं नाव घेणार म्हणून सांगितलं तर म्हणाला, माझ नाव घे जा आणि काय वाट्टेल ते कर जाऽऽ मालक, आता त्या बदत न्हाई. त्यात मला गळफास लावणार, तुमीच वाचवाऽऽ म्हणत तुळसीदास घळाघळा डोळ्यातनं पाणी टाकून रडाच लागला. कोणाच कुणाशी काय बोलल नाही. आक्काबा राणे डोक्याला हात लावून बसला. बंडू चेरमनच्या डोळ्यासमोर शेडबाळ्या नाचाय लागला.

आता बलवून आणि जा शेडबाळ्याला. बंडू चेरमन गरजला, आक्काबा राणेचं त्याला शांत केलं आणि सगळ्यांनाच म्हणाला. आता जरा इच्यारानंच पाऊल टाकूया. तवर गडबड नको. मग सगळे उठले. कबीर कांबळे कॉलेजच्या पटांगणात पोहोचला तेव्हा सगळे तास सुरु झालेले. त्यानं पटांगणात रिकामटेकड्या फिरणाऱ्या पोराला वेळ विचारली, तेव्हा त्याच्या मनात आलं, आपणही घड्याळ घ्यायला पाहिजे. घड्याळ नसल्यामुळंच हा रोजचा उशीर होतो. नाही म्हटलं तरी गावापासून चालत यायला अर्धा–पाऊणतास सहज जातो. सायकल घ्याची ठरवूनही त्याला जमत नव्हतं त्यामुळं पायी रपेट करता करता थोड उशीर व्हायचाच. कधी तास सुरु होऊन फक्त वीस मिनिटं झाली होती. फारसा वेळ झालेला नाही अशा समजुतीनं तो घाईघाईनं वर्गाच्या दारात गेला. तर प्राध्यापक श्रीनिवास गजेंकर दार बंद करून राज्यशास्त्र शिकवत होते. दार ढकलून आत जाण्याचं धैर्य गोळा करत तो उभा राहिला. इतक्यात दुसरा एक आला आणि त्यानं सरळ लाथ मारुन दरवाजा उघडला तो आत शिरला. पाठोपाठ कबीर प्राध्यापक गजेंकर शिवकता शिकवता थांबले ते दोघे पाठीमागच्या बेंचवर टेकतात न टेकतात तोच प्राध्यापक गजेंकरांनी कबीरला उभं करत विचारल–दारावर लाथ कुणी मारली? कबीरनं काहीचउत्तर दिल नाही. तो खाल मान घालून उभा राहिला. तसा प्राध्यापकांनी दुसरा प्रश्न विचारला.

नाव काय तुझं?

कबीर सदाशिव कांबळे

मग बरोबर आहे. बैस तू प्राध्यापक छद्मीपणे बोलले आणि अख्खा वर्ग खळसूळ हसला. गसळे का हसताहेत हे पहिल्यांदा कबीरला

समजलं नाही. पण लगेच त्याच्या ध्यानात आले. अचानक त्याचा चेहरा बदलला. पुन्हा शिकवाय लागलेल्या प्राध्यापक गजेंकरना तो म्हणाला– एम मिनिट सर, म्हणजे तुम्हाला काय म्हणायचं आहे? ते तुला नाही समजणार प्राध्यापक गजेंकर म्हणाले, तुझ्या तो पटकन ध्यानातही येणार नाही. शिक्षणाला एक संस्कृती लागते. ती नसली की असंच होणार? नुस्त्या स्कॉलरशिर सवलती देऊन शिक्षण पोहचत नाही. त्याला संस्कार असावे लागतात. सर, तोंड आवराऽऽ कबीर जवळजवळ एकदम किंचाळलाच आणि म्हणाला तुम्ही जे बोलताय ते मला चांगलं समजतयं, त्यातून तुमचीच संस्कृती आणि संस्कार दिसतात. जे बोलायचं ते वीचार करून बोला. दारावर लाथ मी मारलेली नाही. यानं मारलेली आहे. आणि याचे आडनाव कुलकर्णी आहे. आता बोला त्याला बोलता दम लागला. अंग थरथरत होतं. प्राध्यापक गरजेंकरना काय बोलावं कळेनास झालं इटूकल्या अंगाचा कापरा सावरत ते म्हणाले बरं बरंऽऽ असुद्यात, बसा आपण विषयाकडे वळू,सगळा वर्ग धीरगंभीर. सगळ्यांच्याच नजरा आश्चर्याने कबीरकडं वळलेल्या. प्राध्यापकांची पालटलेली परिस्थिती बघून मुलं अधिक गंभीर झाली. कबीर आपल्या जागेवर बसला. त्याला अंगात अजुनही कंप जाणवत होता. आरं त्यो तसलाच मास्तर हाय. त्येचा नादाला कशाला लागायचं? राजा कांबळे वर्गातून बाहेर पडत्याच त्याला म्हणला, मग काय करायचं? ते म्हणतील ते सगळं ऐकून घेऊन गप्प बसायचं? बरं, माझी चुक आसती तर सगळं एकून घेतल असतं. चुक नसतांना बोलतात म्हणजे काय? कबीरचा पारा अजूनही उतरलेला नव्हता. या साल्याचं एकदा काय तरी कराय पायजे लईच टूरटूर करत असतोय. बी.सी. पोरांकडं मारक्या म्हशीसारखं बघत असतोय. एकदा हेचं डोळं काढून हातात द्यायला पाहिजेत. जयाप्पा कांबळेनं आपलं खदखदत मन मोकळं करायला सुरवात केल. मग त्या दोघांच बोलणं वाढतच गेलं नंतर कॉलेजमधली आणखी पोरं येऊन त्यांच्यात मिसळली. कबीरला मात्र उगाचाच अस्वस्थ वाटू लागलं अजूनही त्याच्या मनाचा पारा जाग्यावर येऊन बसलेला नव्हता. तो घोळक्यातून बाहेर पडला आणि एकटाच झपाझप चालत राहिला....

एकदा डोक्यात चाललेलं सगळं घालवून टाकल्याशिवाय आपलं लक्ष कशातच लागणार नाही. वास्तविक ही सवय वाईटचं. सगळं कसं लगोलग विसरता आलं पाहिजे. क्षणात मन कसं पुसून मोकळं करता आलं पाहिजे. कोरा करकरीत चेहरा ठेवून जगता आलं पाहिजे. आपण उगाचचं भावनाविवश होतो. एवढ भावनाविवश व्हायला आपण काय नन्हूलं बाळ आहोत? काळजाचा दगड करण्याची कला अवगत झाल्याशिवाय आपलं काही खरं नाही. उगाचाच मनात उलटसुलट सुरु होतं. खर म्हणजे आपण गजेंकरांशी वागलो ते योग्यच मग मनात सारखं योग्य–अयोग्य का येतं? हे थांबवणं आपल्याला का जमत नाही?

चालता चालता कबीरच्या डोक्यातला गोंधळ वाढतच होता. रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती. चुकून एखादं वहान इकडून–तिकडे पळत असलेलं बाकी रस्ता कोरा करकरीत. तो सार्वजनिक वाचलनायाच्या पायरीवर पोहचला. आत माणसांची गर्दी. प्रत्येक पेपरभोवती पाचसहा–पाचसहा जमलेले. प्रत्येकाची भिरभिरती नजर मोकळा हॉलमध्ये उभे केलेले पेपर स्टॅण्ड त्यावर पेपर भोवती गर्दी. एका कोपऱ्यात आठवड्याचे जुने पेपर टाकलेले. तिथ कुणीच नव्हतं. तिथल्या बाकड्यारव जाऊन तो टेकला. सापडेल तो पेपर हातात घेतला. राजीव गांधींची नवी घोषणा. तो स्थिर नजरेनं तेवढ्यात ओळीकडं पाहात बसला घोषणा? काय घोषणा? कशाविषयीची कुतूहल त्याच्या मनात निर्माण झालं नाही. अशा छप्पन घोषणा. त्यातून फायदा काय? आपण समजून घेतलं नाही तर काहीच बिघडणार नाही. त्यानंतर त्यानं तो पेपर हातातून टाकला. नंतर दुसरा उचलला, मग तिसरा. असं सगळा ढीग पालथा घालेपर्यंत चालू राहिले. नंतर तो ताज्या वर्तमानपत्राकडं वळला. पाच–सहा जण 'सकाळ' वाचत होते. त्याच्या गर्दीत त्यानं डोकं खुपसलं. मग मानेला जोर देऊन रेटलं, त्याचे डोळे पेपरवर भिडले. भली मोठी अक्षरं तो एकदम भांबावला सर्रकन मागे सरकला. उभे असलेल्या दोघा–तिघांनी त्याच्याकडं त्रसिकपणे पाहिलं तो वरमला. एवढ्यात त्याच्या खांद्यावर कोणाचा तरी हात पडला. पितांबर जगदाळे त्याच्याच करायचा. त्यामुळे वाटेत कबीर चालत येत असला की त्याला डबलशीट घेऊन यायचा, त्यामुळं बरी दोस्ती जमली होती. हायस्कुलमध्ये असतांना एवढी लगट नव्हती. पण कॉलेजात आल्यावर ती झाली दोघे वाचनालयाच्या पायरीवर आले. पितांर म्हणाला, आज तुही तासाला बसला न्हाईस वाटतं? कबीर म्हणाला न्हाई बसलो. माझंही तसंच झालं. पहिल्या तासाला उशीर झाला. दुसरा सरांनी घेतला नाही. आता तिसरा त्या कुलकर्णीबाईंचा असतो. भयंकर बोअर म्हणून सरळ इकडं आलो. पितांबर बोलतच राहिला, त्याचं बोलनं संपल्यावर कबीर म्हणाला, आता लगेच जाणार आहेस गावाकडं न्हाई असून काम हाय. कंटाळा आलाय. चल

चहा पिऊ माझ्याकडं पैसे न्हाईत, कबीरनं सांगुन टाकलं अरे बाबाऽऽ मी देतो. मग ते दोघे गरगाच्या हॉटेलकडं वळले. चालतांना कबीरनं उगाचच इकड तिकड बघायचा प्रयत्न केला. पितांबरला कबीरच्या हालचालीवरुन लक्षात आलं की, याचं काहीतरी बिनसलयं मग तो त्याच्या खांद्यावर हात टाकतच म्हणाला, 'काय झालयं?' 'काय कुठं?' म्हणत कबरीनं अस्वस्थता लपवायचा प्रयत्न केला. मग त्याल वाटलं याला सांगून टाकावं आणि त्यानं घडलं ते सार पितांबरला सरळ सांगून टाकलं. अचानक त्याला मन मोकळं झाल्यासारखं वाटाय लागलं. तसा तो म्हणाला, यात माझं काय चुकलं काय? हात तुझ्याऽऽ आरंऽऽ त्यात काय? उलट तू फारच सभ्य भाषेत बोललास माझ्यासारखा असता तर पायताण काढला असता, ह्या लेकाचा समजतो कोण स्वतःला? पितांबरची टकळी हॅटिलात येईपर्यंत चालू राहिली. ते हॉटेलात घुसले तोवर आक्काबा राण्याची समोरनु हाक आली.

आर पोरांनु कॉलेज करत्यासा का नुस्ता च्याय पिता? ती दोघं एकदम बावचाळली कबीरला मेल्यागत झालं, ही काय बैदा. पितांबर मात्र हसतच म्हणाला, तात्या तास झाला न्हाई म्हटल्यावर आलाव हिकडं खरं तुम्ही हिकडं लवकर? ये सांगतो, हिकडच येवा आमच्यातच च्या पिवा म्हणत आक्काबा राणेनं पुन्हा दोन चहाची ऑर्डर दिली. आक्काबा राणेबरोबर बंडू चेरमन, सरपंच गणपतराव असे दोघे-तिघे, त्यांच्या जवळच पितांबर टेकला. कबऱ्या शेजारच्या टेबलाकडं सरकून बसलं, ह्यो आप्ल्या सद्या म्हाराचा पोरगा न्हवं?

आक्काबा राणेन कबराकडं बघतच विचारलं. कबीर किंचित हसला. म्हारवाड्यातलं एवढचं पोरगं आता कॉलेजला हाय म्हणायचं, बाकी सगळी शाळा सोडून हिंडत आसत्यात. बंडू चेरमननं आपलं ज्ञान आक्काबाा राणेसमोर पाजळलं त्यानंतर आक्काबा राणे काहीच बोलला नाही. चहा पिता पिता तो कबीरला निरखुन बघत होता. पितांबर आणि बंडू चेरमनचं बरंच कायबाय बोलणं चाललेलं, बाहेरुन तुळसीदास मिसाळ आला आणि म्हणाला, वकील साहेब, घरात थांबतो म्हणल्यात तसे सगळं उठले. त्यांच्या पाठोपाठ कबीर हॉटेलातून बाहेर पडल्या पडल्या आक्काबा राणे आपल्या धोतराचा सोगा सांभाळत सगळ्यांना घेऊन रस्त्याला लागला. रस्त्यावर पितांबर आणि कबीर दोघेच उरले. आयला गावात हे आणि नवीनच सुरू झालंय, पितांबर म्हणाला. त्या शेडबाळेनं आणि तुमच्या त्या दादु म्हारानं मिळून दुध डेरीतलं साठ हजार रुपयं लाटल्यात म्हणं. आता हे त्येंच्यावर केस कराय निघाल्यातं ही बी आडगीच हाईत. आता ह्या बंडू पाटील चेरमन, तुळश्या मिसाळ सेक्रेटरी आणि पैसे खाल्लं बाळ्या शेडबाळ्यानं! सया आसणार हेंच्या आनी त्यो कुठं सापडणार? खुळचटच! मग हे केस कसली निघाल्यात. कबीरनं सहज कुतूहल म्हणून विचारलं. कुणास ठाऊक? पण चालल्यात आपली खर ह्यो आक्काबा तात्या हाय म्हटल्यावर काय तरी शेंबाटनं काढलीतच लई तयारीचा. आता तुझ्या दादु म्हाराची धडगत न्हाई. पितांबर उत्साहात बोलू लागला. त्येचं काय गाऽऽ हेडी गडी. गड्डा पायावर पडलं न्हाई तर बाळ्या शेडबाळ्याा म्हणलं.

**राजन गवस यांनी लिहीलेल्या कादंबऱ्या खालील प्रमाणे आहे.**

● चौंडक (१९८५) ● भंडारभोग (१९८७) ● धिंगाणा (१९९१) ● तणकट (१९९९) ● कळप (१९९२)
● ब - बळीचा (२०१३)

राजन गवस यांनी लिहीलेल्या कादंबऱ्या मधून मी लिहीलेली कादंबरी 'तणकट' ही कादंबरी साहीत्य अकादमी पुरस्कार नामांकीत कादंबरी आहे.

* * * * *

## पाणी

**स्वाती सदाशिव बळी**
बी.ए.–१

डोंगर आहे उंच फार
झाडे आहे हिरवेगार
झाडावर पक्षी येऊन बसतात
मंजुळ गाणी गाऊन उडून जातात
डोंगर आहे त्या डोंगरामध्ये
एक नदी आहे त्या नदी मध्ये
पाणी प्यायला खुप गोड आहे
पाणी हे अनमोल जीवन आहे
पाण्याविना या जगात कोणीच मोठं नाही
पाण्याविना या जगात कोणीच श्रेष्ठ नाही
पाणी हे मौल्यवान आहे
पाण्याविना आपण कोणचे काम करू शकत नाही
पाण्याचा उपयोग कमी प्रमाणात केला पाहिजे
पाणण्याचा दूरूपयोग करू नये....

* * *

## जीवन

**कु. निकिता राजु राठोड**

जीवन म्हणजे
तीन पानाचं एक पुस्तक असतं.
पहिलं पान आणि शेवटच पान
हे देवानी लिहिलेलं असत.
पहिलं पान म्हणजे ''जन्म''
आणि
शेवटचं पान म्हणजे ''मृत्यू''
उरलेले मधले पान मात्र
आपल्याला भरायच असतं.
आणि
त्यासाठी नेहमी मनात प्रेम,
भाव आणि चेहऱ्यावर सुंदर
स्मित हास्य ठेवायचं असतं.
जीवन म्हणजे
तीन पानाचं एक पुस्तक असतं.

## शेतकरी



**प्रतिक्षा अरुण चाकोते**
बी.ए.–२

शेतकऱ्या तुझे हाल पाहूणी,
मन माझे रडले ;
आयुष्यभराचे कष्ट तुझे रे,
त्या मातीत मिसळले
घामातूनी पिकवलेल्या, त्या पिकाला,
कोण बरे उधळले ;
आयुष्यभराचे कष्ट तुझे रे,
त्या मातित मिळसले ;
भूगर्भातले झरेही तुडूंब आता भरले,
पण या शेतकऱ्याच्या घामापुढे,
झरेही सारे जीरले ;
आयुष्यभराचे कष्ट तुझे रे,
त्या मातीत मिसळले.
कष्ट करून–करून सारे स्वप्न,
मनामध्येच तु पुरले ;
शेतकऱ्याच्या आयुष्यामध्ये,
बस, दुःख नैराशची उरले ;
आयुष्यभराचे कष्ट तुझे रे,
त्या मातीत मिसळले.

* * *

## आठवण गावाकडची

**प्रतिक्षा अरुण चाकोते**
बी.ए.–२

आठवण येता गावाकडची,
मन होऊन जाई सगळ मधाळ ;
दुध दही ताकाला नव्हती कधी कमी,
येवढी आमची गाय होती दुधाळ.
संस्कारांनी भरलेलं आमचं ते गाव,
कितीही दुर गेले त्याला सोडून ;
तरी सुटनार नाही, गावाबद्दलची हाव,

मिटणार नाही कधी हृदयाच्या पाटीवर कोरलेलं
माझ्या गावाच नाव ;
असं हे माझ सुंदरस, छोटूस गाव.
गावामध्ये येता उल्हासुन जाई सगळं मन ;
पाऊल टाकता गावामध्ये ; कधी आलीस ग बाई,
विचारायचे सगळेच जन,
जिव्हाळ्याच नातं गावामध्ये,
जिव्हाळ्याचेच असायचे सण ;
असं हे माझ गाव ;
लागणारच ना याची हाव.

* * *

## माझी मायबोली मराठीतूनच मी घडली



**कु. लक्ष्मी बंडू कांबळे**
बी.ए.–२

मराठीतूनच मी घडली
मराठीतूनच मी मोठी झाली
बोलीतला या माझ्या गोडवा
शद्बातल्या अर्थात जोडावा
या मराठीच्या बोलीला
स्पर्श सुगंधाचा व्हावा
शद्ब सांगत आहे मराठीची महती
याच मराठीच्या आनंदात आहे माझी व्याप्ती
का कुणास ठाऊक
करू वाटते इचीच भक्ती
जरी बोलत असले इंग्रजी
तरी सोडली नाही मराठी
तिमिरातून येणाऱ्या
प्रकाशमय भवितव्यासाठी
मराठीच्याच अस्मिने
उजळते ही सृष्टी
मराठी ही बोली समृद्धतेने नटली
याच मराठी भाषेमुळे मला नवीन दिशा मिळाली
मराठीतूनच मी घडली
मराठीतूनच मी मोठी झाली

* * *

## बाबा



**कु. पुनम खुशाल धैसकर**
बी.ए.–१

हरवला कोठे दाहिदिशात आता
काळजाची हाक माझी ऐकना रे
शोधण्यास झाले हे कैक कावे
आसवाचा पूर वाहे...
शोधू कोठे या दुनियेमध्ये
आपापली तुझ्या प्रेमासाठी
गहिवरले मन माझे तुला पाहण्यास
न कळले मजला प्रेम तुझे
ना मायचा हात रे
चुकले जेव्हा वाट माझी
मार्ग तयास दाखव ना
ओढ लागली तुझ्या जीवाची
हवास रे माझ्या पाठीशी
चिमुकला जीव तुझा
तुझ्या विणा कोमजून गेला
हसण्याचं कारण माझं
हरवल आता
शोधू कोठे बाबा सांग ना रे
तूजला...

## आई



**कु. अर्चना दादाराव वायकुळे**
बी.ए.–२

आई गं आई गं मी तुझं लेकरू
तुझे हे उपकार मी कसे विसरू ।।धृ।।
आई तू सांगत असतांना मी ऐकत होते छान
तुझे मी गोड गाऊ गुणगान ।।१।।
नऊ महिने नऊ दिवस पोटात ठेवूनी जन्म दिला
तू त्रास सहन करूनी मला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न केला ।।२।।

आई तू मला दाखवली दुनिया सारी
तू आहेस माझ्यासाठी लय भारी ।।३।।
मला तुझी गरज होती तू साथ दिला
माझे दुःख दुर करूनी चेहऱ्यावर हास्य दिला ।।४।।

***

## आम्ही मुली



**कु. अर्चना दादाराव वायकुळे**
बी.ए.-२

आम्ही सर्वांची काळजी घेवू
घर शिक्षण निट सांभाळू
मार्गदर्शन विषयातील मॅडमचे
मग कशाला मागे राहू ।।१।।
गृहअर्थशास्त्राच्या मुली आम्ही
शिक्षणासह घर सांभाळु ।।२।।
मुलगी म्हणुन जन्म घेतला
न घाबरता जीवन जगायला ।।३।।
बस झालं सहन करण, दुसऱ्याचं ऐकणं
आता सगळे उठूया, स्वतःचे आयुष्य घडवूया ।।४।।

* * *

## भाग्याचा लपंडाव

**चंद्रभागा विठ्ठल ठाकरे**
एम.ए.भाग-२ (संस्कृत)

शिणला हा देह विठ्ठुला हाक कानी पोहचू दे,
हरलेल्या मला तू चैतन्याचे सूत गवसू दे...
गुरफटला रे बाबा भूत अन् वर्त खरा, परी
भोवती दाटला बघ भावनांचा आवर्त सारा...
संपल्या सर्व आशा आता पदरी तीच निराशा रे,
फाटक्या या नशीबाची न उमजे कोणती ही भाषा रे...
कळत असेल तुला तरी मलाही थोडे उमजू दे,
चालण्या अजून देवा पायी मुंगीचेच बळ दे...
सोडविते गुंता मी जाहला रे आयुष्याचा पसारा,
चुकल्या मुकल्या जाणिवांना तुझा रे आसरा...
एकची आशा उरी जन्मली,
तृष्णेन त्याच का चिंता ही भेटली...
भगवंत तू सामर्थ्यवान असशी खरा,
पाझरतो तरी बघ वेदनेचा झरा...
एकट्याने जिंकण्यात देवा कसला आला मज्जाव,
एकदा तरी पालटू दे न देवा माझ्यावरचा डाव...
तूच बघ कसला हा भाग्याचा लपंडाव!
गुपचुप येऊन साग मलाही सुखाचा तू ठाव...
गुपचुप येऊन सांग मलाही सुखाचा तू ठाव...

* * *

## तुला मी राधा मानतो

**कु. चंद्रभागा ठाकरे**
एम.ए.-२ (संस्कृत)

ऐक सखे एकदा तरी,
तुज नव्याने सांगतो...
मज मनीचे भाव हे,
नव्याने मी मांडतो...
चित्र तुझ्या स्मृतींचे,
विरहात मी रेखाटतो...
वेदनांच्या जगी या,
सर्वस्व तुला मानतो...
विचारांच्या गर्दीत,
तुलाच मी शोधतो...
तुझी चाहूल होताच,
क्षणात विरह भासतो...
जय विजय कधी नसे
भेद सारखे सारतो...
प्रेमाच्या द्वंद्वात वेडा,
कसा नेहमीच हारतो...
भ्रामक कल्पना या,
व्यर्थ सर्व जाणतो...
तरी सखे तुला मी,
माझी राधा मानतो...

# संस्कृत विभाग

## भारतीय ज्ञान परम्परायाः



कु. पुष्पांजली शर्मा
एम.ए.–२ (संस्कृत)

### प्रणेतारः मयमुनिः

मयमुनिः शिल्पशस्त्रवित्, ज्योतिष्शास्त्रवित् च आसीत्। तस्य उल्लेखः इतिहास पुराणेषु बहुत्र विद्यते। यथा रामायणे मन्दोदर्याः पितृरूपेण, महाभारत पाण्डवानां मयसभानिर्मातृत्वेन, शिवपुराणे त्रिपुराणां निर्मातृरूपेन वा मयासुरस्य विवरणम् आस्ति।

दनु–कश्यपऋष्योः पुत्रः दानवराजा मयः अपि पुराणे उक्तः। एते सर्वे एकस्य एव मयमुनेः उल्लेखाः सन्ति इति केचन वदन्ति। अन्ये तु एकस्याः ज्ञानपरम्परायाः अनेकेषाम् आचार्याणां 'मय' इति अभिधानं स्यात् इति मन्यन्ते। दक्षिण अमेरिकायाः मय–सभ्यतया सह तस्य कश्चन सम्बन्धः स्यात् इत्यपि ऊहा क्रियते।

### भोजदेवः

एकादशे शतके जातः मालवप्रान्तस्य परमार राजा भोजदेवः इतिहासे प्रसिद्धः। धारानगरी तस्य राजधानी। सः पराक्रमी चक्रवर्ती आसीत्। तस्य आस्थाने अनेके संस्कृतविद्वान्सः प्रोत्साहिताः। ज्ञान परम्परायाः संवर्धनार्थ तस्य उद्यमात् इयं लोकोक्तिः प्रसिद्धा–
अद्य धारा सदाधारा सदालम्बा सरस्वती।
पण्डिता मण्डिता सर्वे भोजराजे भुवि स्थिते।।

### महर्षि भृगुः

भार्गवकुलस्य प्रवर्तकः, सप्तर्षिषु एकः च आसीत् महर्षिभृगुः। तस्य पुत्रेषु च्यवनऋषिः, शुक्राचार्यः, च प्रसिद्धौ। ऋषिः जमदग्निः भार्गवकुलोत्पन्नः। महर्षेः अनेकाः कथाः इतिहास पुराणेषु लभ्यन्ते। अत्र वयम् अस्माकं ज्ञानपरम्परायां महर्षेः योगदानं पश्यामः। मत्स्यपुराणे अष्टादश वास्तुशास्त्रोपदेशकाः उक्ताः। तेषु सः एकः। इदानीं महर्षेः ज्योतिषसंहिता उपलब्धा। शिल्पसंहितायाः बहुतांशः भागः प्रायः लुप्तेः। गते शतके प्राचीन भारतीय शिल्प संशोधकेन कृष्णाजी वझेवर्येण लिखितेभ्यः शिल्पविषयकस्य शोधप्रबन्धेभ्यः भृगुशिल्पस्य केचन श्लोकाः लभ्यन्ते। ते प्रबन्धाः इदानी पुस्तकरूपेण सङ्कलिताः।

### नागार्जुनः

नागार्जुनः इति नाम्ना बहवः विव्दांसः आसन्। तेषु अयम् आचार्य नागार्जुनः सिद्धः सप्तमे अष्टमे वा शतके गुजरातस्य सोमनाथप्रदेशे रसशास्त्रविद् आसीत्। तेन रचितेषु अनेकेषु ग्रन्थेषु रसेन्द्र मङ्गलम्, रसरत्नाकरः च इत्येतौ प्रसिद्धौ ग्रन्थौ।

### आचार्य भावमिश्रः

लटकमिश्रस्य पुत्रो उयम् आचार्यः षोडशे शतके मगधराज्ये राज्ये जातः। भावप्रकाशसंहिता आचार्याणां प्रसिद्धः ग्रन्थः आयुर्वेदस्य लघुत्रय्यां समाविष्टः।
''चिकित्साशास्त्रे जाड्यान्धकारं प्रशमयितुम् इमं संविद्यते प्रकाशम।'' – भावप्रकाश संहिता
तस्मिन् काले नैरन्तर्येण जायमानेभ्यः परकीय आक्रमणेभ्यः सर्वाः ज्ञानशाखा इव आयुर्वेदः अपि क्षतीभूतः। तस्य पठन–पाठनयोः स्थितिः वैद्यानां कार्यपद्धतिः औषधीनां च ज्ञानम् इति सर्व जाड्येन ग्रस्तमा् तत् दुरीकर्तुम् एष ग्रंथः रचितः। प्रायः आयुर्वेदस्य सर्वाणि अङ्गानि अत्र विचारितानि।

# उपनिषदे



**कु. कल्याणी भोरे**
एम.ए.-१ (संस्कृत)

उपनिषद साहित्यात प्राचीन भारतीय तत्त्वविचार आले आहेत. उप या उपसर्गाचा अर्थ आहे 'जवळ' आणि सद् याचा अर्थ आहे बसणे. गुरूंच्या जवळ परमार्थ विद्या समजून घेणे याचा अर्थ आहे. १. ईश, २. केन, ३. कठ, ४. प्रश्न, ५. मुंडक, ६. मांडूक्य, ७. तैत्तिरीय, ८. ऐतरेय, ९. छांदोग्य, १०. बृहदारण्यक, ११. श्वेताश्वतर ही प्रमुख उपनिषदे मानली जातात. वैदिक साहित्यात उपनिषदे ही सर्वात शेवटी येतात म्हणून त्यांना 'वेदान्त' असेही म्हटले जाते. काही उपनिषदे गद्यात असून काही पद्यात आहेत. उपनिषदे तत्त्वज्ञान सांगतात म्हणून त्यांना 'ब्रह्मविद्या' असेही म्हणतात. या साहित्यात प्रामुख्याने धर्म, सृष्टी आणि आत्मा किंवा परमात्मा याविषयी चर्चा केली दिसून येते. ब्रह्म काय आहे? ब्रह्मप्राप्ती कोणत्या उपायाने होते? आत्मा म्हणजे काय? यांची सविस्तर चर्चा या साहित्यात आहे. मोक्ष कल्पना, नीतिकल्पना, असे विषयही उपनिषद साहित्याने हाताळले आहेत. या प्रमुख उपनिषदांसह काही गौण उपनिषदेही आहेत. उपनिषदांची एकूण संख्या १०८ च्या आसपास असावी. अथर्वशीर्ष तसेच गीता यांनाही उपनिषद म्हणून गौरविण्यात आले आहे.

* * *

# सङ्गदोषः



**कु. धनश्री सरकाळे**
एम.ए.-१ (संस्कृत)

शास्त्राध्ययनस्य ज्ञानाहरणस्य च परिसमाप्तिरेव नास्ति, यतो हि ज्ञाप्राप्तेः परिसरः व्यापकः, किन्तु जीवनस्य अवधिः परिमितः। एतस्मिन्नेव सीमितावधौ, यत्सारभूतं, यच्च उत्तमं, तदेव ग्रहणीयम्। यथा हंसः जलमिश्रितक्षीरात् क्षीरमेव गृह्णाति न तु जलम्। तथैव एतस्मिन् अनित्ये संसारे धनं, स्त्री, सुहृद् इत्यादयः पुनः पुनः लभ्यन्ते, किन्तु मानवशरीरं सकृदेव लभ्यते। मनुष्यः दिव्यगुणैः भूषितः सन् अपि सङ्गदोषात् कदा कदाचित् विपथगामी सन् नर्ककीटरूपेण परिवृत्तः भवति। विभिन्नकुत्सितकामनानां दासः सन् अधमकार्याणि करोति। कुसङ्गवशात् कुप्रवृत्तेः दासत्वेन प्रवृत्तः जनः, एतस्मात् दूरे स्थातुं प्रयतमानः अपि न शक्नोति। सङ्गदोषेण मद्यपानं, चरित्रहीनता, द्यूतक्रीडा, चौर्यम् इत्यादिदुर्गुणाः जायन्ते। कामनासक्तजीवनस्य परिचर्या एव सङ्गदोषः। समाजे विविधप्रकारकाः परिजनाः कृमित्राणि च लभ्यन्ते, किन्तु 'पद्मपत्रमिवाम्भसा' इति न्यायेन अर्थात् पद्मपत्रे जलमिव एतैः सह संश्लिष्टः सन् अपि मानवः, तेषां प्रवृत्तेः अग्रहणेन जीवनस्य विकासं सम्भावयति। कदाचित् सः कुसङ्गसम्पृक्तः भवति चेत् जीवनं दुर्विषहं सञ्जायते। न केवलं मनुष्याणां क्षेत्रे, अपि तु पशुपक्षिणां क्षेत्रेऽपि एतस्य कुसङ्गस्य अनिष्टकारिप्रभावः परिलक्ष्यते। एतद्विषये श्रूयते काचित् कथा।

कदाचित् कश्चन संन्यासी कस्यचन गृहस्थस्य गृहं प्राप्तवान्। तस्मिन् गृहे कश्चित पालितशुकपक्षी आसीत्। सः आदावेव संन्यासिनः आगमनस्य सूचनां स्वामिने दत्तवान्। गृहस्वामी झटिति एव गृहात् बहिरागत्य संन्यासिनः यथोचितं सम्मानं कृतवान्। तत्रैव कञ्चित्कालं यापयित्वा संन्यासी अग्रे गन्तुमारब्धवान्। किञ्चिद्दूरगमनानन्तरम् अन्यस्य गृहं प्राप्तवान्। तत्रापि कश्चन शुक्रः आसीत्। सः शुकः संन्यासिनं दृष्ट्वा अपशब्दैः तर्जितवान्। संन्यासी चकितः अभवत्, यतो हि ईदृशी अनुभूतिः तस्य पूर्वं नासीत्। अतः संन्यासी तत्कारणं ज्ञातुं प्रायतत। पूर्वोक्तगृहस्वामिनः समीपं गत्वा, ज्ञातवान् एतस्य रहस्यम्। द्वावपि गृहमामिनौ एकत्र एकस्मादेव

विक्रेतुः सकाशात् शुकौ क्रीतवन्तौ। किन्तु प्रथमशुकं क्रीतवान् कश्चित् शिष्टजनः, द्वितीयं कश्चित् चाण्डालः क्रीतवान्। संस्काराभावात् चाण्डालस्य परिवारसदस्याः यथा वार्तालापं कुर्वन्ति, तदनुसारं शुकः व्यवहरति स्म। प्रथमशुकस्तु शिष्टजनस्य गृहे वर्तमानत्वात्, तदनुरूपम् आचरति। सङ्गदोषादेव ईदृशी भिन्नता दृश्यते। अतः उच्यते– ''दुर्जनेन सह वासः, स्यादवश्यं सर्वनाशः'' इति। एतन्न कदापि अन्यथा भवितुमर्हति। सुसङ्ग न प्राप्यते चेत् हानिः नास्ति, किन्तु कुसङ्गात् सर्वदा आत्मानं मुक्तं स्थापयेत् बुद्धिमान जनः।

## श्री गणेशस्तुस्ती
## श्रीमुद्गलपुराण (खंड १, अ ४, श्लो. २०–२९)
## श्रीशिव उवाच



**कु. वैष्णवी अरुण पांडे**
एम.ए. भाग–१ (संस्कृत)

नमस्ते विघ्नराजाय नमस्ते विघ्नहारिणे। विघ्नकर्त्रे गणेशाय विघ्नानां पतये नमः ।।२०।।

विघ्नराजाला नमस्कार असो. विघ्न निवारण करणाऱ्या (श्रीगणेशाला) देवाला नमस्कार असो. विघ्नकर्त्या गजाननाला आणि विघ्नांच्या स्वामीला (विघ्ननियंत्रण करणाऱ्याला) नमस्कार असो.

लंबोदराय सर्वाय वक्रतुण्डस्वरूपिणे। त्रैगुण्येन जगद्रूपनानाभेदप्रधारिणे ।।२१।।

नैर्गुण्येन च वै साक्षाद् ब्रह्मरूपधराय च। नमो नमो बंधहंत्रे भक्तानां पालकाय ते ।।२२।।

(सर्वसमावेशक) विशाल उदर असलेल्या, सर्वश्रेष्ठ (सर्वांतर्यामी) अशा वक्रतुण्ड रूप असलेलया, त्रिगुणांच्या योगाने विविध भेद धारण करून जगत् साकार करणाऱ्या, (सगुण साकार स्वरुप) निर्गुणाचा अवलंब करून साक्षात ब्रह्मरूप (निर्गुण निराकार स्वरूप) धारण करणाऱ्या, संसारबंधनातून मुक्ती देणाऱ्या, भक्तांचे रक्षण करणाऱ्या हे गणेशा! तुला प्रणाम असो.

अभक्तेभ्यस्तमोदाय नानाभयकराय च। हेरंबाय नमस्तुभ्यं वेदवेद्याय शाश्वते ।।२३।।

तुझ्यावर श्रद्धा नसलेल्या अभक्तांच्या मनात तमोगुण (अज्ञान–अंधकार) निर्माण करणाऱ्या, विविध भयांनी त्यांना ग्रस्त करणाऱ्या, वेदांना ज्याचे आकलन झालेले आहे अशा तुझ्या नित्य शाश्वत (त्रिकालाबाधित) स्वरूपाला हे हेरंबा तुला प्रणाम असो!

अनंताननरूपायानंतबाह्वंघ्रिकाय ते। अनंतकरकर्णायानंतोदरधराय ते ।।२४।।

अनंत मुखे, अनंत बाहू आणि अनंत पाद (चरण), अनंत हस्त, अनंत कर्ण (कान), अनंत उदर असे ज्याचे स्वरुप आहे, अशा तुला हे गणेशा! नमन असो.

नमो नमस्ते गणनायकाय ते अनादिपूज्याय च सर्वरूपिणे।
अखंडलीलाकरपूर्णमूर्तये महोत्कटायास्तु नमो महात्मने।।२५।।

अनादी काळापासून पूजनीय असणाऱ्या, सर्व भूतमात्रांमध्ये निवास करणाऱ्या (गणेशमय विश्व), अविरत अखंल विलास करणाऱ्या (सगुणरूपाने), पूर्णस्वरूप महोत्कट गणपतीला प्रणाम असो.

(महोत्कट–कृतयुगात नरान्तक आणि देवान्तक या असुरांच्या निर्दालनासाठी श्रीगणेशाचा 'महोत्कट विनायक' अवतार)

* * *

# भर्तुहरि कृत
# वैराग्य-शतकम्

कु. प्रतीक्षा कैलास मस्के

चेतश्चिन्त्य मा रमां सकृदिमामस्थायिनीमास्थया
भूपालभ्रुकुटीकुटीविहरणव्यापारपण्याङ्गनाम्।
कन्थाकञ्चुकिनः प्रविश्य भ्रवत्तद्वाराणि वाराणी–
रथ्यापंक्तिषु पाणिपात्रपतितां भिक्षामपेक्षामहे ।।६५।।

चेतः, भूपाल–भ्रुकुटी–कुटी–विहरण–व्यापार–पण्य–अङ्गनाम् इमाम् अस्थायिनीम् रमाम् सकृत् आस्थया चिन्य मा, (वयम्) कन्था–कुञ्चुकिनः वाराणसी–रथ्या–पंक्तिषु भवन–द्वाराणि प्रविश्य पाणि–पात्र–पतिताम् भिक्षाम् अपेक्षामहे।

हे मना! राजे लोकांच्या भ्रुकुटीरूपी कुटी मध्ये (अर्थात त्यांच्या कृपादृष्टी मध्ये) विहार–व्यापार–रूप बाजार करणाऱ्या गणिकेप्रमाणे या अस्थायी (न राहणाऱ्या) लक्ष्मीची (धनसंपदेची) एकदा सुद्धा आदरपूर्वक कामना करू नकोस, (आम्ही) गोधडीपासून बनविलेल्या वस्त्रानिशी वाराणसीच्या गल्ल्यांमधून घरांच्या दारी प्रवेश करून करपात्रामध्ये (ओंजळीमध्ये) मिळालेल्या भिक्षेची अपेक्षा करू.

अग्रे गीतं सरसकवयः पार्श्वयोर्दाक्षिणात्याः
पश्चाल्लीलावलयरणितं चामरग्राहिणीनाम्।
यद्यस्त्वेवं कुरू भवरसास्वादने लम्पटत्वं
नो चेच्चेतः प्रविश सहसा निर्विकल्पे समाधौ ।।६६।।

चेतः, अग्रे गीतम्, पार्श्वयोः दाक्षिणात्याः सरस–कवयः, पश्चात चामर–ग्राहिणीनाम् लीला–वलय–रणितम्, यदि एवम् अस्तु, (तदा) भव–रस–आस्वादने लम्पटत्वम् कुरू, नो चेत् सहसा निर्विकल्पे समाधौ प्रविश।

हे मना! समोर गायन, दोन्ही बाजूंस देशीचे हुशार कवी, मागे चामरधारींच्या हालणाऱ्या बांगड्यांची किणकिण –जर असे आहे, (तर) संसार–रसाच्या आस्वादनाची अभिलाषा कर; अन्यथा लगेच निर्विकल्प समाधीत प्रवेश कर.

* * *

# संज्ञानसूक्तम्
# (ऋग्वेद १०.११.१९१)



कु. भावना राजेश जैन

सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम्
देवा भागं यथा पूर्वे सञ्जानाना उपासते ।।१।।

(बंधूनो!) तुम्ही एकत्र होऊनच पुढे जा, कार्य करा; आणि परस्पर (विचारविनिमय करण्यासाठी) संवाद करीत जा; आणि पूर्व काळी देव ज्याप्रमाणे (यज्ञमंदिरात) एकत्र येऊनच हविर्भागाचा स्वीकार करीत असत, त्याप्रमाणे एकत्र बसून एकमेकांचे विचार समजून घ्या.

समानो मन्त्रः समितीः समानी

समानं मनः सह चित्तमेषाम्
समानं मन्त्रमभिमन्त्रये वः
समानेन वो हविषा जुहोमि ।।२।।

हे जे तुम्ही (आर्यजन) तुमचा सर्वांचा मंत्र (उद्देश) एकसारखाच असू द्या; तुमची समिती (सभा) एकाच जागी करीत जा. त्या योगाने तुमचे मन आणि तुमचे चित्त (विचाराने ठरवलेली गोष्ट) हेही एकसारखेच राहतील; म्हणून तुम्हा सर्वांसाठी मी आता एकच मंत्र सांगतो, आणि सर्वांचा मिळून एकच हविर्भाग अग्नीला अर्पण करतो.

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।।३।।

तुमचा विचार आणि योजना एकच असू द्या; तुमची अंतःकरणे एकसारखी–एकाच परिपूर्ण असू द्या, तसेच तुमचे मनही सतत एकाच ध्येयाकडे लागलेले असू द्या, म्हणजे तुम्हाला पाहिजे असेल ती गोष्ट सहज साध्य होईल।

* * *

# संस्कृत महाकवी



**समीक्षा अखिलेश अग्रवाल**
बी.ए.–२

संस्कृत ही एक सर्वात प्राचीन भाषा असून ती पृथ्वीवरील सर्वात प्राचीन, समृद्ध, अभिजात आणि शास्त्रीय भाषा मानली जाते. संस्कृत भाषेला सुरभारती, देववाणी, देवीवाक्, देवभाषा, अमरभारती इत्यादी अन्य नावे देखील आहेत. ही भाषा हिंदू, बौद्ध आणि जैन धर्माच्या उपासनेची भाषा असून ती भारताच्या २३ शासकीय राज्यभाषांपैकी एक आहे. नेपाळमध्येही या भाषेला अतिशय महत्त्व आहे. या भाषेत अनेक सुभाषिते आहेत. विख्यात व्याकरणतज्ज्ञ पाणिनीने इ.स. पूर्व काळात संस्कृत भाषेला प्रमाणित केले. संस्कृत भाषेतील अनेक शब्द भारतीय भाषांमध्ये जसेच्या तसे योजले जातात. त्यांना तत्सम शब्द म्हणतात. संस्कृत मधूनच उत्तर भारतीय भाषा जन्मल्या आहेत, म्हणूनच संस्कृत भाषेला सर्व भाषांची जननी म्हटले जाते.

संस्कृत भाषेत विविध महाकाव्य, नाटक, कथा, साहित्य, काव्य इत्यादींची अद्भुत रचना केलेली आढळते. महाकाव्य हे प्रदीर्घ व वस्तुनिष्ठ दृष्टीने केलेले कथानिवेदन करण्याचा एक काव्यप्रकार आहे. विशालता आणि भव्योदात्ता हे त्याचे विशेष गुण मानले जाते. महाकाव्याची भाषाही त्याच्या आशयाला अनुरुप अशी भारदस्त व प्रौढ असावी लागते. भारतीय महाकाव्य हे भारतीय उपखंडात लिहिलेले महाकाव्य आहे. संस्कृत भाषेत असंख्य महाकवी होऊन गेलेत, ज्यांची काव्ये अजूनही वाचकांच्या मनात घर करून आहेत. अशाच काही संस्कृत महाकवींची माहिती पुढील प्रमाणे आहेत.

**महर्षी वाल्मिकी :–**

वाल्मिकी 'रामायणाचे' रचनाकार म्हणून प्रख्यात असलेले ऋषी होते. महर्षी वाल्मिकी यांचा जन्म अश्विन पौर्णिमेला झाला. रामायणाला हिंदू धर्मात एक पवित्र ग्रंथ मानले जाते. रामायणामध्ये २४,००० श्लोक असून ते ७ कांडांमध्ये विभागले आहेत. रामायणाची मुख्य कथा आयोध्येचा राजपुत्र राम व रामाची पत्नी सीतेचे रावणाकडून झालेले अपहरण आणि तत्पश्चात रामाकडून रावणाचा वध अशी थोडक्यात सांगता येते. वाल्मिकी हे मोठे शिवभक्त होते. रामायणात तामसा तीरावर वाल्मिकीच्या आश्रमाचे वर्णन

केले जाते. रामायणाचा रचयिता म्हणून ओळखले जाणारे वाल्मिकी लुटमारीचा धंदा करत असत. म्हणूनच सर्व लोक त्यांना वाल्या कोळी असे म्हणू लागले. वाल्मिकी एकदा काही ऋषींचा उपदेश ऐकत होते तेव्हा त्यांच्या सत्य वचनांनी त्यास पश्चाताप झाला. वाल्मिकी नंतर जिथे वसले होते तिथेच राम मंत्राचा जप सुरू केला. जप करता करता त्यांच्या अंगाभोवती वल्मीक म्हणजे वारूळ तयार झाले. म्हणूनच त्यांना वाल्मिकी असे नाव मिळाले. संपूर्ण रामायण गाथा ही ऋषी वाल्मिकी यांनी श्लोक शैलीत लिहिली. ते आपले पहिले कवी, म्हणून आदी कवी, असेही नमूद केले जाते.

**महर्षी वेदव्यास ः–**

पराशर ऋषींचे पुत्र महर्षी वेदव्यास यांनी महाभारत या महाकाव्याची रचना केली. त्यांचे दुसरे नाव कृष्णद्वैपायन व्यास असेही म्हणतात; कारण महर्षी वेदव्यास यांनी द्वैपायन बेटावर तपश्चर्या केल्यामुळे आणि ते रंगाने काळे असल्यामुळे ते कृष्ण द्वैपायन म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे वेदांवर भाष्य केल्यामुळे ते वेदव्यास या नावाने प्रसिद्ध झाले. महाभारत हा एक प्राचीन संस्कृत काव्यग्रंथ आहे. महर्षी वेदव्यास यांनी हा ग्रंथ गणपतीकडून लिहून घेतला अशी मान्यता आहे. महाभारतात एक लाखाहूनही अधिक श्लोक असून हा ग्रंथ ग्रीक महाकाव्ये इलियड व ओडिसी यांच्या एकत्रित आकाराच्याही सात पट मोठा आहे. हा ग्रंथ, हिंदू धर्मातील पाचवा वेद मानला जातो. हा ग्रंथ साहित्यातील सर्वात अनोख्या ग्रंथांपैकी एक मानला जात असला तरी आजही हा ग्रंथ प्रत्येक भारतीयांसाठी अनुकरणीय स्त्रोत आहे.

**महाकवी कालिदास ः–**

भारतीय संस्कृत भाषेतील अभिजात लेखक, महान कवी आणि नाटककार म्हणून व्यापकपणे ओळखले जाणारे थोर व्यक्तिमत्त्व म्हणजे महाकवी कालिदास! आषाढ शुद्ध प्रतिपदेला कालिदास यांचा जन्म झाल्याची मान्यता आहे. त्यामुळे हा दिवस 'महाकवी कालिदास दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांना कविकुलगुरू या उपाधीने गौरविले जाते. कालिदासांच्या सप्त साहित्यात रघुवंशम् व कुमारसंभवम् ही दोन महाकाव्य ऋतुसंहार व मेघदुतम् ही खंडकाव्ये आणि मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीय व अभिज्ञान शाकुंतलम् ही तीन नाटके लिहिली. कालिदासांची नाटके आणि काव्ये प्रामुख्याने वेद, रामायण, महाभारत आणि पुराणांवर आधारित असल्याचे दिसून येते.

एका समृद्ध संस्कृतीचे अभिजात कलाविलासाचे आणि उन्नत सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब कालिदासांच्या साहित्यातून उमटलेले दिसते. श्रृंगार आणि करूण ह्या दोन रसांचा परिपाक कालिदासांच्या साहित्यकृतीत प्रामुख्याने आढळतो. विविध भाषालंकार त्यांच्या काव्यनाटकात आढळतात. विशेषतः त्यांच्या उपमांतील तरल सौंदर्यामुळे 'उपमा कालिदासस्य' ही एका सुभाषितकाराची तत्संबंधीची गौरवोक्ती रूढ झालेली आहे.

**भारवी ः–**

'किरातार्जुनीयम्' महाकाव्याचा कर्ता म्हणून भारवी प्रसिद्ध आहे. या एकाच महाकाव्याचे भारवी चिरकीर्ती झाला. भारवी शिवाचा उपासक होता. किरातार्जुनीयम् महाकाव्यात त्याने शंकराचीच महती वर्णन केली आहे. हा दाक्षिणात्य कवी होता. किरातार्जुनीयम् महाकाव्यात १८ सर्ग आहेत. या महाकाव्याचा नायक अर्जुन आहे. प्रधान रस वीर आहे. पाशुपत अस्त्र प्राप्ती हे या महाकाव्याचे फळ आहे. अर्थगौरव हा भारवीच्या वाणीचा प्रसिद्ध गुण आहे.

भारवेः अर्थगौरवम् ।

ही उक्ती भारवीच्या बाबतीत प्रसिद्ध आहे. अर्थगौरव म्हणजे कमीत–कमी शब्दात अधिक अर्थ व्यक्त करण्याची क्षमता.

हितं मनोहारि च दुर्लभं वचः।

अशा छोट्या छोट्या अर्थान्तरत्यासातून भारवीचा अर्थगौरव दिसून येतो. भारवीची भाषा स्पटिकाप्रमाणे शुद्ध सुसंस्कृत

आहे, म्हणूनच त्यात खोल अर्थ भरला आहे. आजपर्यन्त उपलब्ध झालेल्या पुराव्यांवरून तो इ.स. ६३४ च्या सुमारास महाकवी म्हणून कालिदासाच्या बरोबरीने प्रसिद्ध झाला आहे.

**माघ :-**

सर्व शास्त्रात पारंगत असलेला माघ पंडित गुजरात देशात होऊन गेला. त्याच्या आजोबाचे नाव 'सुप्रभदेव' असे होते. तो महाराज श्रीवर्मल राजाचा प्रधानमंत्री होता. माघाच्या पित्याचे नाव 'दत्तक' असे होते. तो अतिशय विद्वान आणि दानशूर होता. माघ श्री माली नामक ब्राह्मण समाजातील होता. माघाचे एकच महाकाव्य 'शिशुपालवधम्' अतिशय प्रसिद्ध आहे. या महाकाव्यात त्याने श्वॆतक पर्वताचे जे वर्णन केले आहे, त्यावरुन तो गुर्जर होतात, हे सहज लक्षात येते. माघाविषयी उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून माघाचा काळ सातव्या शतकाचे मध्यन्तर मानला जातो.

माघाची शैली अलंकृत आहे. विषय, वर्णन, व्यक्तिचित्रण किंवा कथानक यापैकी प्रत्येक गोष्ट त्याने वैचित्र्य आणि वर्णनाची उदात्तता या काव्य गुणांमुळे काव्येषु माघः। अशी म्हण पडली. माघाने गौडीरीति उपयोगात आणली आहे. माघाने संस्कृत भाषेला मनाप्रमाणे वाकविले आहे.

'माघे सन्ति त्रयोगुणाः'।

ही उक्ती माघाच्या बाबतीत प्रसिद्ध आहे.

**श्रीहर्ष :-**

श्रीहर्ष हा महाकवी प्रामुख्याने 'नैषधीयचितम्' या महाकाव्याचा कर्ता म्हणून ओळखला जातो. श्रीहर्षाविषयीची विश्वसनीय माहिती, त्याच्या नैषधीयचरितातील प्रत्येक सर्गाच्या शेवटी आणि ग्रंथाच्या समाप्तीनंतर कवीने स्वतः दिलेल्या चरित्राविषयक माहितीवरून करते. श्रीहर्ष हा विजयचंद्राचा पुत्र जयतचंद्र याचा सभाकवी होता. त्याच्या आज्ञाने श्रीहर्षाने नैषधीयचरित हे महाकाव्य लिहिले असे जैन कवी राजशेखर सांगतो. श्रीहर्षाच्या पित्याचे नाव 'श्रीहरि' व आईचे नाव 'मामल्लदेवी' असे होते. प्रसिद्ध संस्कृत अलंकार शास्त्रज्ञ मम्मटाचा तो भाचा होता असेही म्हटले जाते.

'नैषधीयचरित' हे महाकाव्य श्रीहर्षाने ११४३ मध्ये लिहिले. यात २२ सर्ग आहेत. नलदमयंतीच्या विवाहाची कथा यात आली आहे. ही कथा श्रीहर्षाने महाभारतातून घेतली आहे, परंतु त्यात त्याने काही सूक्ष्म बदल केले आहेत. श्रीहर्षाची रिती वैदर्भी आहे. तो पंडित कवी म्हणून ओळखला जातो. नैषधम् विव्दौषधम्। असे नैषधीयचरिताविषयी बोलले जाते. भारतीय परंपरेप्रमाणे नैषधीयचरित हे पंच महाकाव्यातील पाचवे व शेवटचे महाकाव्य आहेत, या काव्याचे अध्ययन केल्याशिवाय संस्कृत-साहित्याचा अभ्यास पूर्ण होत नाही.

**अश्वघोष :-**

अश्वघोष मुळचा अयोध्येचा राहणारा होता. तो लहानपणापासून ते वैदिक धर्मात वाढला. लवकरच तो नागार्जुन वसुमित्र दिङ्नाग वगैरे बौद्ध पंडितांच्या बरोबरीचा पंडित बनला. अश्वघोष हा सर्वास्तिवादी बौद्ध होता, पण त्या बरोबर एक मोठा कवी पंडित, संगितकार व धर्मप्रचारक होता. आपल्या धर्माचे नियम तो अत्यंत दक्षतेने पाळत असे. धर्मावर त्याची दृढ श्रद्धा होती. अश्वघोषाने विपुल ग्रंथ रचना केली. बुद्धचरित व सौंदरनन्द हे दोन महाकाव्य सुद्धा त्यांनी रचले.

अश्वघोषाची काव्यशैली वैदर्भी आहे. माधुर्य आणि प्रसाद स्वाभाविकपणा व ओघ हे गुण त्याच्या शैलीत दिसून येतात. भाषा आणि भाव यांचा मधुर संगम त्याच्या काव्यात दिसून येतो. अश्वघोषाचे दृष्टांत परिचित वाटतात. उपमा इत्यादी अलंकारात अनुरूपता दिसते. त्याच्या काव्यात शांत रस प्रधान आहे. पांडित्य आणि कवित्व या दोन भिन्न गोष्टी अश्वघोषाच्या ठिकाणी एकत्रित झालेल्या दिसून येतात.

अशा प्रकारचे महाकाव्याची रचना या महाकवींनी उत्कृष्टपणे केली आहे. महाकाव्याचे महाकाव्यत्व त्याच्या महान आकारामध्ये असतेच. पण त्याचा आशय आणि विषयही तसाच महान असावा लागतो. विशालता आणि भव्योदात्ता हे त्याचे विशेष गुण असतात. ही सर्व महाकाव्ये या कसोटीस चांगले उतरले आहेत. मानवी जीवनातील हे एक अत्यंत उद्‌बोधक असे भाष्य आहे. महाकाव्यांच्या वाचनाने महाकवींची उत्कृष्ट लेखनशैली व शद्बांची रचना यांची माहिती वाचकांना मिळते तसेच त्यांचे श्रेष्ठत्व वाचकांसमोर प्रत्यक्ष अनुभवास येते.

## सूर्यान्योक्ती



**चंद्रभागा विठ्ठल ठाकरे**
एम. ए. २

रवी ,भास्कर ,सहस्रांशु अशी अनेकानेक नावे ज्याची आहे असा सूर्य, जो उदयाला आल्या पासूनच संपूर्ण जीवसृष्टीच्या कार्याची सुरुवात होते , ज्याच्या प्रकाशाने हे विश्व उजळून निघते अशा या सूर्याकडून मिळणारा प्रकाश आणि उर्जा या दोन्हींची उपयुक्तता सर्वज्ञात आहेच. सूर्याअभावी मनुष्याचे जीवन अशक्यप्राय आहे.सूर्याला आरोग्य देणारी देवता मानले जाते आणि म्हणूनच सूर्योपासना करावी असे सांगितले जाते.सर्वांना जीवन प्रदान करणाऱ्या या सूर्या बद्दल एक सुभाषितकार मात्र तक्रार करतांना दिसतात. कवी म्हणतात,

हे सहस्रांशु ! तुझा उदय झाला की, कमलपुष्पे उमलतात, विकसित होतात.या सुंदर अशा कमलपुष्पांमधून द्रवित होणारे मधुर, मधुपान करण्यास भ्रमर उत्सुक असतात ते , हे तेजोनिधे! तुझ्यामुळेच. पण हे भास्करा ! ग्रीष्म ऋतूत तू इतका तप्त होतोस की , मन मोहविणाऱ्या, सुंदर अशा सरोवरांमधील जल शोषून त्यांना कोरडे करतोस.सरोवरात असणाऱ्या जलचर प्राण्यांवर सुद्धा तू दया दाखवित नाहीस.तसेच ज्यांना या जलाची आवश्यकता आहे त्यांचाही पण तू विचार करीत नाहीस.

यत्राम्बुजानि विकसन्ति तवोदयेन
तेजोनिधे ! मधुपवृन्दमनोहराणि ।
ग्रीष्मे परन्तु सकलां करुणां विहाय
रम्याणि तान्यपि सरांसि विशोषितानि ।।

कवी या अन्योक्तीमधून असे सांगतात की, सर्वांसाठी जीवनावश्यक असलेला सूर्य , ग्रीष्म ऋतूत मात्र त्रासदायक ठरतो.मनुष्याच्या बाबतीत ही असे पुष्कळदा घडते.एखादा मनुष्य एरवी खूप शांत असतो, सगळ्यांशीच मिळून मिसळून वागतो ,पण एखाद्या प्रसंगी अचानक इतका चिडतो की, त्याचा तो राग त्याला स्वतःला सुद्धा अनावर होतो. अशा पद्धतीची माणसाची वागणूक असेल तर त्याला ग्रीष्मातल्या सूर्याची उपमा दिली जाते. मनुष्यामध्ये अनेक सद्गुण असूनही एखादाच दुर्गुण जरी असेल , तर तो मनुष्य इतरांकडून दुर्लक्षिल्या जातो.एखाद्या पांढऱ्या कोऱ्या कागदावर निळ्या शाईचा एक बारीक ठिपका असला तरी स्वच्छ कोऱ्या पांढऱ्याशुभ्र कागदाकडे लक्ष न जाता त्या बारीक ठिपक्याकडेच सर्वांचे लक्ष जाते. कवी हेच सुचवतात की, मनुष्याने आपल्यातील दुर्गुणाचा त्याग केला तर त्याच्या गुणांची प्रशंसा होईल.

# Birsa Munda

## (15 November 1875 - 9 June 1900)

1) Vidya Maroti More
2) Priti Shankar Bhange
3) Sunanda Vilas Tambare
4) Vaishnavi Santosh Patange
5) Gayatri Nilkant Wagmare
6) Dimpal Sahebrao Vyawhare



Birsa Munda was an Indian tribal freedom fighter and folk hero who belonged to the Munda tribe. He spearheaded a trible religious millenarion movement that arose in the Bengal Presidency in the late 19th century, during the British Raj, there by making him an important figure in the history of the Indian Independence movement. The revolt mainly concentrated in the Munda belt of Khunti, Tamar, Sarada and Bandgon with the guidance of his teacher Jaipal Nag, later Birsa converted into a christian to join the German Mission School but soon dropped our after finding out that Britishers were aiming to convert tribals to christianity through education. After dropping out of school, Birsa Munda created a faith called 'Birsait'.

Inter Collegiate Football Tournaments
Held at DCPE Amravati



University Silver Medal Football Team



Intramural Competition
Date : 31 March to 6 April 2023
Yashasvini 2023
BADMINTON | YOGASAN | ATHLETICS |
SOFTBALL | BASEBALL | CRICKET | FOOTBALL
BADMINTON COMPETITION



Intramural Competition Football



Intramural Competition
Yoga Competition



Athletics Golafek Competition

# मराठी भाषा अभ्यास मंडळ अहवाल

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम**
विभागप्रमुख मराठी विभाग

मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. विद्यार्थिनींना आपले विचार व्यक्त करण्याचे हे एकमेव मुक्त असे विचारमंच आहे. विद्यार्थिनीच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील असलेल्या कलाकृती लेखणीच्या माध्यमातून कागदावर उतरावेत विदयार्थिनींच्या सर्वांगीण विकासाचे अनुषंगाने त्यांच्या नैतिक मानसिक बौद्धिक परिपक्वता निर्माण व्हावी त्यांची बौद्धिक क्षमता अधिक घट्ट व्हावी या हेतूने विविध साहित्य वर चर्चा करण्यात येते आणि अहवालाच्या मांध्यमातून ते सादर देखील केले जाते.

दिनांक १५ जानेवारी २०२३ रोजी मराठी भाषा अभ्यास मंडळाचे उद्घाटन विद्यार्थिनींचे उपस्थितीत आणि विद्यार्थ्यांची हस्ते करण्यात आले मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. दिनांक १ जानेवारी २०२३ ते दिनांक १५ जानेवारी २०२३ महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मराठी भाषा पंधरवडा सप्ताह म्हणून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये संपन्न होत असतो त्याच अनुषंगाने महाविद्यालयामध्ये विभाग एक दोन आणि तीन च्या विद्यार्थ्यांकडून विविध पुस्तकांवर अभ्यास करून त्या पुस्तकांवर परीक्षण करुन एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याच दरम्यान मराठी भाषा अभ्यास मंडळाचे उद्घाटन देखील करण्यात आले होते.

दिनांक २७ फेब्रुवारी कविवर्य कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिवस म्हणून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संपन्न होत असतो याच अनुषंगाने मराठी विभागाच्या माध्यमातून कुसुमाग्रजांच्या सामाजिक, राजकीय, प्रेम विषयक व्यक्तिमत्व अशा विविध विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच काव्य लेखन स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निबंध स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक विभागून देण्यात आले. यामध्ये कु. भाविका रमेश पंदीलवार बीकॉम भाग २ 'कुसुमाग्रज आणि मराठी' या विषयावर तिने निबंध सादर केले. कु. महिमा सतीश गायकवाड बिकॉम भाग २ या विद्यार्थिनीने देखील 'कुसुमाग्रज आणि मराठी साहित्य' या विषयावर निबंध सादर केले होते. द्वितीय क्रमांक बी कॉम भाग तीन ची कु. आदिती अनुप ढोरे या विद्यार्थिनींनी आत्मनिष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज या विषयावर निबंध सादर केले होते. तर प्रथम क्रमांक बीए भाग दोन ची विद्यार्थिनी कु. लक्ष्मी बंडु कांबळे 'कुसुमाग्रजांचा मराठी साहित्य प्रवास' या विषयावर निबंध सादर केला होता. तर प्रोत्साहन पर बक्षीस म्हणून कु. अंजली संतोष मस्के बीकॉम भाग २, कु. भाग्यश्री शैलेश धोंगडेकर, कु. पल्लवी प्रकाश पौळ या विद्यार्थिनींनी निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला होता तर काव्य लेखन स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक विभाग दोनची विद्यार्थीनी कु. प्रतीक्षा अरुण सातपुते द्वितीय क्रमांक, कु. भाग्यश्री शैलेश धुवडेकर भाग ३, तर प्रथम क्रमांक कु. लक्ष्मी बंडु कांबळे विभाग दोन या विद्यार्थ्यांना देण्यात आले तर प्रोत्साहन पर बक्षीस कु. अदिती अनुप ढोरे या विद्यार्थिनींनी देण्यात आला व मराठी विभागाचे वतीने त्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

**मराठी भाषा अभ्यास मंडळ कार्यकारिणी**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | कु. अपेक्षा हिंमत शिंदे | बीए. भाग ३ |
| उपाध्यक्ष | कु. पूजा धैसकर | बीए. भाग १ |
| सचिव | कु. लक्ष्मी बंडू कांबळे | बीए. भाग २ |
| कोषाध्यक्ष | कु.अश्विनी राठोड | बीए. भाग १ |
| सभासद | कु. वैष्णवी साहेबराव राऊत | बीए. भाग ३ |
| | कु. पूजा दिनेश पाईकराव | बीए. भाग २ |
| | कु. सिद्धी संजय सोनटक्के | बीए. भाग २ |
| | कु. कल्याणी नंदकिशोर डाऊ | बीए. भाग २ |







# संस्कृत वाङ्मय मंडळ अहवाल

**प्रा.डॉ. वैशाली पांडे**
संस्कृत विभाग प्रमुख

प्रतिवर्षी प्रमाणे सत्र २०२२–२३ मध्ये श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात संस्कृत वाङ्मय मंडळाच्या अंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात श्लोक पाठांतर, सुभाषित लेखन, संस्कृत निबंध लेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सरल संस्कृत संभाषण विद्यार्थीनींना अवगत व्हावे यासाठी सर्व महाविद्यालयातील संस्कृत विभागाच्या विद्यार्थिनींचा एक WhatsApp समूह तयार करून त्यावरून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

या सत्रातील उल्लेखनीय बाब म्हणजे आपल्या श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाने लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी ह्यांच्याशी सामंजस्य करार (MOU) केला. त्यानुसार तेथील संस्कृत विभाग प्रमुख डॉ. स्वानंद गजानन पुंड यांनी नीतिशतक ह्या सुभाषित संग्रहाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून दिला. दहा प्रमाणपत्रांचा हा अभ्यासक्रम असून महाविद्यालयीन विद्यार्थिनी व नगरातील अनेक संस्कृतप्रेमी जनांनी ह्या उपक्रमाचा लाभ घेतला आहे. हा उपक्रम निरंतर चालू ठेवण्याचा संस्कृत विभागाचा मानस आहे.

महाविद्यालयात संस्कृत विषयाचा पदव्यूत्तर विभाग असून नेट, सेट सारख्या पात्रता परीक्षांच्या दृष्टीकोनातून विद्यार्थीनींची तयारी व्हावी एतदर्थ त्यांना मार्गदर्शन व पुस्तके उपलब्ध करून दिली जातात.

# इतिहास अभ्यास मंडळ अहवाल

## सत्र २०२२-२३

**प्रा.डॉ. एम.आर. वर्मा**
इतिहास विभाग प्रमुख

दरवर्षी प्रमाणे आपल्या महाविद्यालयात ऑगस्ट २०२३ मध्ये इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

या मंडळामार्फत विद्यार्थीनीच्या गुणात्मक, स्पर्धात्मक, कौशल्यात्मक गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न वर्षभर करण्यात आला.

या मंडळामार्फत १) स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन वर्गात करण्यात आले. २) विषयाला अनूसरून चर्चा, गटचर्चा करून भाषण कौशल्य, आत्मविश्वास कौशल्य निर्माण करण्यात आले. ३) सेमीनारच्या अनूषंगाने वर्गात विद्यार्थीनींना बोलण्यास भाग पाडण्यात आले. ४) प्रश्नपत्रिका समजावून, उत्तर पत्रिका लिहण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. ५) नेट, सेट, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका ची माहीती देवून मार्गदर्शन करण्यात आले. ६) विद्यार्थीनींचा आत्मविश्वास वाढीसाठी सुप्तगुण ओळखून मार्गदर्शन केले.

**सत्र २०२२-२३ ची इतिहास अभ्यास मंडळची कार्यकारीणी पुढील प्रमाणे :-**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष :- | कु. मुस्कान शेख गफार, | बी.ए.भाग- ३ |
| उपाध्यक्ष :- | कु. वैष्णवी रचकुंटवार, | बी.ए.भाग-१ |
| उपाध्यक्ष :- | कु. लक्ष्मी बंडू कांबळे, | बी.ए.भाग-२ |
| सचीव :- | कु. दिव्या जाधव, | बी.ए.भाग-१ |
| सहसचीव :- | कु. पुनम खुशाल धैसकर, | बी.ए.भाग-१. |
| कोषाध्यक्ष :- | कु. अश्विनी सुनील राठोड, | बी.ए.भाग-१ |
| सदस्य :- | कु. शारदा मधूकर पांडे, | बी.ए.भाग-२ |
| सदस्य :- | कु. उमेरुकय्या मोहम्मद फारुख चव्हाण, | बी.ए.भाग-३ |
| सदस्य :- | कु. आकांक्षा पोळकट, | एम.ए.भाग-२ |

अशारीतीने सत्र २०२२-२३ मध्ये विविध कार्यक्रम वर्गात घेऊन आत्मविश्वास वाढविण्याचे कार्य करण्यात आले.

दि. ०८ मे २०२३



# गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळ
## २०२२-२३

**प्रा.डॉ. रंजना जिवने**
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख
**प्रा.डॉ. स्वप्ना देशमुख**
गृहअर्थशास्त्र विभाग

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालया अंतर्गत गृहअर्थशास्त्र विभागाने २०२२-२३ मध्ये राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे-

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट स्तनपान सप्ताह अंतर्गत विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मातेच्या दुधातील पोषणमुल्य या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. 'स्तनपानाचे महत्त्व' या विषयावर विद्यार्थिनींची गटचर्चा आयोजित केली. 'स्तनपान अमृतपान' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. ३० विद्यार्थिनींनी निबंध सादर केला. रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले. आई व बालकांचा स्नेह दर्शविणाऱ्या विवीध रांगोळ्या विद्यार्थिनींनी काढल्या.

१० ऑगस्ट रोजी रानभाजी महोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींनी विविध औषधी उपयुक्त वनस्पतीचे प्रदर्शन सादर केले व रानभाज्यांचे महत्त्व दर्शविणारे पोस्टर्स तयार केले. सवना येथील डॉ. स्वाती तायडे यांनी विद्यार्थिनींना राजभाज्यांचे महत्त्व, औषधीय गुणधर्म समजावुन सांगितले. अगदी अभ्यासपुर्ण मार्गदर्शन करून विवीध प्रश्नांचे निराकरण केले.

१ सप्टेंबर पासुन पोषण माह साजरा करण्यात आला. किशोरवयीन विद्यार्थिनींकरीता समतोल आहार आयोजन या विषयांवर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली व आहार विषयक स्वमुल्यांकन करण्याकरीता मार्गदर्शन केले. ५ सप्टेंबर रोजी 'पौष्टिक मोदक' स्पर्धेचे अयाोजन केले.

१२ सप्टेंबर रोजी पोषण सुंदरी स्पर्धेचे आयोजन केले. विद्यार्थिनींनी विवीध धान्य, फळे, भाज्या यांच्या साह्याने दागिणे तयार करून, परिधान करूण स्पर्धेत सहभाग घेतला. आहारविषयक प्रश्न विचारून तीन राऊंडमध्ये त्यांचे परिक्षण करण्यात आले. स्पर्धेचे परिक्षक डॉ. उज्वला तिखे व प्रा. सरिता चापके होत्या. बी.ए.भाग १ सेम. I ची कु.स्नेहल बर्डे हिला पोषण सुंदरी पुरस्कार प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांचे हस्ते प्रदान करण्यात आले व गृहअर्थशास्त्र मंडळाचे वाचन केले. अध्यक्ष, कु. भावना जैन, उपाध्यक्ष कु. जयश्री काईट, सचिव कु. अर्चना वायकुळे, सहसचिव कु. शिवकन्या गव्हांडे, कोषाध्यक्ष कु. स्नेहल बर्डे, सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आले. डॉ. स्वप्ना देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. प्रा. आशालता बर्डे, प्रा. शिला तेलंग व सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. पालकांनी देखील वस्तु खरेदी केल्या.

१४/११/२०२२ रोजी सेमी I च्या विद्यार्थिनींनी श्री रितेश बजाज यांच्या कलकत्ता फ्लॉवर शॉपीला भेट दिली. श्री डेबुजी या प्रशिक्षकांनी विद्यार्थिनींना विवीध पुष्परचना तयार करण्याचे प्रात्यक्षित दिले. गृहसजावट, गृहप्रवेश, डोहाळेजेवण, डेकोरेशन, लग्न, रिसेप्शन डेकोरेशन करून या छोट्या व्यवसायातुन मोठा फायदा होऊ शकतो ही दृष्टी आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना प्राप्त झाली.

१८/११/२०२२ रोजी सेम. IV च्या व एम.ए. सेम. I च्या मानव विकास या विषयाअंतर्गत बचपन स्कुलला भेट दिली. विद्यार्थिनींनी छोट्या बालकांचे वर्गात उपस्थित राहून निरीक्षण केले. शिक्षकांनी विवीध टीचींग एडस् विषयी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका सौ. मनिषा जांगिड यांनी संवाद साधला. बाल विकासाकरीता पालकांची व शिक्षकांची भुमिका विषद केली.

१९/१/२०२३ रोजी वाशिम येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. मेघा देशमुख यांनी विद्यार्थिनींना व्यक्तिमत्त्व विकासाविषयी मार्गदर्शन केले.

२७/३/२०२३ रोजी प्रा. आशालता बर्डे यांनी 'तांबुल बनविणे' प्रात्यक्षिक एम.ए. सेम II च्या विद्यार्थिनींसमोर सादर केले.

२०/३/२०२३ रोजी सेम VI च्या विद्यार्थिनींची गेट टू गेदर पार्टी आयोजित केली. विद्यार्थिनींनी तीन वर्षातील अनुभव सांगितला, विषयाचे महत्त्व सांगितले. प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी मुलींना मागदर्शन केले. प्रा.डॉ. रंजना जिवने यांनी प्रास्ताविक, कु. भावना जैन यांनी संचालन तर प्रा. स्वप्ना देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला. विद्यार्थिनींनी बंजारी गीत, संगीत खुर्ची, विवीध सांस्कृतिक कार्यक्रम करून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

सेम II च्या विद्यार्थिनींनी प्रा. बर्डे व प्रा. शिला लोखंडे यांच्या उत्कृष्ट बांधली केलेल्या घराला भेट दिली. प्रकाशयोजना वायुविजन विवीध पडदे, विवीध खोल्यांचे एकत्रीकरण याविषयी विद्यार्थिनींनी अनुभव घेतला.

१/४/२०२३ रोजी विद्यार्थिनींनी विवीध वाळवणाचे संरक्षक पदार्थ जसे, कुरोडी, पापड, उडीद–मुग पापड, तांदळाचे पापड सांडगे, शेवया, चहामसाला याची प्रदर्शनी व विक्री केली. यातुन विद्यार्थिनींना चांगला नफा झाला. भविष्यात स्वतःचा रोजगार सुरू करून चांगल्या उद्योजिका बणुन आर्थिक सहकार्य करण्यास समर्थ होऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला.

२०/४/२०२३ रोजी गृहविज्ञान विभागप्रमुख प्रभारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी सेम II च्या व सेम VI च्या विद्यार्थिनींना ब्लॉक प्रिंटींग या विषयावर प्रात्यक्षिक सादर केले. या प्रिंटींगच्या माध्यमातुन, विवीध साड्या, बेडशिट, पिलो कव्हर, ड्रेसेस बनवुन विक्री करण्यास विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

२४/४/२०२३ रोजी इव्हेंट मॅनेजमेंट व इंटेरीयर डेकोरेशन या विषयावर PPT द्वारे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. घराची बांधणी, सजावट, फर्नीचर मांडणी, रंगयोजना याविषयी मार्गदर्शन केले. इंटेरियर डेकोरेटर सौ. सायली पोरकुटे यांनी विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे निराकरण करून उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

२८/४/२०२३ रोजी भावना जैन हिने आईस्क्रिमचे प्रात्यक्षिक सादर केले.

१५/४/२०२३ रोजी बापुरावजी बुटले आटर्स कॉलेज दिग्रस येथे One day workshopTechniques of Cake making यामध्ये गृहअर्थशास्त्र विभागाच्या ६ विद्यार्थिनींनी उपस्थित राहुन प्रमाणपत्र प्राप्त केले. गृहअर्थशास्त्र विभागात विद्यार्थिनींचे सेमिनार वाचन सेम IV च्या विद्यार्थिनींचे तसेच केस स्टडी, PPT घेण्यात आले.

प्रा.डॉ. स्वप्ना देशमुख यांनी भारतीदासन विद्यापीठ, तीरुचिरपल्ली तामिलनाडु येथील शॉर्ट टर्म कोर्समध्ये सहभाग घेतला व गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे त्यांची सदस्यपदी निवड करण्यात आली.



**गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उदघाटन**



**हस्तकला प्रदर्शन**



**पोषण सुंदरी स्पर्धा**



**रानभाज्या महोत्सव**

# संगीत मंडळ अहवाल

**प्रा.डॉ. साधना मोहोड**
संगीत विभाग प्रमुख

दरवर्षी आमच्या संगीत विभागांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात येतात. दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी संगीत विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जवळपास २० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी. पाटील हे उपस्थित होते. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे व प्रा.डॉ. उज्ज्वला तिखे यांनी कार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. सरिता चंदनकर यांनी केले. या कार्यक्रमाला संगीत विभागातील प्रा.डॉ. साधना मोहोड व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

दि. २१ सप्टें. २०२२ रोजी संगीत मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अंजली पांडे उपस्थीत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून परभणी येथील कमलताई जामकर महाविद्यालयाचे संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ. इंगळे हे उपस्थीत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. साधना मोहोड यांनी तर आभार प्रदर्शन कु. स्नेहल बरडे हीने केले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ. इंगळे यांनी संगीतातून रोजगार कसा उपलब्ध होऊ शकतो याबद्दल सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी प्रा.डॉ. इंगळे यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. अंजली पांडे यांच्या हस्ते शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संगीत मंडळाचे गठन करण्यात आले.

दि. ३० सप्टें. २०२२ रोजी संगीत विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अकोला येथील राधादेवी गोयनका महाविद्यालयाचे प्रा.डॉ. विजय आळशी हे उपस्थीत होते. अध्यक्ष म्हणून संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे हे उपस्थीत होते. प्रमुख अतिथी प्रा.डॉ. विजय आळशी यांनी शास्त्रीय संगीतातील विविध गीत प्रकारांची माहीती ते ते गीत प्रकार गाऊन दाखवून सोदाहरणासहीत सांगीतले. अध्यक्षीय समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे यांनी केले. ३० सप्टें. २०२२ हा संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे यांच्या ३२ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेचा शेवटचा दिवस असल्यामुळे संगीत विभागातर्फे त्यांचा शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.डॉ. साधना मोहोड यांनी केले तर आभार प्रदर्शन संगीत मंडळाची अध्यक्ष कु. प्रतिक्षा मस्के हीने केले.












# करिअर कट्टा

**डॉ. रंजना एच. जिवने**

करिअर कट्टा समनवयक

''नको गुलामी नक्षत्रांची भिती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतांनाही चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्यांची मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखूनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर.''

अशाच पद्धतीने अनेक अडचणींवर मात करून संपूर्ण यवतमाळ जिल्हा करिअर कट्टाच्या धवल आकाशातील चमचमणारा तारा ठरीत आहे. महाराष्टं राज्य उच्च तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केन्द्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''करिअर कट्टा'' युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी ही टॅगलाईन घेऊन, काम करणारा हा उपक्रम श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात राबविला जात आहे.

दि. २२/०२/२०२२ रोजी विभागीय ऑनलाईन कार्यशाळा ''झेप भविष्यवेधी'' घेण्यातज आली. त्यामध्ये आयोजक पाच महाविद्यालयामध्ये आपल्या महाविद्यालयाचाही सहभाग होता. ह्या कार्यशाळेला MITS चे अध्यक्ष श्री यशवंतजी शितोळे सर तसेच डॉ. श्रीकांत देशमुख विभागीय समन्वयक पुणे विभाग प्रमुख अतिथी म्हणून लाभले. सुत्रसंचालन डॉ. रंजना जिवने ह्यांनी केले.

२६/०२/२०२२ रोजी अमरावती येथे विभागीय ऑफलाईन कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये समन्वयकांनी आपला सहभाग नोंदविला.

२०/०३/२०२२ यवतमाळ जिल्ह्याची जिल्हा समन्वयकांची जबाबदारी डॉ. रंजना जिवने ह्यांचेकडे असल्यामुळे ''समन्वय संवादाची शंभरी'' ह्या उपक्रमात ७ महाविद्यालये तसेच एका सेवा योजना शिबीराला भेट देण्यात आली.

**भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन :–** (२२ जुलै २०२२) :–

करिअर कट्टा आणि ग्रेस एज्युनेट नागपूरच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील ६ महाविद्यालयामध्ये रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील ११० विद्यार्थ्यांचे विवीध कंपन्यामध्ये करण्यात आले. त्यामध्ये पुणे, मुंबई, रांजनगाव, औरंगाबाद ह्या ठिकाणी विवीध कंपन्यामध्ये विद्यार्थ्यांना ऑर्डर देण्यात आल्या.

**राज्यस्तरीय रिल्स कॉम्पीटेशन मध्ये जिल्ह्याचे यश :–**

करिअर कट्टाच्या वतीने राज्यस्तरीय रिल्स कॉम्पीटेशन घेण्यात आली होती. ह्या स्पर्धेमध्ये राज्यातून प्रथम येण्याचा मान श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील कु. प्रियंका मोदीराज आणि पायल उबाळे ह्या दोन्ही विद्यार्थिनींनी मिळविला. तसेच जिल्ह्यातूनसुद्धा त्या प्रथम आल्या. त्यांना ५००० रु. स्मृती चिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. जिल्ह्यातून द्वितीय कु. स्नेहल बरडे आणि तृतीय आदिती ढोरे ह्या विद्यार्थिनींना पुरस्कार प्राप्त झाला. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय ४ पुरस्कार विद्यार्थिनींनी महाविद्यालयाला मिळवून दिले. हे चारही पुरस्कार अमरावती येथे झालेल्या बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमात अमरावतीच्या जेंडी मॅडमच्या हस्ते विद्यार्थिनींना देण्यात आले.

**सीईटी परिक्षेतील यश :–**

युपीएस्सीच्या तयारीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून सीईटी घेण्यात आली. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या २३ विद्यार्थिनी सीईटी उत्तीर्ण झाल्या व त्या नियमीत क्लास करीत आहेत.

**पोलीस भरतीची तयारी :–**

आपल्या महाविद्यालयातून पोलीस भरतीची ३३ विद्यार्थीनी तयारी करीत होत्या. त्यांना पेपरची संपुर्ण तयारी करीअर कट्टाने करून दिली.

**ॲडान कोर्स :–** दर महिन्याला तीन ॲडान कोर्स विद्यार्थीनीसाठी करिअर कट्टा राबविते, हा तीस तासांचा कोर्स आहे व तो ऑनलाईन पद्धतीने होतो. करिअर कट्टाला रजिस्टर विद्यार्थीनींनी ह्या विवीध कोर्स करून सर्टीफिकेट प्राप्त केले आहे.

विवीध राज्यस्तरीय कार्यक्रमामध्ये उदा. १२ जानेवारी २०२२ वर्धापन दिन सोहळा, ३० जानेवारी अमृतमहोत्सवी वर्षा निमित्ताने घेण्यात आलेला कार्यक्रम ह्या कार्यक्रमाला ''इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'' मध्ये नोंद झालेली आहे. ८ मार्च महिला सबळीकरण कार्यक्रम, कृषीदिन कार्यक्रम, भारतीय संविधानाचे २७ डिसेंबर २०21 पासून ते अंतिम भागापर्यंत विद्यार्थ्यांचा सहभाग ह्या कार्यक्रमाला होता.

१ मे २०२२ :– रोजी महाराष्ट्र दिनानिमित्ताने महाराष्ट्राचे कृषी वैभव व कौशल विकास प्रशिक्षण शुभारंभ मा. विनायक हेंगाणा मा. सुहास बाती ह्यांचे विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन लाभले.

१३ जुलै २०२२ :– रोजी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ''नविन शैक्षणिक धोरणामध्ये गुरुशिष्य नात्याचे बदलते आयाम'' ह्या विषयावर प्रमुख वक्ता मा. प्राचार्य डॉ. संजय चाकने सरांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी आस्वाद घेतला.

राज्यस्तरीय ९ दिवसीय कार्यशाळेच्या आयोजनात सहभाग :– नवउर्जा महोत्सवात दि. ०३ कॉक्टो. २०२२ रोजी ''मातृशक्तीचा जागर आहार आणि आरोग्याच्या परिपेक्ष्यातून'' ह्या विषयावर डॉ. रेवत कानिंदे ह्यांनी मार्गदर्शन केले. त्यात स्वागत डॉ. रंजना जिवने ह्यांनी केले. तसेच ह्याच महोत्सवात दि. २९ सप्टेंबर २०२२ रोजी ''सामाजिक परिपेक्ष्यातून स्त्री–काल, आज आणि उद्या'' ह्या विषयावर डॉ. बी.आर. वाघमारे साहेब (माजी परिक्षा नियंत्रक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) ह्यांनी मार्गदर्शन केले. ह्या कार्यक्रमाचे स्वागत डॉ. जिवने ह्यांनी केले.

दि. ०३ डिसेंबर २०२२ रोजी End of Cyber Guidance Against Women Awareness Campaign ह्या राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये आभार प्रदर्शनाचे काम डॉ. जिवने ह्यांनी केले.

११ नोव्हेंबर २०२२ रोजी पुणे येथे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर येथे राज्यस्तरीय Center of Excellence धोरण निश्चिती कार्यशाळा संपन्न झाली त्या कार्यशाळेला उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदविला. ह्या कार्यक्रमाला मा. साखर आयुक्त डॉ. शेखरजी गायकवाड उपस्थित होते.

२५ फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई येथील सोम्पया कॅम्पसमध्ये झालेल्या वर्धापन दिन आणि पुरस्कार वितरण समारंभाच्या आयोजन समितीमध्ये मेंबर असून ह्या सोहळ्याच्या नियोजनामध्ये विशेष सहभाग. ह्याच सोहळ्यात राज्याचे शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्रजी देवळणकर, डॉ. प्रफुल्ल पाठक ह्यांचे हस्ते राज्यस्तरीय उत्कृष्ट जिल्हा समन्वयक, तसेच विभागीय उत्कृष्ट महाविद्यालयाचे प्रथम बक्षिस देण्यात आले. हा महाविद्यालयासाठी बहुमान आहे.

१४ मार्च २०२३ रोजी अमरावती येथील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात ''कार्यशाळा आढावा व पुरस्कार वितरण सोहळा'' पार पडला. ह्या सोहळ्यामध्ये जिल्हास्तरीय व विभाग स्तरीय प्रथम सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार जे.डी. मॅडमच्या हस्ते प्राप्त. तसेच पुरस्कार प्राप्त चारही विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे अमरावती विभागामधील १९ बक्षिसांपैकी ११ बक्षिसे यवतमाळ जिल्ह्याला प्राप्त आणि त्यातील ६ बक्षिसे आपल्या महाविद्यालयाला प्राप्त झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जिवने ह्यांनी केले.

१० एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये MITS चे अध्यक्ष श्री यशवंतजी शितोळे सरांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. व ''अन्नपूर्णा'' कोर्स मिळाल्यामुळे त्याची पाहणी केली.

२० एप्रिल २०२३ रोजी ''अन्नपूर्णा'' अं कॅम्प्लीट न्युट्रीशन गाईड ह्या तीन महिने कालावधीच्या कोर्सचे उद्घाटन मा. मोहिनीताई नाईक यांचे हस्ते घेण्यात आले. ह्या कोर्ससाठी बँगलोर येथील सेवा इंटरनॅशनल कंपनी कडून CSR फंड महाविद्यालयाला प्राप्त होणार आहे. त्यातूनच २० विद्यार्थिनींचे ट्रेनिंग सुरु आहे.

२७,२८ मे राजी लोणावळा येथे दोन दिवसीय सेन्ट्रल ऑफ एक्सलंसची कार्यशाळा संपन्न झाली. ह्यामध्ये डॉ. शेखर गायकवाड, डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी (उपमहासंचालक यशदा, पुणे) डॉ. अशोक तेजनकर (माजी प्र–कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) मा. भूषण कोळेकर (माजी सहाय्यक महाव्यवस्थापक SBI) डॉ. महेश भागवत (महासंचालक CID तेलंगाना), डॉ. शैलेन्द्र देवळणकर, संचालक उच्च शिक्षण विभाग लाभले. संपुर्ण कार्यक्रमाचे संचालन डॉ. रंजना जिवने ह्यांनी केले.


विभागीय स्तरावरील उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार
शिक्षण सहसंचालक अमरावती यांचे हस्ते स्विकारतांना


करीअर कट्टा च्या वतीने भव्य रोजगार मेळावा
उदघाटन कार्यक्रमात ग्रेस एज्युकेशन कंपनीचे डायरेक्टर श्री विनोद कापसे


करीअर कट्टा च्या वतीने पारीतोषीक विजेत्या विद्यार्थीनी


करीअर कट्टा राज्यस्तरीय उत्कृष्ट जिल्हा समन्वयक पुरस्कार
डॉ. शैलेंद्र देवळनकर शिक्षण सहसंचालक पुणे यांचे हस्ते

# सांस्कृतिक समिती अहवाल

**प्रा.डॉ. साधना मोहोड**
संगीत विभाग, प्रमुख

सत्र २०२२-२३ मध्ये सांस्कृतीक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या समन्वयक प्रा.डॉ. साधना मोहोड, सदस्य प्रा.डॉ. रंजना जिवने, प्रा.श्री विक्रांत मेश्राम, प्रा. किरण शुक्ला ह्या होत्या. या समिती अंतर्गत खालील कार्यक्रम घेण्यात आले.

दि. १२ ऑक्टों. २०२२ ते १५ ऑक्टों. २०२२ या कालावधीमध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या युवा महोत्सवामध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. सिद्धी सोनटक्के, कु. तृप्ती सोनटक्के, कु. प्रतिक्षा मस्के, कु. पुनम चव्हाण, कु. पुनम वंजारे, साजिया परवीन इम्तीयाज अहमद, उम्मी झैनाब वाहिद अहमद या विद्यार्थिनी भारतीय समुह गीत, शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, शास्त्रीय वाद्य, हार्मोनियम सोलो, मेहंदी व रांगोळी इ. स्पर्धांमध्ये सहभागी झाल्या होत्या. आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व या विद्यार्थिनींनी केले.

दरवर्षी १८ ऑगस्टला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महाराष्ट्रातील गुणवंत शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. या कार्यक्रमामध्ये संगीत विभागातील विद्यार्थिनी स्वागतगीत, कृषीगीते, देशभक्तीपर गीते सादर करतात. यंदाही या कार्यक्रमात संगीत विभागातील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादरीकरण केले. प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे यांनी वंदनगीत तर प्रा.डॉ. साधना मोहोड यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. २३ मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त 'आझाद हिंदची गाथा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये गाण्याच्या माध्यमातून स्वातंत्र्य विरांचे चरित्र चित्रण करण्यात आले होते. या नाटकातील गाण्यांना संगीत प्रा.डॉ. साधना मोहोड यांनी दिले होते. तर संगीत विभागातील विद्यार्थिनी कु. सिद्धी संजय सोनटक्के हीने या गाण्यांना स्वरसाज चढविला होता.

# समाजशास्त्र अभ्यास मंडळ

**जी. व्ही. बन**
प्रभारी प्राध्यापक

समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन दिनांक १५/०३/२०२३ रोजी समाजशास्त्र विभगाात प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थीनी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या अभ्यास मंडळाचा उद्देश विद्यार्थिनींना पदाधिकारी म्हणजे काय व समाजात वावरतांना समाजाच्या कोणत्या समस्या आहेत व त्या समस्येचे निराकरण कसे करायचे व हक्क आणि कर्तव्य समाजाप्रती काय आहे याची जाण असणे हे महत्त्वाचे आहे. विशेष अभ्यास मंडळाचा दिवस म्हणजे १५ मार्च जागतिक ग्राहक दिन. या दिवशी आदरणीय प्रा.डॉ. गणेश पाटील सर यांनी समाजाशास्त्र विभागातील विद्यार्थीनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

जागतिक ग्राहक कायद्याविषयी व समाजाविषयी माहिती देऊन मा. प्राचार्य डॉ. गणेश पाटील सर यांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारीणी जाहीर केली. तसेच प्रा. जी.व्ही. बन यांनी प्राचार्य डॉ. गणेश पाटील सर यांच्या अध्यक्षतेखाली एकमताने विविध पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पार पडली.

**समाजशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारणी – २०२३**

| | | |
|---|---|---|
| १) मुस्कान शेख गफार | बी.ए. भाग–३ | अध्यक्ष |
| २) समिक्षा अखिलेश अग्रवाल | बी.ए. भाग–२ | उपाध्यक्ष |
| ३) योगीता दिनकर अडागळे | बी.ए. भाग–३ | कोषाध्यक्ष |
| ४) आश्विनी सुनिल राठोड | बी.ए. भाग–१ | सचिव |
| ५) शारदा मधुकर पांडे | बी.ए. भाग–२ | सहसचिव |
| ६) स्नेहल अरुण जाधव | बी.ए. भाग–२ | सदस्य |
| ७) आशा देवराव पोटे | बी.ए. भाग–१ | सदस्य |
| ८) अर्चना जानुसिंग चव्हाण | बी.ए. भाग–१ | सदस्य |
| ९) रविणा सत्यदेव भोरकडे | बी.ए. भाग–१ | सदस्य |

या प्रसंगी निवड प्रक्रिया पूर्ण होऊन निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व प्रा.जी.व्ही. बन यांनी अभ्यास मंडळाच्या पदाधिकारी यांची काय जबाबदारी असते याविषयी उपस्थित सर्व विद्यार्थीनींशी चर्चा करून औपचारिक रितसर अभ्यास मंडळाचे उद्घाटन व आभार प्रदर्शन यशस्वी रिती





# स्नेह संमेलन अहवाल

**समन्वयक**

स्नेहसंमेलन

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीनंतर ३ वर्षाच्या कालावधीनंतर महाविद्यालयामध्ये दि. ७ व ८ एप्रिल २०२३ रोजी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास साधण्यासाठी असे उपक्रम घेणे आवश्यक ठरतात. दि. ४,५,६ एप्रिल रोजी शारिरीक शिक्षण संचालक प्रा.डॉ. रजनी भोयर यांच्या नेतृत्वाखाली विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. दि. ६ एप्रिल ला मेहंदी व रांगोळी स्पर्धा संपन्न झाली. दि. ७ एप्रिल रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जी.टी. पाटील व स्नेहसंमेलन सचिव कु. भाग्यश्री घोंगडेकर ह्यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन झाले. दोन दिवसीय स्नेहसंमेलनामध्ये एकल नृत्य, समुह नृत्य, गीत गायन, वादविवाद स्पर्धा, एक मिनीट स्पर्धा, प्रश्नमंजुषा, कवि संमेलन, फॅशन शो, आपकी अदालत असे विविध कार्यक्रम व स्पर्धा संपन्न झाल्या.

दोन दिवसीय स्नेहसंमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जी.टी. पाटीला, प्रमुख अतिथी म्हणून मा.आ. ॲड. निलय नाईक, विशेष अतिथी म्हणून वसंतराव नाईक रात्रकालीन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल मुडे हे उपस्थित होते. ह्या समारोपीय कार्यक्रमामध्ये विविध स्पर्धांचे पुरस्कार, क्रिडा पुरस्कार, करिअर कट्टा या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थिनींना मिळालेले पुरस्कार तसेच प्रा.डॉ. रंजना जिवने यांना प्राप्त झालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात स्व. रोहिनी अरविंद चौधरी व स्व. अंकिता कृष्णा कडस्कर स्मृती पुरस्कार अनुक्रमे कु. पुष्पांजली सुभाष हनवते व कु. समिक्षा अखीलेश अग्रवाल यांना देण्यात आला.

दरवर्षी स्नेहसंमेलनामध्ये प्रत्येक शाखेतून उत्कृष्ठ विद्यार्थिनींची निवड करण्यात येते. ही निवड करतांना शैक्षणीक गुणवत्तेशिवाय इतर क्षेत्रातील कामगिरी लक्षात घेतली जाते. यावर्षी कला शाखेतून हा पुरस्कार कु. प्रतिक्षा कैलास मस्के, गृहविज्ञान शाखेतून कु. राजश्री दिपक गाढवे तर वाणिज्य शाखेतून कु. भाग्यश्री शैलेश धोंगडेकर आणि कु. अदिती अनुप ढोरे या दोन विद्यार्थिनींना प्राप्त झाला. स्नेहसंमलेनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.टी. पाटील सर यांचे मार्गदर्शन लाभले. स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी समितीमधील प्रा.डॉ. साधना मोहोड, प्रा.डॉ. असीम खापरे, प्रा.डॉ. छाया जतकर, प्रा. माधवी रिंगणगावकर, प्रा. दीपा काळीकर, प्रा. पुनम बंग, प्रा. किरण शुक्ला, विद्यार्थीनी मंडळातील प्रा. विक्रांत मेश्राम, प्रा.डॉ. अमीत सुरजुसे, प्रा.डॉ. अर्चना भोयर, प्रा. माधवी रिंगणगावकर, प्रा. प्रकाश काळे, प्रा. छगन जुमनाके, प्राध्यापक वर्ग, अध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मंडळातील सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.







# अहवाल – अभिमत कार्यक्रम
# स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम समिती अहवाल

**समन्वयक**
**प्रा. डॉ. वंदना वानखडे, गृहविज्ञान विभाग प्रमुख**
**प्रा. डॉ. अंजनी पांडे, इंग्रजी विभाग प्रमुख**
**प्रा. विक्रांत मेश्राम, मराठी विभाग प्रमुख**
**प्रा. डॉ. अमित सुरजसे,**
**प्रा. डॉ.अर्चना भोयर,**
**प्रा. छगन जुमनाके.**

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित व श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय आयोजित स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम दिनांक २५ जुलै २०२२ ते ३० जुलै २०२२ अशा एकूण दोन सत्रांमध्ये कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभ घेण्यात आले. उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील, प्रा.डॉ. वंदना वानखेडे, प्रा.डॉ. अंजली पांडे यावेळी विचार मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. गणेश पाटील म्हणालेत, महाविद्यालयाचा विद्यार्थी हा आमच्यासाठी केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे या हेतूने आम्ही कार्यरत असतो. बी.ए., बी. कॉम., गृहविज्ञान प्रथम वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थीकरिता या कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले. जेणेकरून विद्यार्थ्यांना महाविद्यालयाविषयी, प्राध्यापकांविषयी, कर्मचाऱ्यांविषयी माहिती झाली पाहिजे. महाविद्यालयामध्ये संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती झाली पाहिजे, शिक्षणाविषयी प्रा. डॉ. वंदना वानखेडे, गृह विज्ञान विभाग प्रमुख यांनी विद्यार्थिनींना स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम संदर्भात माहिती दिली. या कार्यशाळेच्या माध्यमातून सहा दिवस कोणकोणत्या प्रकारचे कार्यक्रम घेतले जातील, कोणकोणते बौद्धिक सत्र घेतले जातील, कोणकोणते शारीरिक उपक्रम खेळ घेतले जातील याविषयी माहिती दिली.

पहिल्या सत्रामध्ये प्राध्यापकांचा व कर्मचाऱ्यांचा परिचय व महाविद्यालयात संपूर्ण वर्षभर होत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली. त्यानंतर मेंटॉरिंग विषयी माहिती तथा मार्गदर्शन प्रा. डॉ. छाया कोकाटे यांनी विद्यार्थिनींना दिली. शिक्षक पालक योजने संदर्भात माहिती प्रा. डॉ. एन. आर. वर्मा यांनी दिली. महाविद्यालयात असलेल्या वेगवेगळ्या शिष्यवृत्तीची माहिती प्रमोद मुकिरवार, प्रकाश गायकवाड यांनी दिली. दुसऱ्या सत्रामध्ये योग आणि मेडिटेशनचे प्रशिक्षक ज्योती सुरेश नरखेडे आणि स्नेहल संदीप दिघाडे यांनी विद्यार्थिनींना योगाचे महत्त्व तसेच प्रशिक्षण दिले उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, मराठी विभाग प्रमुख यांनी केले. तर दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. रजनी भोयर, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख यांनी केले.

**दिनांक २६ जुलै दुसरा दिवस**

पहिल्या सत्रामध्ये सत्रामध्ये ग्रंथालय विषयी माहिती आणि ग्रंथालयाला विद्यार्थिनींची भेट व त्या ग्रंथालयामधील विविध उपक्रमाविषयी संपूर्ण माहिती तथा मार्गदर्शन ग्रंथपाल प्रा. डॉ. छाया जतकर यांनी दिली. सोबतच नॅक विषयी माहिती प्रा. डॉ. रवि चापके यांनी दिली. तर दुसऱ्या सत्रामध्ये सौरभ चेटूले, राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू एन.आय.एस. कोच विद्यापीठ कलर कोट यांनी विद्यार्थिनींना बॅडमिंटन विषयी माहिती व त्यांचे प्रात्यक्षिक घेतले. त्याचबरोबर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रध्दा सुरोशे बॅडमिंटन् रौप्य पदक विजेती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तिने देखील विद्यार्थिनींना बॅडमिंटन विषयी माहिती व प्रत्यक्षात

बॅडमिंटनचा सराव कसा केला जातो या संदर्भात मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचा देखील बॅडमिंटन सराव घेण्यात आला.

**दिनांक २७ तिसरा दिवस**

पहिल्या सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या संदर्भात माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. असीम खापरे यांनी दिली. याप्रसंगी प्रा. डॉ. साधना मोहोड, प्रा. डॉ. अजली पांडे, प्रा. डॉ. असीम खापरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध गीत सादर केलेत व त्याचा सराव विद्यार्थी कडून करून घेतला. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थी जीवनामध्ये का गरजेची आहे याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. त्याचबरोबर लेफ्टनंट प्रा. दीपा काळीकर यांनी राष्ट्रीय छात्रसेना याविषयी सविस्तर अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि यावर पॉइंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये श्री. अवि देशपांडे टेबल टेनिस कोच अँड राष्ट्रीय खेळाडू यांनी टेबल टेनिस च्या संदर्भात विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व त्यांचा सराव देखील करून घेतला.

**दिनांक २८ जुलै चौथा दिवस**

पहिल्या सत्रामध्ये प्रा. डॉ. रंजना जीवने गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा समन्वयक करिअर कट्टा, मनोहरराव नाईक स्टडी सर्कल, करिअर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनींना किती उपयुक्त आहे याविषयी सविस्तर माहिती दिली. सध्याचा काळ हा स्पर्धात्मक काळ आहे. या काळामध्ये आपल्याला स्वत:ची ओळख निर्माण करता आली पाहिजे. स्वत:चा सर्वांगीण विकास या करिअर कट्ट्याच्या माध्यमातून होऊ शकतो, नव्हे तर होतोच. महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू ठरवून व्यवसायभिमुख , रोजगारभिमुख व नोकरी संदर्भात पन्नास उपक्रम रेखांकित केले आहेत. त्याची संपूर्ण माहिती त्यांनी विद्यार्थिनींना दिली. करिअर कट्टा संदर्भात त्याचे रजिस्ट्रेशन कसे करायचे, दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून वर्गात कसे उपस्थित रहावे. याविषयी माहिती दिली.

**दिनांक २९ जुलै पाचवा दिवस**

पहिल्या सत्रामध्ये प्रा. डॉ. वंदना वानखेडे गृहविज्ञान विभाग प्रमुख यांनी महिला विकास समितीच्या संदर्भामध्ये विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयामध्ये येत असताना विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारचा त्रास होत असेल, तर त्याची दक्षता ही समिती घेत असते विद्यार्थिनींना शिक्षण क्षेत्रामध्ये येणारे अनेक अडचणी त्या अडचणीच्या संदर्भात देखील ही समिती कार्यरत आहे. प्रा. डॉ. वैशाली पांडे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले. प्रा. डॉ. वैशाली पांडे, संस्कृत विभाग प्रमुख यांनी विद्यार्थिनींच्या जीवनामध्ये मूल्य संस्कार होणे किती आवश्यक आहे. याविषयी संस्मरणीय असे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम यांनी महाविद्यालयामध्ये वर्षभर जे दोन उपक्रम राबविले जातात, त्यापैकी एक विद्यार्थिनी मंडळ आणि दुसरे म्हणजे वासल्य वार्षिक अंक हे दोन्ही उपक्रम विद्यार्थिनींसाठी किती महत्त्वपूर्ण आहेत याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. विद्यार्थिनी मंडळाद्वारे व वासल्य वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना त्यांच्या लेखनासाठी चालना दिली जाते. त्यांच्यावर लेखन व वाचनाचे संस्कार केले जाते. अनेक नामांकित व्यक्तींचे मार्गदर्शन तथा व्याख्यान घेऊन विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेत भर घातली जाते नंतर दुपारच्या सत्रात विद्यार्थिनींना महाविद्यालयातील विविध विभागाल भेटी देण्यात आल्या. या सहा दिवसीय चाललेल्या उपक्रमामध्ये विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

**दिनांक ३० जुलै सहावा दिवस**

**स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम चा समारोपय दिवस**

या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अंजली पांडे हे विचार मंच वर प्रामुख्याने उपस्थित होते. सोबतथ स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रामच्या समन्वयक प्रा. डॉ. वंदना वानखेडे, प्रा. डॉ. विक्रांत मेश्राम, प्रा. छगन जुमनाके हे विचार मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी संपूर्ण सहा दिवस चाललेल्या इंडक्शन प्रोग्राम चा अहवाल समन्वयक प्राध्यापक डॉक्टर वंदना वानखेडे यांनी वाचन केले त्यानंतर कु. स्नेहल मधुसूदन बरडे, कु. प्रिया कैलास केवटे, कु. सलोनी संजय गणोजे, कु.स्वाती मधुकर जाधव, कु. श्रुतिका संजय वाकडे बीकॉम भाग एक, लक्ष्मी रवींद्र कानडे आणिं कुमारी संयमी गोरे बिएस्सी भाग एक या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ. अजली पांडे यांनी स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतो. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासामध्ये स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रामचे महत्त्व आहे विद्यापीठ अनुदान आयोगाने इंडक्शनची संस्था सुरू केली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी जुळवून घेण्यास मदत करण्याचे उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून आजूबाजूचा परिसर सहकारी विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी संबंध विकसित करणे, संवेदनशीलता, सामाजिक प्रासंगतीचे, विविध मुद्दे आणिं मानवी मूल्य आत्मसात करणे जेणेकरून नवीन जबाबदाऱ्या नागरिकात निर्माण होतील. त्यामुळे इंडक्शन प्रोग्राम ची नितांत गरज विद्यार्थ्यांना आहे. आणि या इंडेक्शन प्रोग्रामच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नक्कीच बदल झालेला दिसून येतो आहे. याबद्दल विद्यार्थ्यांचे मी कौतुक करतो. व सहा दिवसीय चालणाऱ्या इंडेक्शन प्रोग्रामची जबाबदारी ज्यांनी सामर्थपणे सांभाळली, ते म्हणजे इंडक्शन प्रोग्रामच्या समन्वयक प्रा. डॉ. वंदना वानखेडे व त्यांचे सहकारी प्रा. डॉ. अजली पांडे, प्रा. विक्रांत मेश्राम, प्रा.डॉ. अमित सुरजुसे, प्रा. डॉ. अर्चना भोयर प्रा. छगन झुमके या प्राध्यापकांनी उत्स्फूर्तपणे ही कार्यशाळा सांभाळल्यावद्दल त्यांचे देखील अभिनंदन करतो. असे मनोगत यावेळी प्राचार्य डॉ. गणेश पाटील पांनी अध्यक्षीय समारोपातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. वंदना वानखेडे यांनी केले. सहा दिवशीय कार्यशाळेमध्ये विविध विषयावर, विविध उपक्रमाविषयी प्राध्यापकांनी विद्यार्थिनींना माहिती दिली. त्यामुळे महाविद्यालयाशी नाते विद्यार्थ्यांचे अधिक घट्ट झाले. महाविद्यालय हे त्यांच्यासाठी आता नवीन राहिले नाही, कारण महाविद्यालयातील विविध उपक्रम विविध विभाग यांच्याशी जवळचे नाते या कार्यशाळेच्या माध्यमातून निर्माण झाले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. बीए, बीकॉम गृहविज्ञान प्रथम वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थिनी करिता या कार्यक्रमाचे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनींनी सहकार्य केले प्रत्येक प्राध्यापकांनी आपापली जबाबदारी सांभाळली. विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. सोबतच स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम पा समितीची समन्वयक या नात्याने ज्यांनी या समितीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली ते म्हणजे माझ्या समितीचे सदस्य प्रा. डॉ. अजली पांडे, प्रा. विक्रांत मेश्राम, प्रा. डॉ. अर्चना भोयर, प्रा. डॉ. रजनी भोयर आणि छगन जुमनाके प्रा. डॉ. अमित सुरेजुशे पांचे देखील मी अभिनंदन करतो. आणि सहकार्य केल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसे आभार प्रदर्शन प्राध्यापक विक्रांत मेश्राम, मराठी विभाग प्रमुख यांनी केले. या सहा दिवसीय स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम मध्ये बीए, बीकॉम, गृहविज्ञान प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणे सहभाग नोंदविला. पहिल्या दिवशी विद्यार्थिनींची नोंदणी करण्यात आली. त्यासाठी स्वतंत्र नोंदणी अर्ज तयार करण्यात आले. त्या नोंदणी अर्जामध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती घेण्यात आली. साहि दिवस चालणाऱ्या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांची दररोजची स्वाक्षरी घेण्यात आली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, महाविद्यालयाविषयी त्यांच्यात कुतूहलता निर्माण व्हावी. प्राध्यापकांशी नाते निर्माण व्हावे. एक प्रकारची कुतूहलता महाविद्यालयाविषयी त्यांच्या मनात निर्माण होईल यासाठी पा स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्रामची कार्यशाळा महाविद्यालयात घेण्यात आली. शेवटी सहा दिवसीय स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम चा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी राष्ट्रगीत डॉक्टर साधना मोहोड समवेत उपस्थित प्राध्यापकांनी व विद्यार्थिनींनी सादर केले.

# ग्रंथालय विभाग

## (Learning Resource Centre)

**डॉ. छाया बा. जतकर**

ग्रंथपाल

ज्ञान संसाधन केंद्र (Learning Resource Centre) हा महाविद्यालयाचा अविभाज्य घटक आहे. आजच्या ज्ञान विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगामधे शैक्षणीक संस्थामध्ये अमुलाग्र बदलांचे वारे वाहु लागले आहे. माहितीच्या विस्फोटामुळे (Information Explosiion) आणी माहिती तंत्रज्ञानाच्या (IT) झपाटयाने होणाऱ्या प्रगतीमुळे ग्रंथालय हे माहिती व ज्ञान संसाधन केन्द्र बनलेले आहे.

आज सर्व जगभर शैक्षणीक व्यवस्था आणि शिक्षण प्रणाली यात नवनवीन बदल होत आहत आणि या बदलत्या वातावरणात अनुकुल अशा पध्दतीने ग्रंथालयाचे कामकाज सुध्दा बदलने क्रमप्राप्त आहे. कारण शैक्षणीक राजकीय आर्थिक वैज्ञानीक अशा सर्वे क्षेत्रामध्ये ग्रंथालये समृध्द होत आहेत. त्यामुळे ग्रंथालयाला सृजनात्मक सुसंस्कृत समाजाचा आधारस्तंभ म्हणुन ओळखण्यास मदत होत आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रात प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांनी स्वयं अध्ययन करावे (self study) ही संकल्पना रुढ झाल्याने ग्रंथालये ही सेवा सुविधा पुरविणारे माहिती केन्द्र म्हणुन महाविद्यालयामधे भूमिका पार पाठत आहेत.

### (Library Advisory Committee)

**१) ग्रंथालय समिती**

ग्रंथालयाचे सुव्यवस्थीत व नियोजनबध्द व्यवस्थापनासाठी दरवर्षी ग्रंथालय समीती गठीत कण्यात येत असते सत्र २०२२–२३ खालीलप्रमाणे समतीतत सदस्य आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील | प्राचार्य | अध्यक्ष |
| २) | डॉ. छाया बा. जतकर | ग्रंथपाल | समन्वयक |
| ३) | डॉ. रजनी वा. भोयर | शारिरीक शिक्षण प्रमुख | सदस्य |
| ४) | डॉ. रवि प्रकाश चापके | प्राध्यापक | सदस्य |
| ५) | श्रीमती आशालता बरडे | प्राध्यापक | सदस्य |
| ६) | श्री. प्रमोद मुकिरवार | ग्रंथालय परिचर | सदस्य |

**२) ग्रंथालयाची वेळ**

सर्व सार्वजनिक सुटीचे दिवस वगळता महाविद्यालयाचे ग्रंथालय सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.३० ते ५.०० वाजेपर्यंत व शनिवरी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत खुले करण्यात येते.

**३) ग्रंथालयाचे सभासदत्व (Library Membership)**

महाविद्यालयात प्रवेश प्राप्त सर्व विद्यार्थिनी, प्राध्यापक वृंद, अध्यापकेत्तर कर्मचारी, अंशदायी अधिव्याख्याते यांना ग्रंथालयाचे सभासद करुन घेतल्या जाते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या बाहेरच्या बही:शाल विद्यार्थिनी outsider members siniour citizens यांना तात्पुरते सभासदत्व देण्यात येते.

**४) आर्थिक तरतुद (Budget)**

सत्र २०२२–२३ या शैक्षणीक सत्रात ग्रंथालयाकरिता ३४,३०४ रुपयाची ग्रंथ खरेदी करण्यात आलेली असून वृत्तपत्रे व नियतकालिके यावर १०००० रुपयांपर्यंत आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

**५) ग्रंथालया अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा (Library facilities of services)**

**Services : ( सेवा )**

१) संदर्भ व माहिती सेवा

२) ग्रंथसूची सेवा

३) प्रतिरुपलेखन सेवा

४) निवडक माहिती प्रसारण सेवा

५) आंतरग्रंथालय देवघेव सेवा

६) प्रचलित जागरुकता सेवा

**सुविधा (Facilities)**

**१) ग्रंथ देवघेव सुविधा**

ग्रंथालयातंर्गत देवघेव विभागाद्वारे ग्रंथ देवघेव सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाते.

**२) वाचनकक्ष सुविधा**

ग्रंथालयाचा वाचनकक्ष सकाळी १०.३० ते ५ वाजपर्यंत खुला असतो. वाचनाकरीता संदर्भग्रंथ नवीन असलेली मासिके, वृत्तपत्रे, मासिकाचे बांधीव खंड वाचनाकरिता उपलब्ध करुन दिले जातात. विद्यार्थि व प्राध्यापक यांना स्वंतत्रपणे बैठक व्यवस्था वाचनाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**३) इंटरनेट सुविधा**

विद्यार्थ्यांना ऑन लाईन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. एकुण १३ संगणकाद्वारे ही सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

**४) ओपॅक (OPAC)**

ग्रंथालयात असलेल्या एकुण वाचन साहित्याची माहिती करुन देण्याच्या उद्देशाने ग्रंथालया अंतर्गत OPAC ही सुविधा विद्यार्थी व प्राध्यापकांना उपलब्ध करुन दिल्या जाते.

**५) संदर्भ विभाग**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात समृध्द असा संदर्भ ग्रंथ विभाग असुन त्यामधे शब्दकोश, ज्ञानकोश अहवाल व इतर संदर्भ ग्रंथ ठेवलेले आहे वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीतुन संदर्भ ग्रंथाची खरेदी करण्यात येवुन संदर्भ ग्रंथ अद्ययावत ठेवण्यात आलेला आहे. व संदर्भ कक्षात स्वंतत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**ग्रंथालयातंर्गत उपक्रम**

१) वाचनप्रेरणा दिन : माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमीत्त दिनांक १५ ऑक्टो. २०२३ वाचन प्रेरणा दिन आयोजीत करण्यात आलेला असुन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.टी.पाटील सर तर प्रमुख अतिथी म्हणुन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.अंजली पांडे व संस्कृत विभाग प्रमुख प्रा.डॉ.वैशाली पांडे उपस्थीत होत्या. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रंथालय विभागाद्वारे अखंड वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. य सकाळी ११ ते ५ वाजपर्यंत अखंड वाचन करणाऱ्या विद्यार्थिनींना ग्रंथभेट देवुन गौरव करण्यात आला.

३) बुक रिव्युव्ह कॉम्पीटिशन

ग्रंथालयातर्गत विद्यार्थिनींना ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात येवुन त्या विद्यार्थिनींकडुन त्यांनी वाचलेल्या पुस्तकांची रिव्युव्ह कॉम्पीटिशन घेण्यात येवुन उत्कृष्ट असलेल्या विद्यार्थिनींना प्रथम, द्वितीय ब तृतीय क्रमांक देण्यात येवुन ग्रंथभेट देण्यात आली.

४) निबंध स्पर्धा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमीत्ताने १४ एप्रील २०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर : एक ग्रंथप्रेमी या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात आले तसेच उत्कृष्ट तीन निबंधाना प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात येवुन त्यांना रोख बक्षीस देण्यात येवुन गौरव करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील सर समितीतील सर्व सन्माननीय सदस्य, ग्रंथालय कर्मचारी यांच्या सहकार्याने ग्रंथालयाचे कार्य सुरळीत पार पाडले जाते.



# राष्ट्रीय सेवा योजना : २०२२-२३
# वार्षिक अहवाल

**प्रा. सरिता चंदनकर**

प्रतीवर्षीप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेची आवेदनपत्रे भरुन घेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची निवड करण्यात आली. विद्यापीठाने महाविद्यालयाला १०० विदयार्थीनींच्या पथकाकरिता मंजुरी दिली आहे. या विद्यार्थीनींची ऑनलाईन नोंदणी करुन त्यांना एन व्ही सी नंबर देण्यात आला. या सत्रात व विद्यार्थीनी प्रतिनीधी म्हणून कु. प्रतीक्षा कैलास मस्के (बी.ए.भाग-३) व कु. राजश्री गाढवे (बी.एस.सी. भाग-३) हयांची निवड करण्यात आली. या सत्रारंभी सभा दिनांक २८/०७/२०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी व सहकारी प्राध्यापकांची संपन्न झाली. या सभेला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक कार्यक्रमांची आखणी करण्यात आली.

**दिनांक २३/०७/२०२२.**

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लसीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, अध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी, नागरिक यांना कोवीड लसीकरणाचा दुसरा डोस व बुस्टर डोस देण्यात आला.

**दिनांक ०९/०८/२०२२ अमृत महोत्सवी सप्ताह.**

दि. ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत महाविद्यालयाची स्वच्छता, देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विषयावर व्याख्यान, घर-घर तिरंगा रॅली, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वृक्षारोपण अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**दिनांक १०/८/२०२२. रानभाज्या महोत्सव**

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात गृह अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य गणेश पाटील प्रमुख वक्त्या डॉ. स्वाती ताथोड होते. भाज्यांचे औषधीय गुण विद्यार्थीनींना माहीत व्हावे यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**दिनांक १९/०८/२०२२ समुह राष्ट्रगीत गायन**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत दि.९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राज्यात स्वराज्य महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने दि.१७ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता समुह राष्ट्रगीत गायन हा उपक्रम घेण्यात आला.

**दिनांक १२/०९/२०२२ पोषण सुंदरी स्पर्धा**

दिनांक ०१ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत राष्ट्रीय पोषण महिना साजरा करण्याच्या दृष्टीने दिनांक १२ सप्टेंबर रोजी गृहअर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने पोषण सुंदरी स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील होते. यात एकुण १८ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवीला स्पर्धेचे परिक्षण प्रा. डॉ. उज्ज्वला तीखे यांनी केले त्यातून पोषण पुरस्कार, कर्बोदके सुंदरी पुरस्कार अनुक्रमे कु. स्नेहल बरडे, बी. ए. भाग-१ व कु. भावना जैन, बी. ए. भाग-३ ह्यांना प्रदान करण्यात आला.

**दिनांक-२४/०९/२०२२**

२४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील, मार्गदर्शक राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. विवेक सिरस्कार, निमंत्रीत वक्ते म्हणून प्रा. विजय राठोड उपस्थीत होते.

**दिनांक २७/०९/२०२२ राष्ट्रीय पोषण अभियान कार्यक्रम**

दत्तक ग्राम भाटंबा येथील जिल्हा परिषद शाळा येथे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेकडून राष्ट्रीय पोषण महिना अंतर्गत पोषण आहाराचे महत्व आणि पर्यावरण जनजागृती अंतर्गत एक 'विषय एक वृक्षारोपण' कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. कार्यक्रमाला भाटंबा गावचे सरपंच श्री. कीशोर काळे, बाळू पाटील, सामाजीक कार्यकर्ते, प्रमुख वक्त्याा डॉ. उज्वला तीखे, डॉ. स्वप्ना देशमुख उपस्थीत होत्या.

**दिनांक २८/०९/२०२२ माहीती अधिकार दिन.**

२८ सप्टेंबर रोजी माहीती अधिकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील, प्रमुख वक्ते प्रेमकुमार भागवत केदार, सहाय्यक पोलीस इन्सपेक्टर व प्रमुख अतीथी दिनेश सोळंकी, पोलीस नायक यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

**दिनांक २/१०/२०२२ गांधी जयंती व लाल बहादूरशास्त्री जयंती**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विदयार्थिनी राष्ट्रपीता महात्मा गांधी ब लाल बहादूर शास्त्री जयंती निमीत्त अभिवादन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला तद्नंतर लगेच महाविद्यालयीन स्वच्छता स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत करण्यात आली.

**दिनांक ११/१०/२०२२ स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत प्लास्टीक निर्मुलन कार्यक्रम.**

प्लास्टिक निर्मुलन अभियान याचे आयोजन करण्यात आले. अंदाजे ७ किलो प्लास्टीक गोळा करुन त्याचे निर्मुलन करण्यात आले. सदर उपक्रमाचे प्रमाणपत्र पुसद नगर पालिकेचे मुख्याधीकारी डॉ. किरण सुकलवाड यांच्याकडून अभिनंदनपर प्रदान करण्यात आले.

**दिनांक २९/९/२०२२ श्रीमती वत्सलाबाई नाईक स्मृतीदिन**

दिनांक २९ सप्टेंबर २०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या स्मृतीदिनानिमीत्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील यांनी श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतीमेला हार अर्पण करुन त्यांच्या प्रती असणाऱ्या स्मृतीला उजाळा दिला. या निमीत्त सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद यांनी पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

**दिनांक १५/१०/२०२२ वाचन प्रेरणा दिन**

वाचनाचे महत्व जाणून भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमीत्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अंजली पांडे, प्रा. डॉ. वैशाली पांडे, ग्रंथपाल डॉ. छाया जतकर, प्रा. विक्रांत मेश्राम, सर्व प्राध्यापक वृंद उपस्थीत होते. राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या लहानपणापासून तर राष्ट्रपती पर्यतच्या अनेक आठवणी सांगीतल्या व वाचनाचे महत्व विशद करण्यात आले.

**दिनांक ३१/१०/२०२२ राष्ट्रीय एकता दिन रॅली**

सरदार वल्लभभाई पटेल याचा जन्म दिन राष्टीय एकता दिन म्हणून अतीशय उत्साहात साजरा केला गेला. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता 'रन फॉर युनीटी' साठी सुमारे ५० हुन अधिक रासेयो विद्यार्थीनींनी भाग घेतला.

**दिनांक १४/११/२०२२ बालकदिन**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिन म्हणजेच बालकदिन शासकीय इंग्रजी आश्रम शाळा वडगाव शिंदे तालुका पुसद येथील बालकांना नोटबुक्सचे वाटप करुन साजरा करण्यात आला. याप्रसंगी माध्यमिक शिक्षीका कु. टी. एन. कवकर, कु. पी. कचरे, कु. एस. एम. राठोड हया उपस्थीत होत्या.

**दिनांक २५/२२/२०२२ महिलांवरिल हिंसाचार निर्मुलन आंतरराष्ट्रीय दिन.**

जागतीक महिला हिंसाचार दिनानिमीत्त विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात अँड. विवेक टेहरे यांनी महिला हिंसाचार प्रतीबंध कायद्याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील होते.

**दिनांक–२६/११/२०२२.संविधान दिन**

संविधान दिनानिमीत्त कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वंदना वानखेडे यांनी विद्यार्थीनींकडून भारतीय संवीधाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. प्रमुख वक्ते ॲड. जांभुळकर यांनी मुलभूत हक्क, आर्टिकल २२६, ४५ अशा विविध बाबींवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**दिनांक २८/११/२०२२ महात्मा फुले पुण्यतीथी**

सामाजीक क्रांतीचे अग्रदुत, सत्यशोधक चळवळीचे निर्माते महात्मा जोतीबा फुले यांच्या पुण्यतीथीनीमीत्त कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील यांनी विदयार्थीनींना मार्गदर्शन केले. महात्मा फुलेंचा आदर्श आपण घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले.

**दिनांक ०१/१२/२०२२ एडस् जनजागृती रॅली**

शासकीय ग्रामीण रुग्नालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने एडस् निर्मुलन दिंडीचे आयोजन करण्यात आले. तहसीलदार श्री. काळबांडे यांनी दिंडीला हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ केला. सर्व विदयार्थीनींनी एडस् बददल विविध घोषणा देवून जनजागरण करण्याचा प्रयत्न केला.

**दिनांक ६/९२/२०२२ महापरिनिर्वाण दिन**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन रासेयो तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. विलास भवरे यांनी चवदार तळयाचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, संविधान निर्मीती, काळाराम मंदीर प्रवेश, कामगार लढे, श्येडयूल कास्ट फेडरेशन इत्यादींनी बाबासाहेबांचे आयुष्य गजबजलेले आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी भूषवीले.

**दिनांक १९/१२/२०२२ श्री देव निवासी मतिमंद विद्यालयास भेट**

१९ डिसेंबर रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथिचे औचीत्य साधून श्री. देव निवासी मतिमंद विद्यालय श्रीरामपूर येथे भेटीचे आयोजन करण्यात आले. देव म्हणजे अनाथ, अपंग, दरिद्री, दुःखी रंजल्या गांजल्यांची सेवा हिच देवपूजा असे गाडगेबाबा म्हणत.शिक्षण घेत असताना आपलीही काही सामाजीक बांधीलकी आहे याची जाणीव जागृती विदयार्थीनींमध्ये रुजावी यासाठी हि भेट प्राचार्य रेखा मालपाणी यांनी तेथील विद्यार्थ्यांची दैनंदिनीची थोडक्यात माहीती दिली.

**दिनांक २०/१२/२०२२ संत गाडगेबाबा पूण्यतीथी कार्यक्रम**

संत गाडगेबाबा पूण्यतीथी कार्यक्रमाचे आयोजन रासयो तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील यांनी विदयापीठाची निर्मीती व नामाभिंदान कशाप्रकारे करण्यात आले याची माहिती प्रदान केली प्रमुख वक्ते प्रा. नंदकुमार खैरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या जन्मापासून थेट त्यांच्या नागरवाडी येथील शेवटच्या क्षणापर्यंतचा प्रवास रेखाटला.

**दिनांक १२/०१/२०२३ स्वाती विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती**

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या छायाचीत्राला पूष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वंदना वानखेडे यांनी जिजाऊ यांच्या कार्याचा व कर्तुत्वाचा आलेख अभिव्यक्त केला. त्याचबरोबर विवेकानंदाचे कार्याविषयी व तत्वज्ञानाविषयी मनोगत व्यक्त केले.

**दिनांक २५/०१/२०२३ राष्ट्रीय मतदार दिन**

राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे करण्यात आले. कार्यक्रमचे अध्यक्ष प्रा. डॉ. वंदना वानखेडे यांनी देशाच्या भावी उमेदवारांना निवडून देण्याचा हक्क किती महत्वाचा आहे हे विशद केले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. असीम खापरे यांनी भारतीय लोकशाही नागरिकांना देण्यात आलेल्या कलमांवर प्रकाश टाकला व भविष्यात होऊ घातलेल्या निवडणुकांचे उमेदवार आपण सुनिश्चीत करु शकतो असे मत व्यक्त केले.

**दिनांक २६/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३ विशेष शिबीर**

राष्ट्रीय मतदारदिन कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे विशेष श्रम संस्कार शिबीराचे आयोजन दत्तक ग्राम भाटंबा येथील जिल्हा परिषद शाळेत घेण्यात आले. युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास? हे ध्येय समोर ठेवून आयोजित केलेल्या शिबीरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. शिबीराचे उदघाटन २७ फेब्रुवारीला गटविकास अधिकारी श्री. संजय राठोड यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील हे होते. प्रमुख अतीथी म्हणून श्री. किशोर काळे, सरपंच गट ग्रामपंचायत लोणी, श्री. महेश चव्हाण, मुख्याध्यापक जी. प. शाळा भाटंबा, श्री. शंकर कांबळे सहाय्यक शिक्षक भाटंबा, गावकरी मंडळी उपस्थीत होते. तर प्रमुख उपस्थीती म्हणून श्री. सावळे पोलीस निरीक्षक उपस्थित होते. सात दिवसापर्यंत चाललेल्या या शिबीरात विविध कृतीशील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणातून समाजसेवा व समाजसेवेतून व्यक्तिमत्व विकास या तत्वावर आधारित विविध वक्त्यांची मार्गदर्शनपर भाषणे प्रात्यक्षिके, ग्रामसफाई, जनजागृती, आरोग्य तपासणी, बंधारा बांधण्यामध्ये सहभाग असे विविध उपक्रम या शिबीरात राबवीण्यात आले. दिनांक ५ मार्च २०२३ रोजी कृषिभूषण दीपकभाऊ आसेगावकर यांच्या प्रमुख उपस्थीतीत शिबीराची सांगता झाली.

**दिनांक १०/०३/२०२३ सावीत्रीबाई फुले पुण्यतीथी**

१० मार्च २०२३ रोजी सावीत्रीबाई फुले यांच्या पुण्यतीथी निमीत्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील यांनी सावीत्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या स्मृतीस जतन करायला हवे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वर्ग कर्मचारी वर्ग व विद्यार्थीनी उपस्थीत होत्या.

दिनांक २३/०३/२०२३ 'आझाद हिंदची गाथा' नाटयप्रयोगाचे सादरीकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण महाराष्ट्रामध्ये साजरा करत असतांना व शहिद दिवसाचे औचीत्य साधून २३ मार्च २०२३ रोजी आझाद हिंदची गाथा हे नाटक ७५ महाविद्यालयात ७५ ठिकाणी ७५ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. या अनोख्या उपक्रमात श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेने महाराष्ट्रातील ७५ महाविदयालयामध्ये सहभाग घेतला. हे विशेष या नाटयप्रयोगातून एकुण १८ व्यक्तीरेखा रेखाटण्यात आल्या. सदर नाटक श्री. दर्शन महाजन व श्री. विदयानाथ सुर्वे लिखीत असून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतीक कार्यसंचनालय, राष्ट्रीय सेवा योजना व आर्टीस्टीक हयुमन्स यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्तुत करण्यात आले. २३ मार्च रोजी नाटयप्रयोग सादर करण्यापूर्वी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून कृषीभूषण दिपकभाऊ आसेगावकर, अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. टी. पाटील यांनी सदर नाटयप्रयोगाला शुभेच्छा प्रदान केल्या. सदर नाटयप्रयोगाला एकुण २५० ते ३०० श्रोता वर्ग महाविदयालयाच्या प्रेक्षागृहात उपस्थीत होता. नाटय प्रस्तृतीनंतर अध्यक्ष, उदघाटक, अतीथी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी वर्ग, यांच्या शुभेच्छांचा वर्षाव झाल्याने सदर नाटकाची प्रस्तृती चांगली झाली असे म्हणावे लागेल.

**दिनांक ११/०४/२०२३ महात्मा फुले जयंती**

११ एप्रील २०२३ रोजी महात्मा जोतीबा फुले जयंती निमीत्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनाचा थोडक्यात आढावा घेतला.







# संप्रेषण आणि विस्तार शिक्षण विभागाचा अहवाल

प्रा. वर्षा गारुळे (भडंगे)

**पिंपळखुटा येथील अंगणवाडीला शैक्षणिक भेट**

दिनांक २७.०४.२०२२ रोजी जिल्हा परिषद पिंपळखुटा येथे शैक्षणिक भेट देण्यात आली विद्यार्थिनींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेद्वारे मिळणाऱ्या सेवा आणि कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती मिळावी हा या शैक्षणिक भेटीचा उद्देश होता या भेटी अंतर्गत विद्यार्थिनींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत शून्य ते एक वयोगटातील बालकांचे वजन व उंची मोजण्याचे प्रात्यक्षिक दाखविले आणि अंगणवाडीतील विद्यार्थ्यासाठी उपलब्ध असणारे शैक्षणिक साहित्याची उपयोगिता समजावून सांगितली. सोबतच अंगणवाडी केंद्रातर्फे पूरक आहाराचे वाटप व मातांना आहारविषयक समूह समुपदेशन केले जाते ही माहिती सांगितली. अंगणवाडी हे व्यक्तीच्या शारीरिक मानसिक आणि सामाजिक विकासाचा प्राथमिक पाया आहे हे विद्यार्थिनींना दर्शवून द्यावयाची होते.

**पर्यावरण विषयक जनजागृती रॅली**

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील गृह विज्ञान विभागाच्या सर्व विद्यार्थिनी आणि जनता शिक्षण प्रसारक मंडळ शाळेचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागाने पर्यावरण विषयक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण प्रदूषण ही समस्या दिवेसंदिवस वाढतच आहे, औद्योगिक कचरा थेट मातीत, पाण्यामध्ये आणि हवेत मिसळत आहे. एवढे असूनही लोक प्रदूषणाला आणि त्याच्या परिणामाला गांभीर्याने घेत नाही आहेत त्यामुळे समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करण्याकरिता रॅली चे आयोजन करण्यात आले होते. रॅलीला हिरवी झेंडी प्रा. संजय सुपे यांच्या हस्ते देण्यात आली. तसेच विद्यार्थिनींनी परिसर स्वच्छतेची मोहीम राबवून महाविद्यालयीन परिसर सुद्धा स्वच्छ केला.

**पर्यावरण विषयक पथनाट्य**

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील गृह विज्ञान (भाग १) विभागाच्या विदयार्थिनी परिसर स्वच्छ तर देश स्वच्छ याकरिता स्वच्छतेची सुरुवात स्वतः पासूनच, करावयास हवी अशी संकल्पना घेऊन महाविद्यालयीन परिसरात पर्यावरण विषयक जनजागृती व्हावी म्हणून सुंदर पथनाट्य सादर केले आणि सर्वासह आम्ही आमचा परिसर स्वच्छ राखू अशी शपथ घेतली.

**पोस्टर आणि स्लोगन स्पर्धेचे आयोजन**

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील संप्रेषण आणि विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागाच्या वतीने महाविद्यालयात पर्यावरणाच्या समृद्धीसाठी जनजागृती गती व्हावी या हेतूने पोस्टर आणि स्लोगन स्पर्धेच्या आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थिनींनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी या स्पर्धेचे उदघाटन केले यशस्वी विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा (World Literacy Day 2022)**

दिनांक ८.०८.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील संप्रेषण आणि विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागाच्या वतीने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थिनीमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच विद्यार्थिनींचे शिक्षणाकडे लक्ष वेधणे असा

आहे. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कला शाखा गृहविज्ञान शाखा आणि वाणिज्य शाखेच्या अधिकाधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

**श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तूचे प्रदर्शन**

दि. १ एप्रिल २०२३ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात, संप्रेषण आणि विस्तार शिक्षण गृह विज्ञान विभागातर्फे टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूचे प्रदर्शन आणि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीच्या माध्यमातून प्रत्येक घरामध्ये विविध प्रकारच्या जुन्या आणि बिन कामाच्या वस्तू असतात या अनुपयोगी वस्तूचा रचनात्मक पद्धतीने वापर केल्यास या वस्तू सर्वा करिता बहुउपयोगी ठरू शकतील आणि घरातील निकामी वस्तू आकर्षक करून घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत होईल. हा महत्वपूर्ण उद्देश साध्य करण्याकरिता या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनीमध्ये महाविद्यालयातील गृहविज्ञान शाखा, वाणिज्य शाखा आणि कला शाखेच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रदर्शनीला विद्यार्थिनींच्या पालकांनी, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचाऱ्यांनी भेट दिली आणि विद्यार्थिनींची प्रशंसा सुद्धा केली. या स्पर्धेच्या आयोजनाचे उद्घाटन श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी केले आणि विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल कोतुक केले व शुभेच्छा पर मत व्यक्त करताना आदरणीय प्राचार्य सरांनी अतिशय स्तुत्य उपक्रम अशी प्रतिक्रिया दिली, तसेच टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूच्या स्पर्धेचे परीक्षण डॉ. उज्वला तिखे आणि डॉ. सपना देशमुख यांनी केले. या मध्ये कु. खुशी ढाकुलकर प्रथम क्रमांक, कु. प्रतिक्षा शरद पवार द्वितीय क्रमांक, कु वैजयंती टाले तृतीय क्रमांक निवडण्यात आले. माननीय आमदार निलयभाऊ नाईक यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले तसेच माननीय आमदार साहेबांनी विद्यार्थिनींनी कौतुक केले. या प्रदर्शनीचे आयोजन प्रा. वर्षा गारुळे आणि डॉ. अर्चना भोयर यांनी केले. तसेच कार्यक्रैमाच्या यशस्वीतेसाठी गृह विज्ञान विभागाच्या सर्व विद्यार्थिनींनी अधिक परिश्रम घेतले.

**शैक्षणिक साहित्य प्रदर्शनीचे आयोजन**

दिनांक २२.०४.२०२२ रोजी संप्रेषण आणि विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागाच्या वतीन विद्यार्थ्यांना आणि पालकांना शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य विषयक माहिती मिळावी याकरिता शैक्षणिक साहित्य उदा. लीफलेट, फोल्डर, पोस्टर, भित्तिपत्रके या साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले होते. या प्रदर्शनीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच माननीय आमदार निलयभाऊ नाईक यांनी या प्रदर्शनीला भेट दिली तसेच विद्यार्थिनीच्या कुशलतेची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांनी, पालकांनी तसेच सर्व प्राध्यापकांनी या प्रदर्शनीला भेट दिली आणि विद्यार्थिनींचे कोतुक केले. या प्रदर्शनीचे आयोजन प्रा. वर्षा गारुळे आणि प्रा.अर्चना भोयर यांनी केले.

# माजी विद्यार्थिनी मंडळ

**प्रा.डॉ. उज्वला तिखे**

महाविद्यालयात माजी विद्यार्थिनी मंडळाच्या सर्व विद्यार्थिनींची प्राथमिक परिचय सभा संपन्न झाली माजी विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक डॉ. उज्ज्वला तिखे सदस्य प्रा. वीरेंद्र शिंदे, प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख, प्रा. सरिता चंदनकर, प्रा. आशालाता बरडे यांनी सभेचे आयोजन केले. विद्यार्थिनींनी स्वतःचा परिचय करून दिला. नॅक समन्वयक डॉ. रवि चापके यांनी नॅक करिता माजी विद्यार्थिनीची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थिनींनी नियमित विद्यार्थिनींकरिता विविध उपक्रम राबवून विद्यार्थिनींच्या कलागुणांना विकसित करावे असे सुचविले. डॉ. गणेश पाटील सर यांनी माजी विद्यार्थिनींचे स्वागत केले तसेच ग्रामीण विभागापासून तर परदेशापर्यंत आमच्या माजी विद्यार्थिनी विविध स्तरावर कार्यरत आहेत जसे अंगणवाडी सेविका, पोलीस, स्पर्धा परीक्षा संचालिका, अधिकारी, प्राध्यापिका, मुख्याध्यापिका असल्याचा आनंद व्यक्त केला.

दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी कु. रोहिणी दुद्दल जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, औरंगाबाद इथे कार्यरत आहे. तसेच जैनसंत शिरोमणी विद्यासागर महाराज यांच्या शिष्या व जैन तत्वज्ञानाच्या अभ्यासक बालब्रम्हचारीनी राणी दीदी पूर्वाश्रमीच्या कु. पूजा राजकुमार संघवी दोन माजी विद्यार्थीनिंनी महाविद्यालयाला भेट दिली. यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कुमारी रोहिणी यांनी या पदावर रुजू होण्याकरिता तिला करावा लागणारा संघर्ष व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कडून झालेली मदत, परिश्रमाच्या बळावर आपण यशाची उंच शिखर गाठू शकतो करिता आजी विद्यार्थिनींनी खूप मेहनत करावी असे वक्तव्य केले राणी दीदी यांनी प्रत्येक मुलीने आपल्या जीवनाला वळण देणाऱ्या आपल्या मातापित्याच्या व कुटुंबीयांचा आदर ठेवूनच तसेच गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन मार्गक्रमण करावे असे सांगितले. या दोन्ही विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या उत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्कार घेतलेल्या होत्या. परिवारातून मिळणारे असे संस्कार महाविद्यालयातून मिळणारे संस्कार मूल्य विद्यार्थिनींमध्ये स्वतःमध्ये रुजवून प्रथम संस्कारित होऊन जीवनाविषयी सकारात्मक निर्णय घ्यायचा आहे. असे व्यक्त केले. विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर या माजी विद्यार्थिनींनी दिली. गृहअर्थशास्त्र विभागातून आहारशास्त्र या विषयातून मिळालेल्या ज्ञानाचा त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोग करतात असे त्यांनी सांगितले. आपल्या प्रत्येक विषयातून मिळणारे ज्ञान आपल्या आयुष्यात कामी पडणारे आहे याकरिता त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले. डॉ. स्वप्ना देशमुख यांनी माजी विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला आणि संचालन व आभार प्रदर्शन अनुराधा जोगदंडे बीए भाग तीन सेमिस्टर पाच यांनी केले.

महाविद्यालयात माहेर माजी विद्यार्थिनी मेळावा थाटात संपन्न झाला. प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील प्रमुख उदघाटक वृषालीताई मनोरराव नाईक यांचे समन्वयक डॉ. रवि प्रकाश चापके माजी विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक डॉ. उज्ज्वला तिखे उपस्थित प्रा. विरेंद्र शिन्दे, डॉ.स्वप्ना देशमुख, डॉ. सरिता चंदनकर, प्रा. आशालता बरडे विचार मंचावर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रद्धेय श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. प्रमुख उदघाटक वृषालीताई नाईक यांच्या हस्ते माजी विद्यार्थिनी मेळावा माहेरचे दीप प्रज्ज्वलन करून उद्‌घाटन झाले याप्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांचे शेवंतीचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. उद्‌घाटक वृषालीताई नाईक यांचा शाल श्रीफळ व शेवंतीचे रोप देऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी स्वागत केले. सर्व मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. संगीत विभाग प्रमुख डॉ. साधना मोहोड यांनी सुमधुर आवाजात स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय समन्वयक डॉ. उज्ज्वला तिखे यांनी केला माजी विद्यार्थिनी आमचा अभिमान आहेत स्वतःच्या कार्यक्षमतेच्या बळावर त्या गगनभरारी घेऊ शकतात. गरज ही शोधाची जननी आहे म्हणून विद्यार्थिनींनी सुप्त गुणांचा विकास करावा असे त्यांनी सांगितले. प्रा. शिंदे यांनी भरगच्च संखेत माजी विद्यार्थीनी उपस्थित आहे त्यांबद्दल आनंद व्यक्त केला. प्रा. डॉ. रवि चापके यांनी महाविद्यालयाच्या मूल्यांकनामध्ये माजी विद्यार्थिनींची भूमिका विशद केली तसेच माजी विद्यार्थिनींनी त्यांच्या सुप्त गुणाचा अविष्कार करावा असे सुचविले .याप्रसंगी माझी विद्यार्थिनींनी नयना कोठारी व राजश्री चव्हाण यांनी स्टॉल लावले त्यामध्ये विविध मसाले ,खाकरे चकल्री, चटणी ,मोत्याचे दागिने ,बांगड्या रुखवताचे

साहित्य तसेच लग्नविधी करिता लागणारी आवश्यक सामग्री चकल्या तिळाचे लाडू यांचा भरगच्च स्टॉल लावला या विद्यार्थिनींचे स्वागत वृषालीताई नाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन केले .महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व उद्घाटक वृषालीताई नाईक यांनी महिला महाविद्यालय हेच मुलींचे माहेर असे व्यक्त केले .महाविद्यालयात शिकत असतानाच्या त्यांच्या आठवणी त्यांनी विशद केल्या व नियमित विद्यार्थिनी करिता विविध कौशल्याचे वर्ग घेऊन त्यांच्या विकासात सदैव तत्पर राहील असे आश्वासन दिले .गृह अर्थशास्त्र या विषयाचे ज्ञान घेऊन स्वयंपाक घरात कौशल्य प्राप्त केले .तसेच सर्व गुरुजनांच्या आठवणींना उजाळा देत मार्गदर्शन केले डॉ.गणेश पाटील यांनी माजी विदयार्थिनींना शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयात शिकलेल्या विद्यार्थिनी गावापासून ते परदेशा पर्यंत प्रगती करत आहेत .अंगणवाडी सेविका मुख्याध्यापक प्राध्यापक पोलीस अधिकारी वकील, स्पर्धा परीक्षा संचालिका आहेत अस्त्र आनंद व्यक्त केला कार्यक्रमाचे संचालन डॉ.स्वप्ना देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सरिता चंदनकर यांनी केले. नंतर अल्पपोहाराचा आस्वाद घेण्यात आला. दुसऱ्या सत्राची सुरुवात करण्यात आली दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वंदना यांनी स्वीकारले प्रमुख उपस्थिती वृषालीताई नाईक माहेर असोसिएशनच्या ॲडवोकेट अल्पना जयस्वाल ,सो वनिता पंपालीया ,व्यासपीठावर विराजमान होत्या त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ टीना भट्टी, कु.चैताली पांडव ,संजीवनी मारोटकर, सौ शीतल पावडे ,रुक्मिणी विद्यालय पळशी येथील प्राध्यापक सौ ज्योती वारवडकर, सौ. स्मिता सुरनर, स्वाती गिरे, सौ. वनिता पंपालीया, ॲडवोकेट अल्पना जयस्वाल, कु. पूजा साखरे, जयश्री आगोसे यांनी आठवणीना उजाळा दिला व मनोगत व्यक्त केले कु. सायली त्रिवेदी योनी सांस्कृतिक कार्यक्रमात सुंदर गीत सादर केले. कु. स्नेहल डोंगरे यांनी त्यांचा जीवनप्रवास विशद केला .कु. गायत्री रुणवाल यांनी सर्व प्राध्यापक वृंदाचे तिच्या जीवनाल्नील महत्त्वाचे स्थान सांगितले. माजी विद्यार्थिनी समवेत माहेर असोसिएशनच्या अंजली प्रतापवार, कल्पना बावणे, संगीता घाटे उपस्थित होत्या. दुसऱ्या सत्राचे संचालन प्रा. आशालता बरडे तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. उज्ज्वला तिखे यांनी केले अध्यक्षीय समारोपात डॉ. वंदना वानखेडे यांनी महिला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये कुंभाराची भूमिका बजावत असतात व त्यातून सर्वांग सुंदर व्यक्तिमत्व असलेल्या विद्यार्थिनी घडतात प्रतिपादन केले कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता शारीरिक शिक्षण विभाग प्रमख डॉ. रजनी भोयर, ग्रंथपाल डॉ. छाया जतकर यांचे विशेष सहकार्य लाक्षले. या कार्यक्रमाचे नियोजन करताना कु. विश्रांती भुसे, कोमल पायघन, मंगला भांगे, स्नेहल बर्डे, पायल राठोड, खुशी ठाकूर, प्रिया शिंदे, आकांक्षा, रवीना कराळे, पूनम बर्गे, लक्ष्मी कानडे या विद्यार्थिनींनी रांगोळी पुष्प सजावट करून सहकार्य केले. सर्व प्राध्यापक व अप्ध्यापकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम ऑनलाईन देखील घेण्यात आला. बाहेरगावच्या विदयार्थिनी कार्यक्रमाला ज्या प्रत्यक्ष हजर राहू शकल्याने त्यांनी ऑनलाइन कार्यक्रमाला हजर राहून आम्हाला प्रोत्साहित केले.

# कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन

प्रा.डॉ. उज्वला तिखे

**बीएससी भाग एक ची पार्टी (२९ सप्टेंबरर २०२२)**

बीएससी भाग एक च्याअभ्यासक्रमाचे निमित्ताने नियोजन, नियंत्रण व मूल्यांकन याबद्दलचे ज्ञान प्रत्यक्षात उतरवण्याकरिता या विद्यार्थिनींनी पार्टीचे आयोजन केले. त्या मध्ये बीएससी भाग एकच्या सर्व विद्यार्थिनी सामावून घेण्यात आल्या विविध कामाची जबाबदारी वेगवेगळ्या समूहावर सोपवण्यात आली याप्रसंगी काही विद्यार्थिनींनी गीत गायन तर काहींनी सुंदर नृत्य सादर केले यामध्ये अंताक्षरी विविध खेळ घेतले तसेच शेवटी अल्पोपहाराने पार्टीची सांगता झाली.

**मेहंदी कार्यशाळा**

मेहंदी काढण्याचे कौशल्य असणाऱ्या विद्यार्थिंनीनी महिला प्राध्यापकांच्या हातावर मेंदी काढून दिली ज्यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन उर्वरीत विद्यार्थिनीमध्ये मेहंदी शिकण्याबद्दल प्रेरणा व उत्साह निर्माण झाला. मेहंदी काढणे या कलेकडे स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. याकरिता बीएससी भाग एक ची प्रांजली राठोड व शिल्पा ढोले यांनी पुढाकार घेतला .

**नूतन वर्षाचे स्वागत (२ जानेवारी २०२३)**

बीएससी भाग एकच्या सर्व विद्यार्थिनींनी असे ठरविले की आपण नवीन वर्षानिमित्त सर्व आपल्या गुरुजनांना शुभेच्छा द्याव्या. त्यानिमित्त त्यांनी हे एका छोट्या कार्यक्रमाचे आयोजन केले. सर्व शिक्षक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना निमंत्रित करून कार्यक्रम करायचे ठरविले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश पाटील सर होते तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. वंदना वानखेडे, प्रा. विरेंद्र शिंदे, डॉ. अंजली पांडे उपस्थित होत्या कार्यक्रमाचे संचालन खुशी ढाकुलकर हिने केले तर शिल्पा ढोले व वैष्णवी बोंम्पीलवार, लक्ष्मी कानडे त्यांनी शिंदे सरांच्या निवृत्ती बद्दल मत व्यक्त केले. नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना प्रत्येक प्राध्यापक वृंद व अध्यापकेतर कर्मचारी यांना जास्वंदाच्या रोपांचा वाटप करण्यांत आला. आपण सर्वांनी पर्यावरणाबद्दल जागरूक राहून वृक्ष लागवड केली पाहिजे व निसर्गाचे ऋण फेडले पाहिजे हा संदेश देण्यात आला.

**बेस्ट बेकर्सला भेट (१७ फेब्रु २०२३)**

गृहविज्ञान विभागातील कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन विषयाच्या प्रा. डॉ. उज्ज्वला तिखे कांडलकर दरवर्षी आपल्या विभागाच्या वतीने विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाकरिता तसेच उद्योगांमध्ये विद्यार्थिनींची उत्सुकता वाढावी या हेतूने त्या प्रत्येक वर्षी शहरातील विविध उद्योगाला विद्यार्थी समवेत भेट देत असतात. पुसद येथील ग्रामीण सामान्य रुग्णालय जवळ स्थित बेस्ट बेकर्सला त्यांनी विद्यार्थीनी सोबत दिनांक (१७ फेब्रु २०२३) ला भेट दिली. त्यावेळी विद्यार्थिनींनी तेथील व्यवस्थापक यांच्याशी संवाद साधला व बेकरीमध्ये कोणकोणत्या वस्तू कोणत्या पद्धतीने तयार केली जातात याचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखविले. बेकरीमध्ये मोठे ओव्हन, फ्रिजर व इतर मशीन ज्या वेगवेगळ्या पदार्थ बनवण्याकरिता वापरली जातात. या संदर्भात माहिती दिली. त्याचबरोबर नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये उपयोगी पडणाऱ्या वस्तू या संदर्भात देखील माहिती दिली. प्रा. डॉ. उज्वला तिखे कांडलकर कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन विषयाचे अंतर्गत विद्यार्थिनींना उद्योजकाकरिता प्रेरणादायी ठरणार या हेतूने त्या शहरातील विविध उद्योगांना विद्यार्थी समवेत भेट देत असतात. त्यांच्या या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी अभिनंदन केले. व विद्यार्थिनींचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच व्यवसाय उद्योग करण्याची इच्छा निर्माण झाली पाहिजे. जेणेकरून विद्यार्थ्यांनी स्वत:चे उद्योग स्वत: तयार करून कुटुंबाचा आर्थिक कणा मजबूत करता आला पाहिजे. असे त्यांनी विद्यार्थिनी सोबत संवाद साधून मनोगत व्यक्त केले.

**गृह उद्यानाला भेट**

कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन विभागाच्या प्रा. डॉ. उज्ज्वला तिखे यांनी स्वत:च्या घराच्या गच्चीवर विविध फुल्यांनी, पानांनी नटलेल्या सौंदर्यात्मक गृह उद्यानाला विद्यार्थिनींची सदिच्छा भेट घडवून आणली. आधुनिक काळात शहरात सर्वदूरवर सिमेंट कांक्रेटचे रस्ते निर्माण झाली आहेत. त्यामुळे पावसाचा पाणी जमिनीत झिरपण्या पेक्षा वाहून जातो. त्यामुळ निसर्गाचा समतोल बिघडत आहे. मानवाना मिळणारा प्राणवायूचे प्रमाण देखिल कमी होत आहे. अशा परिस्थितीत सर्व मानवांनी आपपाल्या घरी स्वत:चा उद्यान निर्माण करावा. जेणे करून आपल्याला प्राणवायूची कमतरता भासणार नाही. या प्रामाणिक हेतूने श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन समितीच्या प्रा. डॉ. उज्वला तिखे यांनी स्वत:च्या घराच्या गच्चीवर उद्यानाची निर्मिती केली आहे. त्या उद्यानाला भेट देण्यासाठी त्यांनी विद्यार्थिनींना आपल्या घरी घेऊन गेल्यात जेणेकरून विद्यार्थ्यांनी देखील आपल्या स्वत:च्या घरी छोटे छोटे बागेची निर्माण करावे व इतरांना देखील लहान लहान बगीचे निर्माण करण्यासाठी संदेश द्यावा. या हेतूने ही भेट घडवून आणली होती. प्रा. डॉ. उज्वला तिखे यांच्या या अभिनव उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व आजच्या दैनंदिन जीवनामध्ये काळामध्ये वृक्षांची उद्यानांची किती आवश्यकता आहे याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधून पटवून दिले.

**घर सजावट कौशल्याचे ज्ञान देण्याकरिता विविध भेटींचे आयोजन**

कौटुंबिक संसाधन व्यवस्थापन विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांनीना विविध प्रकारचे उपक्रम, कौशल्य दिले जातात . त्याचबरोबर प्रत्यक्षात प्रात्यक्षिकासह माहिती देखील दिली जाते. विद्यार्थिनींना विविध कला कौशल्य अवगत व्हावे या हेतूने विभागाच्या प्रा. डॉ. उज्वला तिखे यांनी घराची नीटनेटकी स्वच्छता, सजावट कशी असायला पाहिजे यासंदर्भात त्यांनी विद्यार्थिनींना उपक्रमाबद्दल माहिती दिली. घराचा नकाशा कसा काढायचा, घरसंरचना कशी करायची, घराची आंतरिक व बाहेरील सजावट करताना कोणकोणत्या घटकांचा व तत्वांचा उपयोग कल्पकतेने करायला हवा, या सर्व गोष्टींची माहिती त्यांनी विद्यार्थिनींना दिली. कमीत कमी जागेमध्ये अधिकाधिक घर सुंदर कसे दिसेल, त्या अनुषंगाने त्या घराची सजावट करता यावी. फर्निचर गरजेनूसार असावे याचे देखील ज्ञान त्यांनी विद्यार्थिनींना दिली. त्यांनी विद्यार्थिनींना आपल्या स्वतःच्या घरी नेऊन घर कसा असायला पाहिजे, त्याची सजावट, घरातील फर्निचर कसे असायला पाहिजे. याचे ज्ञान व माहिती त्यांनी विद्यार्थिनी दिली प्रा. सुरेखा खाडे. ह्याच्या घराला व बगिच्याला भेट (१६मार्चर०२३ ) बीएससी भाग दोन च्या विद्यार्थिनींना घराची अंतर्गत सजावट कशी असावी हा भाग त्यांच्या थेअरीमध्ये शिकवला जातो. परंतू प्रत्यक्षात त्या ज्ञानाचा उपयोग कसा करावा यासाठी प्राध्यापक सुरेखा भगत यांच्या घराला भेट देण्यात आली . घराची अंतर्गत सजावट दाखविण्याकरीता त्यांच्या घरातील बेडरूम, लिविंग रूम, किचन, टीव्ही पॅनल या सर्व गोष्टी मॅडमनी अगदी बारकाईने दाखवल्या–विद्यार्थिनींच्या संकल्पना त्यामुळे स्पष्ट झाल्या तसेच मॅडम कडे अप्रतिम असा बगीचा आहे याचे कारण म्हणजे प्रा. खाडे सर व खाडे मॅडम निसर्गाची खूप मेहनतीने सेवा करतात व त्यातूनच सुंदर बगीचा ची निर्मिती केलेली आहे ही निर्मिती विद्यार्थिनींनी बघितली. मॅडमच्या घरी एक आगळे वेगळे झाड आहे त्याचे नाव कॅटस क्लॉ. त्या झाडाचा केक कापून वाढदिवस साजरा केला. कारण याच मार्च महिन्यात मॅडम कडे त्या झाडाला भरपूर पिवळ्या फुलाचा बहार येतो. निसर्गसौंदर्याचा आनंद घेता यावा म्हणून मुलींना व मला निमंत्रित करण्यात आले होते त्या भेटीने डोळ्याचे पारणे फिटले.

**प्रा. आशालता बरडे लोखंडे यांच्या घरी व प्रा. शिला लोखंडे यांच्या घरी भेट (१८ मार्च २०२३)**

बर्डे मॅडम यांचे शिला लोखंडे यांच्या घरी अत्याधुनिक साहित्याचा वापर करून घराची बांधणी व अंतर्गत सजावट केलेली आहे ती बघण्यासाठी नेण्याचा योग आला घर खूप सुंदर तर आहेच परंतु शीला मॅडम व आशु मॅडम यांनी घराची पूर्ण माहिती पण खूप छान सांगितली गॅसची पाईपलाईन असो वॉटर फिल्टर वापरलेले पूर्ण मट साहित्य याबद्दल सविस्तर चर्चा करून सांगितले तसेच लिविंग रूम बेडरूम स्टोअर रूम किचन या सर्व रूम मधले स्ट्रेरेज प्लेस व फर्निचर अगदी बारकाईने विद्यार्थिनींना बघता आले याकरिता लोखंडे मॅडम यांचे देखील सहकार्य लाभले

# अन्न विज्ञान व पोषण आणि संप्रेषण व विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभाग संयुक्त उपक्रम अहवाल

**प्रा. डॉ. अर्चना माधवराव भोयर**
सहा. प्राध्यापक, अन्न विज्ञान व पोषण
**प्रा. वर्षा पुंडलिक गारुळे (भडंगे)**
सहा. प्राध्यापक संपप्रेषण व विस्तार शिक्षण गृहविज्ञान विभाग

अन्न विज्ञान व पोषण आणि संप्रेषण ब विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागांर्तगत दि. १ ते ७ ऑगस्ट २०२२ कालवधीत जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताह निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थीनींना ''प्रकृतीची प्रकृती'' म्हणजे स्त्रीयांचे आरोग्य या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ''प्रकृतीची प्रकृती'' म्हणजे स्त्रीयांचे आरोग्य हि संकल्पना किशोरवस्था, गर्भावस्था, दुग्धसर्जन अवस्था या स्त्रीजीवनातील महत्वाच्या शारीरिक अवस्थेशी गुफंण्यात आली तसेच या अवस्थेत होणारे शरीरांर्तगत बदल, मानसिक बदल आणि बदलता अन्न व पोषण विषयक गरजा याविषयी समग्र मार्गदर्शन प्रा. डॉ. अर्चना भोयर आणि प्रा. वर्षा गारुळे यांनी केले.

**अन्न विज्ञान व पोषण आणि संप्रेषण व विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागांर्तगत संपुर्ण रक्तचाचणी शिबिराचे आयोजन**

अन्न विज्ञान व पोषण आणि संप्रेषण व विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागांर्तगत दि. ६ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयात विद्यार्थिनी तसेच प्राध्यापक वृंद अन् अध्यापकेत्तर कर्मचारी वृंद यांच्यासाठी संपुर्ण रक्तचाचणी शिबिराचे आयोजन केले होते, उप जिल्हा रुग्नालय पुसद येथील प्रयोगशाळा सहाय्यक यांचे सहकार्य लाभले. शिबीराचे उदघाटन माननिय प्राचार्य डॉ. गणेश पाटिल सरांनी केले. उद्घाटनीय भाषणात माननिय प्राचार्य सरांनी रक्तचाचणीचे महत्व याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी विभाग प्रमुख डॉ. वंदना वानखेडे यांनी उपक्रमास शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थनीस रक्तचाचणी करण्यासाठी प्रोत्साहित केले. डॉ. रती वावधानी, शल्य चिकित्सक, उप जिल्हा रुग्नालय पुसद यांची या शिबीरास उपस्थिती लाभली. या शिबीरात लाभार्थिनीनी स्वेच्छेने रक्तचाचणी केली.

**यशस्वीतेची मनोगाथा**

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात अन्न विज्ञान व पोषण आणि संप्रेषण व विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागांर्तगत विद्यार्थिनीना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करण्यासाठी यशस्वीतेची मनोगाथा हे अभिनव उपक्रम जागतिक स्तनपान सप्ताहाच्या पर्वावर सुरू करण्यात आले. या उपक्रमाची पार्श्वभुमी डॉ. अर्चना भोयर यांनी विषद केली या उपक्रमाव्दारे गृहविज्ञान शाखेतील विद्यार्थिनीनां त्यांच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भतील विविध क्षेत्राची ओळख व्हावी तसेच शिक्षण घेत असलेल्या अभ्यास क्रमाविषयी आत्मियता विकसित करणे ज्यामुळे त्यांच्यातील सुप्त गुण्यांच्या विकास होऊन त्यांच्यांत पहिले पुष्प सौ. अर्चना दत्तात्रय पवार, सरपंच कुंभारी, ता. पुसद जि. यवतमाळ यांनी गुंफले. विद्यार्थिनीना ग्रामीण भागातील महिलाविषयक माहिती देऊन त्यांना ग्रामीण भागातील महिलांच्या पोषण व आरोग्य विषयक समस्येबद्दल अवगत केले. गृह विज्ञान शिक्षण पोषण व आरोग्य विषयक समस्या निमृर्लनासाठी महत्वाची भुमिका निभावते हे त्यांनी निक्षुन सांगितले. सरपंच म्हणुन गावात राबविण्यात येणारे विविध उपक्रमासंबंधी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. वर्षा गारुळे  दुसरे पुष्प प्रतिक्षा पोरजवार, हौसी केक व्यावसायीक यांनी गुंफले. यात मान्यवर अतिथींनी स्वत:च्या शैक्षणिक तसेच नोकरी करत असलेल्या बँकेच्या कामाविषयी माहिती दिली. विविध प्रकारचे केक तयार करण्याचा छंदाच्या अर्थाउपयोजनासाठी उपयोग करता येतो हे स्वअनुभवातुन विद्यार्थिनींना सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. वंदना वानखेडे, विभाग प्रमुख गृह विज्ञान विभाग यांनी भुषविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. वर्षा गारुळे यांनी केले आणि प्रा. डॉ. अर्चना भोयर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष, मान्यवर अतिथी तसेच उपस्थित विद्यार्थिनीचे आभार मानले.

# विद्यार्थिनी मंडळ २०२२-२३ अहवाल

**समन्वयक**
**प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम,**
**प्रा. डॉ. अमित सुरजुशे,**
**प्रा.माधवी रिंगणगावकर,**
**प्रा. डॉ. अर्चना भोयर,**
**प्रा. प्रकाश काळे ,**
**प्रा. छगन जूमनाके**

दिनांक ०१ ऑगस्ट २०२२ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तथा लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे सन्मा. प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प मालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबत उपस्थित प्राध्यापक वर्ग कर्मचारी व विद्यार्थिनींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दिनांक २१ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. सुधाकररावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनं कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा. डॉ. अंजली पांडे यांच्या हस्ते कै. सुधाकररावजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्प मालिका अर्पण करण्यात आले. उपस्थित प्राध्यापक ,कर्मचारी यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजी पदवी वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश वानखेडे आणि प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे नॅक समन्वयक प्रा. डॉ. रवि चापके उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांचे हस्ते बीए, बीकॉम, बीएससी २०२१ अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींना पदवी वितरण करण्यात आली.

दिनांक ५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिनानिमित्त विविध पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कै. श्रद्धेय श्रीमती वत्सलाबाई नाईक स्मृती पुरस्कार, कै. वसंतराव नाईक स्मृती पुरस्कार, कै. सुधाकरराव नाईक स्मृती पुरस्कार, कै. बाबासाहेब नाईक स्मृती पुरस्कार बीए ,बीकॉम, बीएससी अतिम वर्षाच्या विद्यार्थिनी तसेच एम ए भाग दोन संस्कृत, इतिहास, गृह अर्थशास्त्र अंतिम वर्षाच्या विदयार्थिनींना महाविद्यालयातून प्रथम आणि विषयांमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल बक्षीस देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील, कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण तथा प्रमुख अतिथी मार्गदर्शक सौ. मोहिनीताई इंद्रनील नाईक तथा दुसरे प्रमुख अतिथी मार्गदर्शक प्राचार्य डॉ. संजय भोयर, वसंतराव नाईक-रात्र कालीन महाविद्यालय पुसद, सोबत द्यिार्थिनी मंडळाचे समन्वयक प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, मराठी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. अमित सुरजुशे, प्रा. डॉ. अर्चना भोयर, प्रा. प्रकाश काळे, प्रा. छगन जुमनाके विचार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक, आभार प्रदर्शन प्राध्यापक विक्रांत मेश्राम, विद्यार्थिनी मंडळ समन्वयक यांनी केले.

दिनांक २९ सप्टेंबर २०२२ रोजी श्रद्धेय श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील उपस्थित होते. त्यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक, सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन विद्यार्थी मंडळाचे समन्वय प्राध्यापक विक्रांत मेश्राम यांनी केले.

दिनांक २ ऑक्टोंबर २०२२ रविवार रोजी भारतीय स्वातंत्र्यात महत्वपूर्ण भूमिका मांडणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री

यांच्या छायाचित्राला पूष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. सोबतच उपस्थित प्राध्यापक वर्ग कर्मचारी, विद्यार्थिनी यांनी देखील पूष्प मालीका अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन विद्यार्थिनी मंडळाचे समन्वयक प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम यांनी केले.

दिनांक १५ ऑक्टोंबर २०२२ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन भाषा अभ्यास मंडळ विद्यार्थिनी मंडळ, ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अंजली पांडे, इंग्रजी विभाग प्रमुख, कार्यक्रमाचे दुसरे वक्ते प्रा. डॉ. वैशाली पांडे संस्कृत विभाग प्रमुख, कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल छाया जतकर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम मराठी विभाग प्रमुख तथा विद्यार्थी मंडळ समन्वयक कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. माधवी रिंगणगावकर तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रगीत शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. रजनी भोयर यांनी सादर केले.

दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ रोजी सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा जोतिबा फुले पुण्यतिथी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मार्गदर्शक प्राचार्य डॉ. गणेश पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. महात्मा जोतिबा फुले यांच्या छायाचित्राला पुष्प मालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन विद्यार्थिनी मंडळाचे समन्वयक प्रा. विक्रांत मेश्राम यांनी केले.

दिनांक ६ डिसेंबर २०२२ भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे, प्रमुख पाहुणे तथा व्याख्याते आंबेडकर विचारवंत, साहित्यिक प्रा. डॉ. विलास भवरे उपस्थित होते या प्रसंगी त्यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक १ जानेवारी २०२३ ते १५ जानेवारी २०२३ महाराष्ट्र शासनाच्या निर्देशनानुसार मराठी भाषा पंधरवडा हा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संपन्न होत असतो. याच अनुषंगाने विद्यार्थिनी मंडळाच्या वतीने व मराठी विभागाच्या वतीने पुस्तक परीक्षण चर्चा काव्य लेखन स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी क्रांतीमा सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गणेश पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. कु. स्नेहल मधुसूदन बरडे बी.ए. भाग एक या विद्यार्थिनींनी मी सावित्रीबाई फुले बोलतो हे एकपात्री नाट्य सादर केले. कु. कुंती अमित राठोड बी.ए. भाग एक या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अभिवादन कार्यक्रमानिमित्त मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपस्थित प्राध्यापक वर्ग अध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी क्रांती सावित्रीबाई फुले यांच्या छायाचित्राला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी मोलाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक विद्यार्थिनी मंडळ समन्वयक प्राध्यापक विक्रांत कृष्णराव मेश्राम यांनी. केले तर आभार प्रदर्शन प्रा. सरिता चंदनकर यांनी केले

दिनांक २७ जानेवारी २०२३ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांचा भारतातील तमाम विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून परीक्षा पे चर्चा यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा केली. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या परिषद सभागृहामध्ये करण्यात आले होते यावेळी तांत्रिक सहायक म्हणून प्रा. संजय सुपे, प्रा. डॉ. अमित सुरेजुशे आणि प्रा. छगन जुमनाके यांनी केले. कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रचंड उपस्थिती होती.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ रोजी संत सेवालाल महाराज जयंती निमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात

आले होते. याप्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्राचार्य डॉ. अंजली पांडे यांनी अभिवादन केले . सोबतच उपस्थित प्राध्यापक वर्ग अध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. अंजली पांडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन, आभार विद्यार्थिनी मंडळाचे समन्वयक प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, मराठी विभाग प्रमुख यांनी केले.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून सन्माननीय प्राध्यापक डॉ. अंजली पांडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व मनोगत व्यक्त केले.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कविवर्य विष्णू वामन शिरवाडकर उपाख्या कसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या कार्यक्रमानुसार कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती मराठी विभागात साजरी करण्यात आली व मराठी विभागाच्या वतीने निबंध स्पर्धेचे व काव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात अले होते.

दिनांक ३ मार्च २०२३ रोजी क्रांतीमा सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे उपस्थित होत्या.

दिनांक १४ एप्रिल २०२३ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपस्थित प्राध्यापक कर्मचारी यांनी देखील पुष्प अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा आभार प्रदर्शन प्राध्यापक विक्रांत मेश्राम मराठी विभाग प्रमुख यांनी केले.

दि. २९ एप्रिल २०२३ विद्यार्थिनींना निरोप समारंभ, अध्यक्ष प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे, अतिथी प्रा. डॉ. भालचंद देशमुख होते.

दिनांक १० मे २०२३ रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जलसंधारणाचे प्रणेते माजी राज्यपाल स्मृतीशेष सुधाकररावजी नाईक साहेब यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वंदना वानखेडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक तथा आभार प्रदर्शन प्राध्यापक विक्रांत कृष्णराव मेश्राम यांनी केले.











# महिला महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद संपन्न

दिनांक २८ जानेवारी २०२३ जनता शिक्षण मंडळ व्दारा संचालित श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयामध्ये गृहविज्ञान विभाग व IQAC च्या वतीने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. 'इमर्जिंग ट्रेन्डस अपॉर्च्युनिटी अँड चॅलेंजेस इन हायर एज्युकेशन' हा ह्या परिषदेचा मुख्य विषय होता. परिषदेच्या उद्घाटन समारंभात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश पाटील, प्रमुख पाहुणे आमदार इंद्रनीलभाऊ मनोहरराव नाईक, पुसद, उद्घाटक डॉ. लक्ष्मीकांत, प्राचार्य दयानंद कॉलेज अजमेर, राजस्थान, बीज भाषक डॉ. वैशाली धनविजय विभाग प्रमुख पी. जी. डिपार्टमेंट ऑफ होम सायन्स, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, या परिषदेच्या समन्वय प्रा. डॉ. वंदना वानखेडे, नॅक समन्वयक प्रा. डॉ. रवि चापके हे याप्रसंगी विचारमंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत अमरावती विद्यापीठ अमरावती चे कुलगुरू दीलीप मालखेडे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. मंचावर उपस्थित समस्त पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयाचे श्रद्धास्थान श्रद्वेय श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबतच दीप प्रज्ज्वलित करून कार्यक्रमाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. प्रा. डॉ. साधना मोहोड संगीत विभाग प्रमुख व विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर करून पाहुण्यांचे स्वागत, स्वागत गीताने केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार इंद्रनीलभाऊ मनोहरराव नाईक, उद्घाटक प्राचार्य. डॉ. लक्ष्मीकांत, बीजभाष डॉ. वैशाली धनविजय यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मंचावर उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक प्रा. डॉ. वंदना वानखेडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अरुणा पवार तर पाहुण्यांचा परिचय डॉ. रवी चापके यांनी करून दिले व आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. रजनी भोयर यांनी केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात 'इनोव्हेशन इन हायर एज्युकेशन इन क्रिएटिव्ह फिल्ड' या विषयावर डॉ. हरप्रित कौर, विभाग प्रमुख ऑफ फॅशन डिझायनिंग, कन्या महाविद्यालय जालंधर पंजाब यांनी ऑनलाईन पद्धतीने आपले विचार् व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुनिता काळे, विभाग प्रमुख डिपार्टमेंट ऑफ टेक्स्टाईल, कॉलेज कम्युनिटी सायन्स परभणी यांनी या विषयावर मत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रवि चापके यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. उज्ज्वला तिखे तर आभार प्रदर्शन प्रा. वर्षा गारुळे यांनी केले. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० अँड हायर एज्युकेशन इन इंडिया या विषयावर दुसऱ्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ. श्रद्धा नायडू, प्राचार्य दयानंद आर्या महाविद्यालय नागपूर, तर बीज भाषक म्हणून डॉ. मोहम्मद अब्दुल राफे, असिस्टंट डायरेक्टर यूजीसी एचआरडी सेंटर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे होते .या दोन्हीही विचारवंतांनी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० अँड इंडिया विषयावर सखोल असे मार्गदर्शन पीपीटीच्या माध्यमातून केले या यावेळी सूत्रसंचालन प्रा. डॉ. रंजना जीवने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. वीरेंद्र शिंदे तर आभार प्रदर्शन इतिहास विभाग प्रमुख डॉ. नारायण वर्मा यांनी केले. या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ गणेश पाटील, प्रमुख पाहुणे दीपक भाऊ आसेगावकर, परिषदेच्या समन्वयक डॉ. वंदना वानखेडे, डॉ. श्रद्धा नायडू, प्राचार्य दयानंद आर्या महाविद्यालय नागपूर, डॉ. रवी चापके, बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक श्री. अविनाश सुरडकर, चिद्दरवार ज्वेलर्सचे संचालक भागवत चिद्दरवार आणि मोतेवार साडी सेंटरचे गजानन मोतेवार हे याप्रसंगी विचार मंचावर उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवरांना शाल, श्रीफळ , पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी दीपकभऊ आसेगावकर यांनी आपले विचार व्यक्त केले. अशा परिषद वारंवार व्हाव्यात हे देखील त्यांनी यावेळी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी राष्ट्रीय परिषद अगदी उत्कृष्टपणे पार पडल्याचे त्याचबरोबर त्यांनी या कार्यक्रमाला ज्यांनी आर्थिक मदत केली त्यामध्ये श्री दीपकभाऊ आसेगावकर, बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक अविनाश सुरडकर, चिद्दरवार ज्वेलर्स पुसद चे भागवत चिद्दरवार, मोतेवार साडी सेंटर पुसद चे गजानन मोतेवार यांनी परिषदेला आर्थिक मदत केल्याबद्दल आभार व्यक्त केले. याप्रसंगी या राष्ट्रीय परिषदेमध्ये स्नेहल केतकर, चंद्रकांत कोठे, जयश्री सिताराम पवार, प्रा विलास भवरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या

इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अंजली पांडे तर आभार प्रदर्शन डॉ. रवि चापके यांनी केले. या संपूर्ण राष्ट्रीय परिषदेचा जो मुख्य आकर्षणाचा विषय होता तो म्हणजे रांगोळी आणि पुष्पाने साकारलेली भव्य दिव्य सजावट ज्यांनी हे कल्पक आणि सुंदरतेने रांगोळी आणि पुष्प सजावट केली त्यामध्ये प्रा. सुरेखा भगत, प्रा. पुनम बंग, प्रा. पल्लवी राठोड व विद्यार्थ्यांनी. या परिषदेमध्ये भारतातून वेगवेगळ्या राज्यातून १५० पेक्षा जास्त शोध निबंध प्राप्त झाले. या परिषदेमध्ये नॅशनल एज्युक्रेशन पॉलिसी २०२० यावर सखोल असे चिंतन उपस्थित अध्यक्षांनी, बीज भाषकांनी व्यक्त केली. या परिषदेमध्ये सखोल चिंतन आणि मंथन तज मार्गदर्शकांनी केले. या कार्यक्रमाला विविध राज्यातून प्राध्यापकांनी, अभ्यासकांनी, तज्ज्ञांनी, उपस्थिती दर्शवली. ही राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.








# आम्हा तयांचा अभिमान



**कु. धनश्री अजय जाधव**

(बी.ए. भाग- २)
फुटबॉल खेळामध्ये २०२२-२३ या सत्रामध्ये राणी लक्ष्मीबाई इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन ग्वालीयर (उत्तर प्रदेश) येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व व कलरकोटची मानकरी.



**कु. सुनिता देवसिंग पवार**

(एम.ए. भाग- १)
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आंतरविद्यापीठ फुटबॉल संघातराखीव खेळाडू म्हणून निवड.




**कु.स्मिता बाळकृष्ण बोराडे**

(बी.ए.भाग-२)
दिल्ली स्टुडंट्स ऑलिम्पिक नॅशनल गेम्स धावणे रौप्य पदक मानकरी



**कु. स्मिता बाळकृष्ण बोराडे**

(बी.ए. भाग-२)
४०० मी. धावणे मध्ये दिल्ली येथे स्टुडंटस् ऑलम्पिक नॅशनल गेम्स मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व व राष्ट्रीयस्तरावर रौप्य पदकाची मानकरी.



**कु.आरती संतोष देवळे**
**व**
**कु.यशश्री सदानंद बोडखे**

सिकई मार्शल आर्ट या क्रिडा मध्ये यवतमाळ जिल्हाचे प्रतिनिधीत्व



**कु.राणी राठोड**

(११ वी सायन्य)
स्किल डो मार्शल आर्ट राष्ट्रीय विजेती त किक बॉक्सिंग,ज्युडो,कराटे मध्ये राज्यस्तरीय शालेय क्रिडा स्पर्धेत रोप्य पदक प्राप्त तसेच प्रतिनिधित्व



**कु.वैष्णवी रवी चव्हाण**

(१२ वी कला)
राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेत४०० मीटर धावणे प्रतिनिधित्व



**कॅडेट कु.पुनम राजेश वंझारे**

(बी.ए.भाग१)
'उत्कष्ट कॅडेट'
पुरस्कार देण्यात आला



**कॅडेट कु. मृणाल कामटलवर**

(बी.एस्सी. १)
अमरावती ग्रुप मध्ये सर्वाधिक गुण प्राप्त सी सर्टिफिकेट प्रथम क्रमांक